नसीं ॥ सांगतोंतुजसीतेंऐक ॥ १६ ॥ तूंसर्वकाळविठ्ठलाचें ॥ सप्रेमनामजपतोसिवाचे ॥ त्यास्तवनिर्मूळसंसाराचें ॥ होतसेसा
चेंजाणपां ॥ १७ ॥ आमचेंनायकसीसाचार ॥ ह्मणऊनिघातझालाथोर ॥ पुढेंहीदेखसीचरित्र ॥ दुष्टोत्तरेंबोलती ॥ १८ ॥ जैं
सेंखांडूकझालेंहाडावर ॥ त्यावरीफांसणयाचेमार ॥ परीतुकापूर्णशांतीचासागर ॥ लोकांसीउत्तरबोलतसे ॥ १९ ॥ होणारतें

नतुकेचिसर्वथा ॥ व्यर्थकासयावाणीवेचितां ॥ बरेंजेनभजतीपंढरीनाथा ॥ तेकायमरतांवांचती ॥ १२० ॥ महादुष्काळीं अन्नाविण ॥ प्राणीउदंडपावलेमरण ॥ तेकायकरितीहरिस्मरण ॥ निमित्ताकारणेंकोणत्या ॥ २१ ॥ ऐशारीतीवैष्णववीरें ॥ तयांसीदिधलेंप्रत्युत्तर ॥ पुढेंवर्तलेंकायचरित्र ॥ तेंऐकासादरनिजकर्णीं ॥ २२ ॥ तुकयाचाज्येष्ठपुत्रजाण ॥ संतोबात्याचें नामाभिधान ॥ त्याचेठायींप्रीतीगहन ॥ तोमृत्युसदनपावला ॥ २३ ॥ प्रपंचदुःखमहाभारी ॥ ज्याचेंनिघेतसुखारी ॥ तेंनिमोनिगेलियानिर्धारीं ॥ खेदअंतरींबहुझाला ॥ २४ ॥ कांतापुत्रझालीशांत ॥ तेणेंदुःखितवैष्णवभक्त ॥ ह्मणेजळोयाप्रपंच्याचीमात ॥ त्यागसमस्तकरावा ॥ २५ ॥ प्राणीयासींसंसारीं बैसतांआंच ॥ हेंमहामूळअनुतापाचें ॥ संतसज्जनयेविषयींचे ॥ दृष्टांतसाचेअवधारा ॥ २६ ॥ हलाहलघेतांचि शंकराचें ॥ दहनहोयसर्वांगाचें ॥ येव्हडीतयासीं बैसतांआंच ॥ मगश्रीरामाचेंभजनकरी ॥ २७ ॥ त्रितापेंप्राणीपोळलाजरी ॥ तरीअनुतापहोयअंतरीं ॥ पांडवांविपत्तीनानापरी ॥ यास्तवश्रीहरिचित्तींवसे ॥ २८ ॥ हिरण्यकशिपेंनानारीती ॥ छळिलेंजेव्हांप्रल्हादामती ॥ मगअनुतापेंहाकमारितांनिश्चिती ॥ खांबांतश्रीहरीप्रकटला ॥ २९ ॥ असोहेदृष्टांतअनेक ॥ प्राणीभोगितीत्रिविधनरक ॥ मगपश्चात्तापेंकरूनदेख ॥ मोक्षसुखपावती ॥ १३० ॥ तुकयासींझालीतैसीगती ॥ संसारींपाहिलीनानाविपत्ती ॥ तेसंकळितसांगतोंयथामती ॥ तरीसादरश्रोतींपरिसिजे ॥ ३१ ॥ तेराचेवर्षींपितयानें ॥ संसारगळांघातलाजाण ॥ तेथेंदक्षयेतांदिसोन ॥ समाधानवडिलांसी ३२

तु॰च॰
६

सतरावेवर्षीतलता ॥ क्रमोनिगेलींमातापिता ॥ वडीलबंधूचीकांता ॥ तेही अवचितानिमाली ॥ ३३॥ अठरावेवरुषंजाणा
॥ सावजीगेलातीर्थाटणा ॥ त्याच्यावियोगेंकरूनिजाणा ॥ शोकनिजमनावाटत ॥ ३४ ॥ विसाव्यांतपुत्रकांतास्वयमेव ॥ दे
खोनिसंसारींधरिलीहाव ॥ आतांयेथोनिमनघिटवावें ॥ मगदेवाधिदेवेंकायकेलें ॥ ३५ ॥ एकविसाव्यांतविपरीतकाळ
॥ तुकयासीपातलातत्काळ ॥ तेव्हांनिघतांचिदिवाळें ॥ सोइरेसकळहांसती ॥ ३६ ॥ अज्ञानप्रकृतितेस्त्रीनिश्चित ॥ तेही नि
माली अन्नअन्नकरित ॥ महामोहपुत्रसमस्त ॥ लौकिकींविपरीतहेवार्ता ॥ ३७ ॥ पूर्वार्धसंपलेंऐशारीती ॥ दुःखेंदेखिलीं-
नानारीती ॥ संसाराचीआस्थाहोती ॥ तेही भ्रांतीनिरसिली ॥ ३८ ॥ अविद्यारात्रीसरोनिजातां ॥ ज्ञानसूर्यप्रकटे अवचिता
॥ तेणेसाधकाचियाचित्ता ॥ आनंदसर्वथानसमाये ॥ ३९ ॥ समुद्रमंथितांतयेवेळां ॥ विबुधांसीश्रमझाला ॥ सेवटीं अमृ
तपाहतांडोळां ॥ आनंदलाशचीनाथ ॥ १४० ॥ कींकरितांदधिकडसणी ॥ कष्टवाटतीतयेक्षणीं ॥ सेवटींनवनीतपाहातां
नयनीं ॥ घरच्यारिणीसंतोषे ॥ ४१ ॥ नातरीकृषिकर्माचीखटपट ॥ तेतरीबहुतचिदिसतीकष्ट ॥ शेवटीपीकयेतांघनदाट
॥ चित्तींकुणबटसंतोषती ॥ ४२ ॥ कांइक्षुदंडगाळितांसाचार ॥ तयासीसायासलागतीफार ॥ सेवटींरूपासीयेतांसाकर ॥
चवीखाणारजाणती ॥ ४३ ॥ तैसेंप्रथमारंभींसाधकासीं दुःख ॥ परीपरिणामींतेंअनुपमसुख ॥ तें अनुभवेंजाणतीसम्यक
॥ ज्याणीविवेकजागविला ॥ ४४ ॥ असोतआतांभाषणेंबहुत ॥ दृष्टांतदेणेकविचेंमत ॥ आतां अनुसंधानीलाऊनिचित्त ॥

अ॰
५

६

ऐकानिजभक्तभाविकहो ॥ ४५ ॥ दारापुत्रहोतांचिनाश ॥ अनुतापजाहलातुकयास ॥ मगएकांतींजाऊनिउदास ॥ विच्यारमनांतकरितसे ॥ ४६ ॥ ह्मणेसंसाराचीभरोवरी ॥ करूनिपाहिलीआजिवरी ॥ तोंअधिकचिदुःखाचीपरी ॥ त्याकोठवरआठवूं ॥ ४७ ॥ कोळसाउगाळितांचिनिश्चित ॥ तोंअधिकचीकाळेंदिसेआंत ॥ तेवीसंसारींदुःखाचेपर्वत ॥ अनुभवेंप्रचीतआलीकीं ॥ ४८ ॥ कींढेंकुणांचेबाजेवरी ॥ निद्रानिवांतलागेलजरी ॥ तरीचसौख्ययासंसारीं ॥ स्वप्नदृष्टीदेखिजे ॥ ॥ ४९ ॥ नातरीबचनागाचेंमहुरपण ॥ प्रथमारंभींचपाहूनिघेणें ॥ परीपरिणामींनटळेचिमरण ॥ सत्यजाणात्रिवाचा ॥ १५० ॥ संसारींअसतांदेवजोडे ॥ ऐसानिश्चयदृढघडे ॥ तरीशुकदेवकांहोऊनिवेडे ॥ बैसतीकडेकपाटीं ॥ माझेंआयुष्यतोंकिती ॥ तेंहीवेंचिलेंसंसारभ्रांतीं ॥ आतांउरल्याकाळेंनिश्चिती ॥ रुक्मिणीपतीभजावा ॥ ५२ ॥ ऐसानिश्चयकरूनचित्तीं ॥ जातसेभांबनाथपर्वतीं ॥ जेवींपतिव्रतानिघतांसती ॥ त्यागकरीतीसर्वस्वें ॥ ५३ ॥ मायबापपुत्रवित्त ॥ नाठवीजैसेंमनांत ॥ भेटावयाप्राणनाथ ॥ उडीअग्नींतघालीतसे ॥ ५४ ॥ तैशाचपरीवैष्णवतुका ॥ पर्वतावरीजाऊनिदेखा ॥ अंतरींआठऊनिवैकुंठनायका ॥ करुणाअनेकभाकित ॥ ५५ ॥ ध्यानासीआणूनिपांडुरंगमूर्त्ती ॥ लाविलींदोनीनेत्रपातीं ॥ ह्मणेदेवाधिदेवारुक्मिणीपती ॥ माझीविनंतीअवधारीं ॥ ५६ ॥ कैसेंकरावेंतुझेंध्यान ॥ हेंमीसर्वथाकांहींचनेणें ॥ कैसेंपाहावेंतुजकारणें ॥ हेंमजदाखवणेयाचकासीं ॥ ५७ ॥ कैसीकरावीतुझीस्तुती ॥ कैसीसेवाकरूंनिश्चिती ॥ कोणत्याभावेंरुक्मिणीपती ॥ भेट

सीमजप्रतीहेंसांग ॥ ५८ ॥ गीतींगाऊंकैशारीती ॥ ध्यानासी आणावीकैसीमूर्त्ती जनांतराहावेंकवणेस्थिती ॥ हेंमजप्रती
सांगतूं ॥ ५९ ॥ तूंतरी अलक्ष अगोचर ॥ तरीकैसालक्षासीं आपू मी पामर ॥ यमधर्मवरुणकुबेर ॥ तयासींपारनकळेतुझा
॥ १६० ॥ चंद्रसूर्यतारांगणनिश्चिती ॥ भ्रमणेकरितीतुजभोंवती ॥ इंद्रादिदेवपारनेणती ॥ तेथेंमीकितीमशक ॥ ६१ ॥ ब्रह्मा
तुझेंपोटींचेंबाळ ॥ शोधीतगेलानाभीकमळ ॥ परीत्यासींसर्वथा अंतनकळे ॥ मगस्तवीततत्काळतुजदेवा ॥ ६२ ॥ तुझ्यादर्श
नाचीधरून आर्त्ती ॥ स्मरणकरीशंकरपार्वती ॥ तयासीतूं दुर्लभवैकुंठपती ॥ तेथेंमाझी आर्तकिंविपुरे ॥ ६३ ॥ ऐशाकल्पना-
आणोनिचित्तीं ॥ मनीं आठविली पांडुरंगमूर्त्ती ॥ देखोनित्याचीसप्रेमभक्ती ॥ करीश्रीपतीकायतेव्हां ॥ ६४ ॥ सप्तदिवसपर्यं
तजाण ॥ नेत्रझांकिलेएकाग्रमनकरून ॥ नसेचिफळअथवाजीवन ॥ नामस्मरणकरीतसे ॥ ६५ ॥ शरीरवाचाएकाग्रमन
॥ करुणाभाकीनिजप्रीतीकरून ॥ तोंकौतुकदावीरुक्मिणीरमण ॥ तेंपरिसासज्जनभाविकहो ॥ ६६ ॥ कृष्णवर्णअतिविशा
ळ ॥ सर्परूपधरूनिघननीळ ॥ तुकयाभोंवतातेवेळेसबळ ॥ महाकाळफिरेजैसा ॥ ६७ ॥ विशाळफणाउभारोनी ॥ धुधुःका
रटाकीतयेक्षणीं ॥ तुकाभयनधरीचमनीं ॥ नेत्रझांकोनीतटस्थ ॥ ६८ ॥ तों आकाशवाणीअकस्मात ॥ तुकयासींबोलेनि
जगुह्यार्थ ॥ महासर्पहोऊनियांयेथ ॥ रुक्मिणीकांतआलेकीं ॥ ६९ ॥ तरीतूंनेत्रउघडोनिआतां ॥ दृष्टीसीपाहेंप्रेमळभ-
क्ता ॥ चित्तींभयनधरींसर्वथा ॥ ऐसीवार्त्ताऐकिली ॥ १७० ॥ ऐसीवार्त्ताऐकोनिनिश्चित ॥ चित्तींह्मणतसेप्रेमळभक्त ॥ सर्प

रूपधरूनिआलेभगवंत॥मीनपाहेंनिश्चितत्यांलागीं॥७१॥जनींभरलाजनार्दन॥ऐसींबोलतीश्रुतिपुराणेंजाण॥वि
श्वदेखतीअवघेजन॥तेकैसेंनितरलेह्मणावे॥७२॥जळअवघेंचिअसेएक॥परीच्यातकेनघेतीभूमीचेंउदक॥तेवीमी-
पांडुरंगउपासक॥रूपेंअनेकनपाहें॥७३॥जेंध्यानवर्णिलेंश्रुतीपुराणीं॥संतींसांठविलेंहृदयभुवनी॥तैसाहोईलकै
वल्यदानीं॥पाहेननयनींमगसीतया॥७४॥ऐसाअंतर्भावतुकयाचा॥जाणोनिनाथवैकुंठींचा॥बाहेरप्रकटहोयसाचा
॥प्रेमभक्तीचाबांधलाजो॥७५॥तत्काळचतुर्भुजघनश्याम॥शंखचक्रगदापद्म॥निजभक्ताचेंदेखोनिप्रेम॥तोआत्मारा
मप्रकटला॥७६॥तुकाउघडीनेत्रपातीं॥तोंपुढेंउभारुक्मिणीपती॥दिव्यकुंडलेंकानींतळपती॥मकराकृतीसुढाळ॥
॥७७॥तोदेवाधिदेवपंढरीरायें॥तुकाउचलोनिघेतलाकडिये॥जैसीतान्हयापासींनिजमायलवलाहें॥संबोखितआ
हेनिजप्रीती॥७८॥ह्मणेतूंमाझालडिवाळ॥आतांउघडोनिपाहेडोळे॥तुजनविसंबेंसर्वकाळ॥ऐसेंघननीळबोलिले
॥७९॥तुकयाचीविदेहीस्थित॥मागुतीझालासमाधिस्थ॥मगसावधकरीरुक्मिणीकांत॥ह्मणेपाहेंनिश्चितमजकडे॥८०
॥मगनेत्रउघडोनितेसमयीं॥पाहेतोंसगुणमूर्त्तीशेषशाई॥पहिल्यापरीसविशेषकांहीं॥लाभयेठायींदेखिला॥८१॥
अलक्ष्यचिंतितहोताकोडें॥त्याहूनिविशेषगुणरूपडें॥तुकाबैसोनिवाडेंकोडें॥निजनिवाडेंपाहत॥८२॥ऐकामागील
अनुसंधान॥संसारींउदासहोऊनिजाण॥तुकयानेंसेविलेंआरण्य॥नकळेठिकाणकोणासी॥८३॥त्याचाधाकुटासहो

दर ॥ कान्हयानांवत्यासाचार ॥ तोगिरिगव्हरेंघोर ॥ धुंडीतसाचारअहर्निशी ॥ ८४ ॥ चित्तींनिश्चयकेलापूर्ण ॥ होईलतुकयाचेंदर्शन ॥ तरीचसेवीनमी अन्न ॥ निश्चयपूर्णहाकेला ॥ ८५ ॥ श्रीरामाच्यावियोगेंकरून ॥ भरतेंमांडिलेंनिर्वाण ॥ तैसाकान्हयाचानिश्चयपूर्ण ॥ मजकारणेंभासत ॥ ८६ ॥ अघोरवनमहापर्वत ॥ धुंडिलेसप्तदिवसपर्यंत ॥ मगभांबनाथासीं अकस्मात ॥ कान्हयायेततेधवां ॥ ८७ ॥ तोंदेवभक्तदोघेजण ॥ पाहूनिझालेंसमाधान ॥ देहींचविदेहीहोऊन ॥ तन्मयपूर्णतो झाला ॥ ८८ ॥ सायासनकरितांसाचार ॥ दृष्टीसींपाहिलारुक्मिणीवर ॥ झळकतदिव्यपीतांबर ॥ मकराकारकुंडलें ॥ ८९ ॥ मुकुटींफांकतीरत्नकिरळा ॥ तेणेंवासरमणीलपोनिगेला ॥ कौस्तुभवैजयंतीरुळेगळां ॥ तुकाघेतलाकडियेवरी ॥ १९० ॥ देवभक्ताचीझालीमिळणी ॥ कान्हयादेखेनेत्रभरूनी ॥ मगसाष्टांगदंडवतघातलेंधरणी ॥ वाहातीनयनीं अश्रुपात ॥ ९१ तों तुकयासीह्मणेकरुणाकर ॥ इच्छाअसेलतोमागवर ॥ ऐकोनिह्मणेभक्तचतुर ॥ तुमचाविसरनव्हावा ॥ ९२ ॥ मातानविसंबेतान्हयासी ॥ कींहरिणीजैसीपाडसासी ॥ तैसाचरीतीहृषीकेशी ॥ मजदीनासीसांभाळीं ॥ ९३ ॥ यावरीह्मणेजगज्जीवन ॥ तुह्मासाठींमजरूपासीयेणें ॥ युगायुगींअवतारघेणें ॥ अन्यकारणकायअसे ॥ ९४ ॥ मीपुंडरिकाचियेसाठीं ॥ उभाराहिलोंभीमातटीं ॥ भाविकभक्तांसीदेतसेंभेटी ॥ करहृदयकटींठेविले ॥ ९५ ॥ तुझापूर्वजविश्वंभर ॥ त्याणेमाझीभक्तिकेलीफार ॥ मगतयासीदेऊनिवर ॥ देहुसींसाचारराहिलों ॥ ९६ ॥ ऐसेंबोलतांशेषशाई ॥ तुकासत्वरलागलापायीं ॥ का

न्हयाह्मणेतेसमर्थीं ॥ धन्यनवाईअगाध ॥९७॥ मगउजळोनीमंगळारती ॥ वोंवाळिलारुक्मिणीपती ॥ पुढिलेअध्या
यींरसोत्पत्ती ॥ सादरसंतींपरिसीजे ॥९८॥ ऐकतांसंतांचेंचरित्र ॥ तयासींभेटेलराजीवनेत्र ॥ सात्विकबुद्धीहोऊनिपवित्र
॥ आत्मवत्जगत्रभासेलकीं ॥९९॥ तुकयाचीसंसारस्थिती ॥ सप्रेमभावेंगातीऐकती ॥ तयासींतुष्टोनिरुक्मिणीपती ॥ सं
सारविपत्तीहोऊंनेदी ॥२००॥ जैसीतैसीआर्षवाणी ॥ संतसादरऐकतीश्रवणीं ॥ जेवींबाळकबोलेबोबडेंवचनीं ॥ तेंचिप
डताळोनिसुसेमाता ॥१॥ तैशारीतीमीअज्ञान ॥ न्यूनअधिककांहींचनेणे ॥ परीतुह्मींआपल्याकृपादानें ॥ सरतीवचनें
करावीं ॥२॥ बुद्धिमतीसींउन्मेषलहरी ॥ तुह्मींदेतसांसर्वोपरी ॥ महिपतीसीकरूननिमित्तधारी ॥ ग्रंथविस्तारीवादवितां
॥३॥ स्वस्तिश्रीभक्तलीलामृतग्रंथ ॥ श्रवणेंचिपुरतीमनोरथ ॥ प्रेमळपरिसोतवैष्णवभक्त ॥ पंचमोध्यायरसाळहा
॥४॥ ॥ ओव्या २०४॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु॥ ॥ श्रीमज्जगदीश्वरार्पणमस्तु॥ छ॥ छ॥ छ॥

॥ अध्यायपांचवासमाप्त ॥

अध्यायसाहावा
तुका
जिजाबा
भांडारपर्वत
देशपांडये
तुकाराम
शेतकरीतुकारामास बोदितो
पक्षी
गव्हाचेंशेतपिकलें आहे
तुकाराम
शेतकरी

श्रीगणेशायनमः ॥ श्रीगोपालकृष्णायनमः ॥ जयजयसच्चिदानंदाकरुणामूर्त्ती ॥ ब्रह्मांडींतुझीनसमायेकीर्ती ॥ तोतूंप्रेमळाचीधरितोसिआर्ती ॥ रुक्मिणीपतीविठ्ठला ॥ १ ॥ हठयोगीब्रह्मज्ञान्यासी ॥ अवघटयोगसांगीतलात्यांसी ॥ भाळ्याभोळ्यानिजभक्तांसी ॥ धर्मसांगसीभागवत ॥ २ ॥ सनकादिकांचाप्रश्न अपूर्व ॥ ऐकूनिकुंटितकमलोद्भव ॥ मगत्याणेंकेलातुझास्तव ॥ सप्रेमभावधरूनियां ॥ ३ ॥ ऐकोनिविधात्याचीस्तुत ॥ मगहंसरूपेंआलासितेथ ॥ तेव्हांचतुःश्लोकीभागवत ॥ सांगसीत्यातेंनिजरूपें ॥ ४ ॥ तुझीऐकूनिवचनामृतें ॥ ब्रह्माझालास्वानंदभरित ॥ मगत्याणेंदशलक्षणभागवत ॥ नारदातेंसांगीतलें ॥ ५ ॥ तोसप्रेमभरितहोऊनमानसीं ॥ कीर्त्तनीनाचेअहर्निशी ॥ तेव्हांद्वैपायनभेटोनिनारदासी ॥ सद्भावेंसीपुसतसे ॥ ६ ॥ ह्मणेस्वामीऐकावचन ॥ म्यांकेलीअठरापुराणें ॥ आणीकशास्त्रेंइतिहासगहन ॥ वदलोंसंपूर्णहेकथा ॥ ७ ॥ परीमनस्थीरहोऊनिपाहीं ॥ चित्तसंतोषहोतनाहीं ॥ यासीउपायसांगावाकांहीं ॥ व्यासपायींलागला ॥ ८ ॥ ऐकूनिसच्छिष्याचाप्रश्न ॥ चित्तीं संतोषेब्रह्मनंदन ॥ मगशतश्लोकीभागवतकरून ॥ व्यासासीतेणेंसांगीतलें ॥ ९ ॥ सद्गुरुह्मणतीपराशरसुता ॥ हेंचिविस्तारूनिवदें आतां ॥ तेणेचित्ताचीहोईलस्थिरता ॥ आत्मस्वहितापावसी ॥ १० ॥ मगद्वैपायनसप्रेमभरित ॥ विस्तारेंवदेश्रीभागवत ॥ अठरासहस्रझालाग्रंथ ॥ उपनिषदर्थकेवळजो ॥ ११ ॥ मगशुकयोगींद्रेंपाहूनप्रीती ॥ त्याणेंबोधिलापरिक्षिती ॥ आणीकहीसाधकतरलेकिती ॥ त्यांचीगणतीनाहींकोणा ॥ १२ ॥ ऐशापरीवैकुंठनायका ॥ तूंप्रेमळांचाप्रियोत्तमसखा ॥ भागवतधर्म

निर्मूनि नौका ॥ भवपार लोकां करिसी तूं ॥ १३ ॥ त्या भागवताचा अर्थ निश्चिती ॥ कलियुगीं न कळे सर्वांप्रती ॥ यास्तव अवता
र घेतला संतीं ॥ प्राकृतमती वदावया ॥ १४ ॥ त्या संतांचीं नाना चरित्रें ॥ तूं विवदसी राजीवनेत्र ॥ मी तरी पुढें निमित्तमात्र ॥ बुद्धी
स्वतंत्र असेना ॥ १५ ॥ शिकविले बोल रावा बोलतां ॥ त्याचा नवलाव तो कोणता ॥ तेवी मंदबुद्धीचा प्रकाशिता ॥ नसे अनंता तु
जविण ॥ १६ ॥ मागील अध्यायाचे शेवटीं कथा ॥ भांबनाथ पर्वतीं तुका असतां ॥ कान्हया बंधू तेथें येतां ॥ रुक्मिणीकांता देखि
लें ॥ १७ ॥ निज भक्तासी देखोनि जाण ॥ देव पावले अंतर्धान ॥ जेथें लागले देवाचे चरण ॥ तें स्थान अद्यापी असे कीं ॥ १८ ॥ ते-
स्थळीं खिळारचोनि देखा ॥ कान्हयानें मांडिल्या पादुका ॥ मग नमस्कारून बंधु तुका ॥ सप्रेम सखा पावला तो ॥ १९ ॥ उभयतां
बंधू ते समयीं ॥ सत्वर चालिले देहूगावीं ॥ मग येऊनि इंद्रायणीचे डोहीं ॥ तुका ते ठायीं बैसला ॥ २० ॥ सात दिवसांचें निर्वाण ॥
उभयतांसी होतें जाण ॥ सूर्योदयीं करूनि स्नान ॥ सोडिलें पारणें ते स्थळीं ॥ २१ ॥ मग कान्हयापासूनि वैष्णवभक्तें ॥ मंदिरीं हू
न आणविलीं खतें ॥ लोकांवरी वडिलांचें द्रव्य होतें ॥ तेव्हां बोलत कान्हयासी ॥ २२ ॥ अनुभवन सतांचि जाण ॥ व्यर्थचि पु-
स्तकींचें ज्ञान ॥ तैसेंचि परहस्तींचें धन ॥ दुश्चित मन सर्वदा ॥ २३ ॥ आमचें देयील किंवा नाहीं ॥ ऐसी दुराशा आठवे जीवीं ॥
यास्तव इंद्रायणीच्या डोहीं ॥ खतें येथें बुडवितों ॥ २४ ॥ ऐसें पुसतां भक्तप्रेमळ ॥ कान्हया बोले ते वेळ ॥ तुह्मी तों विरक्त झा
लां केवळ ॥ प्रपंच सकळ मज मागें ॥ २५ ॥ आह्मीही वडिलांसी सांगूं नये ॥ पुढें लेंकरें करितील काय ॥ जाणूनि कान्हयाचा

मनोदय ॥ योजिलीसोयतुकयानें ॥ २६ ॥ दोनविभागकरूननिश्चित ॥ कागदबुडविलेउदकांत ॥ अर्धविभागकान्हयातें ॥ देऊनिबोलतकायतया ॥ २७ ॥ आजपासोनीआह्माकारणें ॥ कंथाशीतनिवारणें ॥ भिक्षामागोनिसेविजेअन्न ॥ निर्विघ्नयेणेंयोगचाले ॥ २८ ॥ आणितुह्मासीउदीमहातवटी ॥ करणेंलागेलप्रपंचराहटी ॥ दोहींचीपडेलकैसीगांठीऐका तेंगोष्टीसांगतों ॥ २९ ॥ भिक्षाआणिव्यवसाय ॥ याचाकाळाकरूंनये ॥ ऐसाऋषिसुखेंपाहे ॥ झालाआहेनिवाडा ॥ ३० ॥ ऐसेंऐकोनितेअवसरीं ॥ कान्हयावेगळासंसारधरी ॥ आतांनिर्वाणत्यागतुकयावरी ॥ कैशापरीतेंऐका ॥ ३१ ॥ लज्जालौकिकटाकोनिमानसीं ॥ चित्तलाविलेंचिंतनासीं ॥ विरक्तीचेनिबळेंफासी ॥ इंद्रियेंनेमेसीआकळिलीं ॥ ३२ ॥ अल्पआहारसेवितांजाण ॥ तेणेंचिइंद्रियेंझालींक्षीण ॥ निद्राआळसनयेविस्माणे ॥ अनुतापेंभजनकरीतसे ॥ ३३ ॥ स्नानकरूनिप्रातःकाळीं ॥ जायपांडुरंगाचेदेउळीं ॥ पूजाअर्चनकरूनसकळी ॥ मगवनस्थळींजातसेपैं ॥ ३४ ॥ देहूपासूनिपश्चिमेस ॥ भांडारपर्वततीनकोश ॥ तुकाजाऊनत्यास्थळास ॥ एकांतीबैसेनिश्चिती ॥ ३५ ॥ तंवश्रोतेआशंकितहोऊनिचित्तीं ॥ वक्तयालागींप्रश्नकरिती ॥ कींतुकयासीभेटलारुक्मिणीपती ॥ सगुणमूर्त्तीसाक्षांत ॥ ३६ ॥ देवाचीभेटझालीअसतां ॥ तरीइंद्रियांसीनेमकासयावृथा ॥ ऐसासज्जनीप्रश्नकरितां ॥ तरीतेंचिआतांपरिसिजे ॥ ३७ ॥ वासरमणीउगवतांपाहे ॥ सकळजीवासीदर्शनहोय ॥ परीतोकोणाच्यास्वाधीननोहे ॥ उभानराहेक्षणभरी ॥ ३८ ॥ तेवीदैवयोगेंकरूनसाचार ॥ एक-

दां भेटला इंदिरावर ॥ तो जवळी असावा निरंतर ॥ ऐसें अंतर तुकयाचें ॥ ३९ ॥ भक्तासीं झालि भगवत्प्राप्ती ॥ तरी ते सप्रेम भजन करिती ॥ गंगेसी भेटला अपांपती ॥ परी मारुती धांवे चपळलें ॥ ४० ॥ प्रभंजन ब्रह्मांडीं भेदला पाहे ॥ सर्वांठायीं व्यापक आहे ॥ परी तो चंचळपण सांडितो काय ॥ निश्चळ न राहे क्षणभरी ॥ ४१ ॥ तैशा त्वरीती भगवज्जन ॥ स्वरूपीं मिळाले अभिन्नपणें ॥ परी एकाचे विभाग दोन करून ॥ करिती भजन अहर्निशी ॥ ४२ ॥ चक्षुश्रवत्याच्या आंगावरी जाण ॥ पहुडला लक्ष्मीनारायण ॥ उभयतांचा एकांत पूर्ण ॥ त्याजकारणें विदीत ॥ ४३ ॥ सेजारती झालिया निश्चित ॥ आपुलाल्या स्थानीं जाती भक्त ॥ परिशेषासीं वियोग नाहीं किंचित ॥ परी सप्रेम भजत श्रीहरीतें ॥ ४४ ॥ तैसा च तुका वैष्णववीर ॥ अविट आवडी त्याची थोर ॥ एकांत जाऊन पर्वतावर ॥ भजन साचार करीतसे ॥ ४५ ॥ अहंता टाकून सर्वस्वें ॥ जनविजन समान भासे ॥ मीपणाचें नाव कैसें ॥ तेंहीं स्वप्नास न ये कीं ॥ ४६ ॥ मूळींहूनि अहंता त्यागितां पाहे ॥ तरी सहजचि निरसिलें संसारभय ॥ तैसा निमोनि गेला देह ॥ मग रोग होय कोणासी ॥ ४७ ॥ तैशा त्वरीती तुकयानें तत्वता ॥ संसारमूळ त्यजिली अहंता ॥ मग नित्य जाऊनि एकांता ॥ रुक्मिणीकांता आठवी ॥ ४८ ॥ नामस्मरणावीण जाण ॥ आणीक सर्वथा नाहीं साधन ॥ ऐसा निश्चय केला पूर्ण ॥ करीत भजन अहर्निशी ॥ ४९ ॥ ध्यानांत आणूनि पांडुरंगमूर्त्ती ॥ लाविलीं दोनी नेत्रपातीं ॥ ह्मणे तुझिया नामावीण श्रीपती ॥ आणीकु विश्रांती मज नाहीं ॥ ५० ॥ नाम हें चि माझें उग्र तप ॥ नाम हें चि माझा मित्र जप ॥ नाम हें चि माझें व्रत अनुप ॥ निष्पाप नामें होई

नमीं ॥ ५१ ॥ नामहेंचिमाझाकुळाचार ॥ नामहेंचिकुळधर्मथोर ॥ नामावीणनाहीं आधार ॥ हाचिनिर्धारश्रीहरी ॥
॥ ५२ ॥ नामावीणधनवित्तकांहीं ॥ आणीकसांगावयासीयेतनाहीं ॥ आतांभवसागरविठाबाई ॥ उतरूनिनेईपैलतीं
रा ॥ ५३ ॥ नामेशीतळझालाशंकर ॥ वाल्मीकेंकथिलेंश्रीरामचरित्र ॥ प्रल्हादभक्तनामेंचिथोर ॥ झालाअसेत्रिभुवनीं
॥ ५४ ॥ ऐसानामाचामहिमाथोर ॥ जाणतीसंतवैष्णववीर ॥ ध्रुवबाळकनामेंसाचार ॥ अढळपदीं बैसला ॥ ५५ ॥ नामें
तरलाउपमन्युबाळ ॥ किंवाबिभीषणभक्तप्रेमळ ॥ तयासीलंकेचेंराज्यसकळ ॥ अक्षयीदिधलेंश्रीरामें ॥ ५६ ॥ ऐशाचरी
तीनित्यानित्य ॥ एकांतींतुकाकरुणाभाकित ॥ सायंकाळींगांवांतयेत ॥ आनंदेंनाचतदेउळीं ॥ ५७ ॥ देखोनिलोकह्म-
णतीत्यास ॥ तुकयासीलागलेंअसेपिसें ॥ नामगातसेरात्रदिवस ॥ संसारआससांडिली ॥ ५८ ॥ एकह्मणतीव्यापार
खोटा ॥ उदिमकरितांआलातोटा ॥ ह्मणऊनिसुखींभरलाफांटा ॥ बडबडीचोहटांभलतेंची ॥ ५९ ॥ एकह्मणतीइंद्राय
णीत ॥ तुकयानेंअवघींबुडविलींखतें ॥ प्रपंचटाकोनीनिश्चित ॥ धरिलापरमार्थतेंहुनी ॥ ६० ॥ एकह्मणतीविशेषपा
हें ॥ प्रपंचटाकितांलाभकाय ॥ पोटकोणासीसुटलेंआहे ॥ नचलेचिदेहअन्नाविण ॥ ६१ ॥ टाकोनियांमुलेंलेंकुरें ॥ जा
ऊनिबैसतोपर्वतावर ॥ परीभिक्षामागेघरोघर ॥ क्षुधातुरहोतांची ॥ ६२ ॥ एकह्मणतीटाकोनिआपुलाधंदा ॥ व्यर्थ
कांकरितांत्याचीनिंदा ॥ संसारींबहुतांचीझालीआपदा ॥ तेकायगोविंदाभजताती ॥ ६३ ॥ ऐशारीतीत्रिविधजन ॥ ना

नापरीचींबोलतीवचनें ॥ परीतुकाआनंदयुक्तमनें ॥ नाहींदेहभानसर्वथा ॥ ६४ ॥ राजबिदींतूनिवारण ॥ चालता
उदंडभुंकतीश्वानें ॥ परीत्याचेंभयनधरूनिमनें ॥ स्थिरगमनेचालतसे ॥ ६५ ॥ ऐकोनिसागराचीगर्जना ॥ अगस्ती
भयनधरीचमना ॥ तेवींलोकदुरुक्तीबोलतीनाना ॥ परीविक्षेपमनानवाटे ॥ ६६ ॥ जननिंदेचेयेतांलोट ॥ शांतिउदरीं
भरितसेघोट ॥ कामक्रोधांचीमोडलीवाट ॥ करणीअचाटनिरूपम ॥ ६७ ॥ आशातृष्णामोहमाया ॥ कामक्रोधाच्यामो
डिलेंठाया ॥ पुढेंब्रह्मचिकरीलकाया ॥ वैष्णवतुकयाहेंचिसाच ॥ ६८ ॥ सप्रेमभावधरूनिचित्तीं ॥ नित्यपूजितसेपांडुरंग
मूर्ती ॥ दिवसाअरण्यांतएकांतीं ॥ भजनप्रीतीकरीतसे ॥ ६९ ॥ एकइंद्रायणीच्यातीरींनिश्चित ॥ करंजायामावल्याअ
सतीतेथ ॥ तयेस्थळींवैष्णवभक्त ॥ भजनकरीतबैसला ॥ ७० ॥ तयासमीपकृषियानें ॥ शेतपेरिलेंहोतेंजाण ॥ तेंपि
कासीआलेंसघन ॥ उमटलेकणतयावरी ॥ ७१ ॥ शेतपाहुनीचहूंफेर ॥ कृषिवळनिघालासत्वर ॥ येउनितुकयासमो
र ॥ कायउत्तरबोलिला ॥ ७२ ॥ ह्मणेतुकशेटऐकावचन ॥ माझ्याशेतींबैसाराखण ॥ अर्धमणदाणेतुह्मासीदेईन ॥
कुटुंबरक्षणकरावया ॥ ७३ ॥ सहजरिकामेंबैसलांघरीं ॥ संसारचालेलकैशापरी ॥ तरीशेतींबैसोनिनिरंतरीं ॥ येथें
चिहरिहरीभजावा ॥ ७४ ॥ ऐकोनितयाचेंउत्तर ॥ अवस्यह्मणेवैष्णववीर ॥ तेथोनिउठिलासत्वर ॥ जातबरोबरतया
च्या ॥ ७५ ॥ तुकयाचीऐसीस्थित ॥ जोजेंह्मणेतेऐकेमात ॥ आग्रहनकरीचकिंचित ॥ परोपकारार्थजाणोनी ॥ ७६ ॥ ता

न्हयाबाळाचीजैसीस्थिती ॥ बरेंवाईटदेतांचिहातीं ॥ मुखींघालीतसत्वरगतीं ॥ अनमानचित्तींनकरितां ॥ ७७ ॥ नात
शीकांजैसेंतोय ॥ साकरघालितांगुळचटहोय ॥ नातरीलवणमेळवितांपाहें ॥ क्षारत्वलाहेतत्काळ ॥ ७८ ॥ तैसीतुकया
चीस्थितीपाहीं ॥ कवणेविषयींआग्रहनाहीं ॥ जोजेंह्मणेलजेसमयीं ॥ तेंचिसर्वहीकरीतसे ॥ ७९ ॥ मगकृषियानेतेअ
वसरीं ॥ तुकयासीनेलेंबरोबरी ॥ गोफणदिधलीत्याचेकरीं ॥ ह्मणेमाळ्यावरीबैसआतां ॥ ८० ॥ तुझ्यास्वाधीनकेलेंक्षे
त्र ॥ राखीनजायदिवसरात्र ॥ सवगणीसयेईलजोवर ॥ तोवरकरारअसावा ॥ ८१ ॥ आदमणदाणेकेलेकरार ॥ तेमीदेयी
नराशीवर ॥ ऐसेंबोलोनियाउत्तर ॥ कुणबीसत्वरतोगेला ॥ ८२ ॥ स्वस्थधारणजयेदेशीं ॥ गेलाआपणदाणेआणावया
सी ॥ शेतींबैसविलेंतुकयासीं ॥ घरींमनुष्यासीसांगीतलें ॥ ८३ ॥ इकडेतुकावैष्णवभक्त ॥ माळ्यावरीजाऊनित्वरित ॥
भोंवतेंविलोकूनिपाहात ॥ तोंपक्षीबैसतशेतावरी ॥ ८४ ॥ ह्मणेहेईश्वराचेजीव ॥ क्षुधातुरअसतीसर्व ॥ आपणह्म
णवितोंभक्तवैष्णव ॥ तरीनउडवावेसर्वथा ॥ ८५ ॥ मागेंदुष्काळबहुतहोता ॥ विश्वभाग्येंपिकआलेंआतां ॥ आपण-
यासीउडवितां ॥ तरीव्हावेंदुरिताअधिकारी ॥ ८६ ॥ ऐसेंह्मणोनिप्रेमळभक्त ॥ माळ्यावरउगाचिबैसत ॥ जैसेंबुजावणें
मनुष्यदिसत ॥ परीजीवकिंचितत्यानाहीं ॥ ८७ ॥ दोनप्रहरयेतांचिदिनकर ॥ पक्षीयांसीबोलेमधुरोत्तर ॥ आतांपोट
भरलेंअसेलजर ॥ तरीजावेंसत्वरउदकासीं ॥ ८८ ॥ ऐसेंबोलोनीत्यांजकारणें ॥ निवांतबैसेकरीतभजन ॥ हरीनामा

वीउमटेधून ॥ ऐकतीदुरूनगांवकरी ॥ ८९ ॥ घरींवाटपाहातसेराणी ॥ ह्मणेघरासीनयेआझुनी ॥ कोठेंबैसलासेजाउनी ॥
कोणतेवनीपाहावें ॥९०॥ लज्जाअहंकारटाकोनी ॥उगाचिफिरतोजनींवनीं ॥ सोडिलेंसंसारासीपापी ॥
कायसाजणीकरूंआतां ॥९१॥ कन्येसीह्मणेबाहेरजाय ॥ पिसाकोठेंबैसलाआहे ॥ मजलाक्षुधालागलीपाहें ॥जेवि
तांनयेत्याजविण ॥९२॥ वडिलकन्याकाशीबाई ॥ धांवतगेलीलवलाहीं ॥तुकयाह्मणेतेसमयीं ॥ चालगृहींजेवावया
॥९३॥ तिजलादेतसेप्रतिवचन ॥ आह्मींशेतींबैसलोंराखण ॥ त्याणेंदेऊंकेलेंधान्य ॥ घरींजाऊनसांगआतां ॥९४॥
कन्यापरतोनिआलीत्वरित ॥ मातेसीसांगतलावृत्तांत ॥ आवलीअन्नपाठवीतेथ ॥ मगआपणजेविततेधवां ॥९५
तुकाभाकरखाऊनितेथ ॥ विचारकरितसेमनांत ॥ ह्मणेरात्रदिवसराहावेंयेथ ॥ येरझारव्यर्थकासया ॥९६॥ प्रातः
स्नानकरूनिनिश्चिती ॥ देउळींपूजीतसेपांडुरंगमूर्ती ॥ मगसत्वरयेऊनियांशेतीं ॥ भजनएकांतींकरितसे ॥९७॥ सा
यंकाळहोतांएकवेळ ॥ पक्षीयांसीह्मणेउठासकळ ॥ बहुतपडतांअंधकारसबळ ॥ मार्गसाचारनदिसेतुह्मां ॥९८॥ ऐ
सेंह्मणऊनिवैष्णवभक्त ॥ एकदांपक्षीयांसीउडवित ॥ ह्मणेप्रातःकाळहोतांचिसमस्त ॥ यावेंत्वरितयाठाया ॥९९॥ दे
खोनिपक्षियांचीरीती ॥ तुकाविस्मितहोयचित्तीं ॥ ह्मणेच्यारदाणेयेथेंचिखाती ॥ घरासीननेतीकांहींच ॥१००॥ यां
जसारिखेंमाझियाजीवा ॥ कधींकरिसीलदेवाधिदेवा ॥ तुजवांचूनिआमचाहेवा ॥ कोणकेशवापुरवील ॥१०१॥ मा

झेंलपोअसतेंपण ॥ नामरूपासीपडोखंडण ॥ आत्मवत्‌देखेअवघेजन ॥ नसोदेहभानकिंचित ॥ १०२ ॥ सोइरेस-
ज्जनसंबंधीपाहे ॥ याणीनधरावीमाझीसोय ॥ जीतकांमेलामाझादेह ॥ मत्स्यानयेतेंकरी ॥ १०३ ॥ प्रभंजनेंउडेग
लीतपान ॥ तैसेंव्हावेंमाझेंचालणें ॥ स्वसुखेंतुझेवर्णीनगुण ॥ तेंउचितदानमजदेयीं ॥ १०४ ॥ पक्षीश्वापदेंतरुवर-
जाण ॥ ब्रह्मादिपिपीलिकाआदिकरून ॥ सर्वत्रव्यापकएकचैतन्य ॥ लेखीसमानतेंकरी ॥ १०५ ॥ सोनेंआणीदगड
माती ॥ माझ्यादृष्टीसारिखींदिसती ॥ दुराशाकदानुपजोचित्तीं ॥ ऐसेंश्रीपतीकरावें ॥ १०६ ॥ अपशब्दबोलकानींप
डती ॥ अथवाकेलीकोणीस्तुती ॥ तेसमानवाटेमजप्रती ॥ ऐसीस्थितीकरीमाझी ॥ १०७ ॥ ऐशाचरीतीतुकानित्य ॥
चित्तींकल्पीतमनोरथ ॥ हृदयींभरलापंढरीनाथ ॥ स्वानंदभरितसर्वदा ॥ १०८ ॥ गोवरघालोनीतयेठांयीं ॥ हुताशन
चेतवीतपाहीं ॥ किंचित्‌निद्रायेतांचिदेहीं ॥ जागृतलवलाहीहोतसे ॥ १०९ ॥ सकळगांवींचेपक्षीनिश्चित ॥ तेथेंचि
येतीनित्यानित्य ॥ कणखातांचिवैष्णवभक्त ॥ संतोषपावतकैशारीती ॥ ११० ॥ जैसाकनवाळूदातानिश्चिती ॥ स्वगृ-
हींजेववितनित्यद्विजपंक्ती ॥ तुकयासींसंतोषतैशाचरीती ॥ पुरवीतआर्तक्षुधितांची ॥ ११ ॥ एकमासलोटतांऐ-
शापरी ॥ तोंखेपकरूनिआलाशेतकरी ॥ ह्मणेधान्यपिकलेंकैसेंतरी ॥ येअवसरींपाहावें ॥ १२ ॥ ऐसेंह्मणोनिलव-
लाहीं ॥ शेतासींआलातेसमयीं ॥ तोंकाळींकणसेंपिशासर्वही ॥ कणएकहीदिसेना ॥ १३ ॥ परमसंतापवाटलाते

ऱ्हां ॥ अधरखाऊनिचावितसेजिव्हा ॥ ह्मणेतुकयानेसाधिलादावा ॥ न्यायसांगावाकवणासी ॥ ११४ ॥ ऐसेंह्मणऊनिचित्तांत ॥ ऱ्यारीकोंपरेहिंडोनिपाहत ॥ त्याच्याभयेंकरूनिनिश्चित ॥ पक्षीसमस्तउडाले ॥ १५ ॥ जैसेंभोजनहोतांचिपाहे ॥ तयामाजीअंत्यजजाय ॥ मगब्राह्मणउठतीलवलाहें ॥ जेवितांग्रासटाकोनी ॥ १६ ॥ असोआतांशेतकरीयानें ॥ दशदिशापाहिल्याहिंडोन ॥ तोंशेतभक्षिलेंपक्षीयानें ॥ एकहीकणदिसेना ॥ १७ ॥ तोंमाळ्यावरबैसोनिनिश्चित ॥ प्रेमळतुकाभजनकरित ॥ नानाअपशब्दबोलतबोलत ॥ कुणबीयेतलवलाहें ॥ १८ ॥ सक्रोधेंतुकयासींबोलतउत्तर ॥ कैसेंबुडविलेंमाझेंघर ॥ तूंसहापायल्यांचाचाकर ॥ एकमासभरठेविलाम्या ॥ १९ ॥ तुजवरीविश्वासठेऊनियां ॥ मीगेलोंखेपआणावया ॥ तुवांशेतचारिलेंपक्षिया ॥ हूं हू तुकयासाधिलें ॥ २० ॥ ऐसेंह्मणऊनिक्रोधदृष्टी ॥ धरूनवोढिलामणगटीं ॥ ह्मणेखपाट्यासींपडलीगांठी ॥ आतांनव्हेचिसुटीसर्वथा ॥ २१ ॥ एकदुर्जनएकसंत ॥ एकविषकंदएकअमृत ॥ दैवयोगेंगांठीपडत ॥ तैसेंचिनिश्चितहेंझालें ॥ २२ ॥ कींएकसमुद्रएकअगस्ती ॥ एकराहूएकनिशापती मिळणीहोयप्रारब्धगती ॥ तैसीचगतीहेझाली ॥ २३ ॥ कींराजहंसआणिससाणाएक ॥ कींएकश्रोत्रियएकहिंसक ॥ कींव्यारिणीआणिपतिव्रतेसींदेख ॥ गांठीनावेकपडियेली ॥ २४ ॥ कींएकनिंदकखळकुटिळ ॥ एकवैष्णवभक्तप्रेमळ ॥ एकशुचिर्भूतएकअमंगळ ॥ मिळणीमिळेअवचिता ॥ २५ ॥ तैशाचरीतीतुकयाकारणें ॥ वोढोनिचालविलेंकुण-

बीयानें॥ पाटीलकुळकर्णीबैसलेजाण॥ आलाघेऊनित्याठाया॥२६॥ पिटीततोंडवक्षस्थळ॥ आबावेंमांडिलेंतयेवेळे
॥दैवदत्तकुणबीमत्तनकळे॥ अहाणासकळबोलती॥२७॥ ऐसेंदेखोनिलवलाहें॥ ग्रामस्थपुसतीझालेंकाय॥ मगआ
घंतवृत्तांतसांगताहे॥ करावेंकायमीआतां॥२८॥ तुकयासींपुसतीतेवेळे॥ मगसत्यसांगेभक्तप्रेमळ॥ ज्याच्यावाचेसीं
असत्यमळ॥ अणुमात्रविटाळस्पर्शेना॥२९॥ ह्मणेहामजसींबोलिलावचन॥ धान्यदेईनआदमण॥ माझ्याशेतीवै
सेंराखण॥ तेंत्यामान्यमगकेलें॥१३०॥ मजसींइतुकेंबोलिलाउत्तर॥ माळ्यावरबैसोनिराखींपाखरें॥ तींत्याउडवि-
लींअसतींजर॥ तरीमरतींसाचारअवचिता॥ ३१॥ पक्षीमिळोनियांसमस्त॥ च्यारच्यारदाणेखातीनित्य॥ घरासीन-
व्हतेकांहींनेत॥ मगत्यानिश्चितवर्जावें॥३२॥ पक्षीरक्षावेहेंवचन॥ ह्मणऊनिकेलेंत्यांचेंपाळण॥ ऐकूनितुकयाचें-
बोलणें॥ सकळजनहांसती॥३३॥ ऐसीऐकोनियांवार्त्ता॥ संतापशेतकरीयाच्याचित्ता॥ ह्मणेपाटीबांधोनिजातोंआ
तां॥ आपुल्याशेतासांभाळा॥३४॥ ग्रामस्थह्मणतीत्याअवसरा॥ देणेलागतोदिवाणसारा॥ कुणबीपळोनिगेलिया
खरा॥ विच्यारबरामगनाहीं॥३५॥ शेतकरीयासीपुसतीसहज॥ धान्यकितीकहोतसेतुज॥ तेंयथार्थविसांगआज
सत्यउमजधरूनियां॥३६॥ कुणबीसांगेतयेदिवसीं॥ दोनखंडीधान्यहोतसेमजसीं॥ सत्यसांगतोंतुह्मापासीं॥ साक्षी
गोष्टीसीउदंड॥३७॥ ग्रामस्थतुकयासींबोलत॥ तुह्मीस्वसुखेंसांगताखादलेंशेत॥ घरींतोंऐवजनाहींदिसत॥ तरीह्या

वैंखतलिहूनियां ॥ ३८ ॥ नायकालजरी आमचेंवचन ॥ तरी आतांचिजाईलपळोन ॥ आसामीयाची भरीलकोण ॥ म
गदंडील द्विगुणा आह्मासी ॥ ३९ ॥ यालागींसांगतोंतुह्मांसी ॥ रोखालिहूनद्यावायासीं ॥ शेतींपिशाराहिल्यात्यासीं ॥
आपुल्याघरासींतुह्मींन्या ॥ ४० ॥ अवश्यह्मणतांवैष्णवभक्त ॥ गाहीसुद्धांलिहिलेंखत ॥ कुणबीयाच्याहातींदेत ॥ सं
तोषयुक्ततोझाला ॥ ४१ ॥ पाहोनिकागदींचेंधन ॥ मूर्खासीझालेंसमाधान ॥ निजस्वहितासीनाडलातेणे ॥ विष्णुमहि-
मानकळेना ॥ ४२ ॥ ग्रामस्थींकरूनिपंचाईती ॥ कज्जातोडिलाऐशारीती ॥ ह्मणतीशेतखादलेंतेंसत्वरगती ॥ पाहावेंनि
श्चितीजाऊनियां ॥ ४३ ॥ गांवच्यापांड्यासमवेत ॥ पाहावयाचालिलेशेत ॥ तोंकौतुककरीपंढरीनाथ ॥ तेंऐकानिजभ
क्तभाविकहो ॥ ४४ ॥ पहिल्यापरिस दशगुणेविशेष ॥ कणदाटोनिभरलींकणसें ॥ आणिककथाबहुतअसे ॥ या
मस्थदृष्टीसपाहती ॥ ४५ ॥ पक्षियांचाडंशपाहीं । कोठेंनदिसेएकेगांयीं ॥ देखोनिविस्मितझालेसर्वही ॥ ह्मणती
नवाईअगाधहे ॥ ४६ ॥ मागेंसांगतहोताकजिया ॥ तोंशेतकरीह्मणतसेनया ॥ खतफिरोनिद्यावेंतुकया ॥ शेतमाझि
यास्वाधीनकरावें ॥ ४७ ॥ ग्रामस्थह्मणतीतयेक्षणीं ॥ पंचाईतफिरेलकैसेनी ॥ आह्मासींशब्दठेवीलकोणी ॥ ऐसी
करणीनकरावी ॥ ४८ ॥ पिशाचकणसेंझालींसाचीं ॥ हे तोंकरणीविठोबाची ॥ देवासींचिंतातुकयाची ॥ प्रचीतत्या
ची आलीकीं ॥ ४९ ॥ तुजलालिहूनदिधलेंयाणें ॥ तांचिकरारनदळेजाण ॥ राशीवरदेईलतुझेंधान्य ॥ उरलेंतेंघेऊनि

जायीलपैं ॥ १५० ॥ ग्रामस्थह्मणतीतुकयाकारणें ॥ आपुल्याशेतींबैसराखण ॥ ऐकोनिह्मणेवैष्णवजन ॥ हेंनये-
होऊंसर्वथा ॥ ५१ ॥ आह्मीकांहींघेतलेंनसतां ॥ तोंएवढाअभिश्राप आलाहोता ॥ त्यासगळेंशेत अंगीकारितां ॥ पुढें
दंडकोणनाकळेना ॥ ५२ ॥ ऐसेंह्मणऊनिवैष्णवभक्त ॥ सप्रेमभावेंभजनकरित ॥ मगएकमोलकरीकरूनिग्रामस्थ
राखणतेथेंबैसविती ॥ ५३ ॥ मजूरलाऊनिवेटाळिलेंशेत ॥ राशीझालियामोजूनिपाहात ॥ तोंसतराखंड्याचें आलें
गणित ॥ विस्मितचित्तसकळांचें ॥ ५४ ॥ ह्मणतीइतुकेंपीकजाण ॥ गांवांतझालेंनाहींकवणा ॥ अघटितईश्वराचीर
चना ॥ कौतुकेंनानादाखवी ॥ ५५ ॥ एकह्मणतीतुकयाचेघरीं ॥ दुष्काळींउपवासपडिलेभारी ॥ तेंपारणेंव्हावयासी
सत्वरी ॥ त्यासीश्रीहरीपावला ॥ ५६ ॥ एकह्मणतीअसत्यउत्तर ॥ त्याकुणबीयाचेंदैवथोर ॥ तुकशेटवाणीदिवाळ
खोर ॥ दाणेजन्मवरनदेता ॥ ५७ ॥ एकह्मणतीपक्षीयाणीखादलेंकण ॥ त्याचेंबहुतझालेंपुण्य ॥ त्याचेंफळदेखिलें-
पूर्ण ॥ पीकसघनआलेंकीं ॥ ५८ ॥ असोत्रिविधजननानारीती ॥ आपुलाल्याकल्पनाबोलती ॥ वैष्णवीमायेचीअ
निवारभ्रांती ॥ सर्वांमतीअनावर ॥ ५९ ॥ मगदोनखंड्याधान्य ॥ त्यांतूनपहिल्याशेतकरीयासीदिधलेंजाण ॥ खत
दिधलेंहोतेंलिहून ॥ तेंहीमागूनघेतलें ॥ १६० ॥ तुकयासीह्मणतीगांवकरी ॥ हेंधान्यनेऊनसाठवींघरीं ॥ तूंतरीउ-
दासअंतरीं ॥ यास्तवश्रीहरीपावला ॥ ६१ ॥ ऐसेंग्रामस्थसांगतीमात ॥ परीतेनएकेचिप्रेमळभक्त ॥ दुराशानयेचित्तम

नांत ॥ उदासयुक्तसर्वदा ॥ ६२ ॥ निरापेक्षमुख्यवैराग्यलक्षण ॥ निरापेक्षासींचह्मणावेंसज्ञान ॥ निरापेक्षसाधकत्यासींचपूर्ण ॥ भक्तिसगुणठसावे ॥ ६३ ॥ निरापेक्षतेथेंवसेशांती ॥ निरापेक्षत्यासींचबाणेविरक्ती ॥ निरापेक्षापासींचउपरती ॥ संतोषचित्तींसर्वदा ॥ ६४ ॥ निरापेक्षाचासाचविवेक ॥ निरापेक्षत्यासींचमानितीलोक ॥ निरापेक्षापासींसकळिक ॥ सिद्धीअनेकतिष्ठती ॥ ६५ ॥ इतरस्थितीचीकायसीगोष्टी ॥ निरापेक्षभक्तिनिवडेशेवटीं ॥ तयासींचपावेजगजेठी ॥ इतरगोष्टीदांभिक ॥ ६६ ॥ ऐशास्थितीचींसकळलक्षणें ॥ तुकयाचेआंगींबाणलींचिन्हें ॥ यास्तवनानाचमत्कारपूर्ण ॥ रुक्मिणीरमणदाखवी ॥ ६७ ॥ असोमागीलगोष्टऐका ॥ धान्यदेतांविनघेतुका ॥ संकटपडिलेंगांवींच्यालोकां ॥ विचारनिकासूचेना ॥ ६८ ॥ तेथीलपांड्याभाविकपूर्ण ॥ महादाजीपंतनामाभिधान ॥ त्याणेआपुलेघरींजाण ॥ धान्यनेऊनसांठविलें ॥ ६९ ॥ ह्मणेदेवाच्याइच्छेनेपिकलेंजाण ॥ तेंसत्कर्मींचलावावेंपूर्ण ॥ पुढिलेअध्यायींनिरूपण ॥ ऐकतांसज्जनसंतोषती ॥ १७० ॥ अहोभक्तलीलामृतग्रंथ ॥ निश्चितहेंजाणावेंपरमामृत ॥ वैष्णवजनजेभाग्यवंत ॥ तेचिसेवितनिजप्रीती ॥ ७१ ॥ जेषड्वैरीजिंकोनिनिश्चित ॥ जनींवर्त्ततीद्वेषरहित ॥ त्यांसीचतीआवडीलागेलयेथ ॥ अधिकारइतरानेंअसेना ॥ ७२ ॥ जयासीभगवत्प्राप्तीचीचाड ॥ श्रवणभक्तीलागेगोड ॥ त्यासींचहेंचरित्रआवडे ॥ इतरासींगोडलागेना ॥ ७३ ॥ यास्तवतुह्मासंतांसीजाण ॥ सलगीकरूनधीटपणें ॥ आर्षनम्रबोलेवचन ॥ नेणतपणेंउद्धट ॥ ७४ ॥

श्रीमंतानेंआपुलेबोटीं॥ घातलीपितळेचीआंगुठी॥ तयासींलोकदेखोनिदृष्टी॥ कांचनह्मणोनीभावितील॥७५
॥ तैंशाचपरीतुह्मींसंतीं॥ अवधानदेतांमजप्रती॥ तरीमहिपतीचीविशाळमती॥ प्रख्यातह्मणतीजनलोक॥७६॥ स्व
स्तिश्रीभक्तलीलामृतग्रंथ॥ श्रवणेंविस्पुरतीमनोरथ॥ प्रेमळपरिसोतभाविकभक्त॥ षष्ठोध्यायगोडहा॥ १७७॥ ॥
श्रीकृष्णार्पणमस्तु॥ ॥श्रीमज्जगदीश्वरार्पणमस्तु॥ छ॥ छ॥ छ॥ छ॥

।। अध्यायसातवा ।।
भांडारपर्वत.
तुकाराम
आवळि.
विठोबा
विमानें
तिघेंभोजनकरितात.
आवळीचाकांटादेवकाढितो.

श्रीगणेशायनमः ॥ श्रीगोपालकृष्णायनमः ॥ आजि अनंतजन्मीचें दैवसाचें ॥ उदयासि आलें श्रोतियांचें ॥ ह्मणोनिउ
द्धारयेतीवाचे ॥ चरित्रसंतांचें वर्णावया ॥ १ ॥ प्रजेच्याभाग्येंकरूननिश्चिती ॥ अंबुधर अपार वर्षे क्षिती ॥ कींविबुधांच्या
दैवयोगरीती ॥ रत्नेंनिघतीसागरांत ॥ २ ॥ कींराजहंसाचेंथोरकपाळ ॥ यास्तवनिपजतीमुक्ताफळ ॥ कींसुंदरासीव्हावया
अलंकारतत्काळ ॥ निपजेसोज्वळकांचन ॥ ३ ॥ कींप्रकाशमानव्हावयाक्षिती ॥ नभमंडळींप्रकटेगभस्ती ॥ कींशोभायमानदिसावयाराती ॥ रोहिणीपती अवतरला ॥ ४ ॥ नातरीसगुणमूर्तीचेंव्हावयापूजन ॥ विधिनेंनिर्मिलींदिव्यसुमनेजा
ण ॥ तैसींसंतचरित्रेंझालींनिर्माण ॥ श्रवणासीभूषणश्रोतियांच्या ॥ ५ ॥ श्रवणझालियामननहोय ॥ पुढेंनिजध्यासल
गताहे ॥ मगसाधकांसीसाक्षात्कारहोय ॥ अनुभवेंप्रत्ययपाहावा ॥ ६ ॥ मागिलेअध्यायींकथानिश्चित ॥ पक्षीयानींखा
दलें शेत ॥ कौतुककेलेंपंढरीनाथें ॥ पीकअद्भुतआलेंकीं ॥ ७ ॥ तें तुकयानेंधान्यटाकूनिसकळ ॥ भजनकरीतसर्वकाळ ॥ सांडूनिप्रपंचतळमळ ॥ करीनिश्चळहरिभजन ॥ ८ ॥ घरींकांताहळहळकरित ॥ ह्मणे आलेंधान्यनघेचिसत्य ॥ संसा
रघातलापाण्यांत ॥ स्वतेंहीसमस्तबुडविलीं ॥ ९ ॥ लोकह्मणतीपीकआलें ॥ घरींतोंउपवासीमरतीमुलें ॥ दैवेंदिधलेंक
र्मेनेलें ॥ तैसेंचिझालेंआह्मासी ॥ १० ॥ असोकांताऐसापरी ॥ नित्यहळहळकरितसेघरीं ॥ परीतुकाआनंदयुक्तअंतरीं ॥ १
विचारकरीनेधवां ॥ ११ ॥ पांडुरंगाचेंदेवालयजाण ॥ भंगलेंहोतेंपुरातन ॥ तेंनीटकरावेंउकलोन ॥ होईलजागरणहरिक

था ॥१२॥ श्रवणझालियाहोयमनन ॥ मननापाठीनिजध्यासन ॥ मगसाक्षात्कारासीयेऊनिआपण ॥ होयविज्ञानसाधका
॥१३॥ ऐसासंकल्पकरूनमनीं ॥ देवालयउकलिलेंतयेक्षणीं ॥ आपुल्याहातींकुदळीघेउनी ॥ चिखलपाणीकरीतसे ॥१४
एकलाएकटाकरीलकाय ॥ कैसेंहोईलदेवालय ॥ ऐसेंजाणोनिपंढरीराय ॥ होतसेसाह्यकवणेरीती ॥१५॥ महादाजीपं
तासींदाविलेंस्वप्न ॥ धान्यठेविलेंखांसांठवून ॥ तेंदेवालयाच्याकामासीलावणें ॥ अवंचकपणेंसर्वार्थीं ॥१६॥ तेंचिआज्ञा
वंदोनिशिरीं ॥ मगयामस्थांसीविच्यारकरी ॥ म्यांस्वप्नदेखिलेंऐशापरी ॥ समाचारसत्वरीघेऊंआतां ॥१७॥ आश्चर्यकरून
आपुलेचित्तीं ॥ देवालयासीपहावयायेती ॥ तोंतुकाउकरीतसेभिंती ॥ कुदळीहातींघेऊनियां ॥१८॥ ह्मणतीदृष्टांतझा
लासाच ॥ आतांसाह्यकरावेंयाचें ॥ मगमजूरमाणसेंठेविलींपांच ॥ कारेगरत्यान्नेआणविले ॥१९॥ चिटादुदांड्याघेऊ
निविकत ॥ विष्णुआलयासीकामलावित ॥ देऊळसिद्धझालेंत्वरित ॥ धान्यसमस्तवेंचलें ॥२०॥ पुढेंउद्यापनराहिलेंपा
हीं ॥ ब्राह्मणभोजनासीधान्यनाहीं ॥ यासीउपावकरावाकाई ॥ तुकादेहींचिंतातुर ॥२१॥ ऐसेंजाणूनिरुक्मिणीपती ॥
कौतुककेलेंकैशारीती ॥ महादाजीपंतासीएकांती ॥ दृष्टांतरात्रीदाखविला ॥२२॥ ह्मणेतुह्मीग्रामवासीसमस्त ॥ पंचम-
हापातकीदिसत ॥ कैसीकेलीपंचाईत ॥ न्यायध्यानातनआणितां ॥२३॥ शेतकरीयासीपीकभरून ॥ तुकयापासोनिदे-
वविलेंजाण ॥ आणिराखणावळीचाआदमण ॥ तोकांठेऊनघेतला ॥२४॥ आतांतरींसावधपणें ॥ तयासींचावडीये-

बोलावणें ॥ वाटीसुद्धांधान्यघेणें ॥ तरीचकल्याणसर्वांसी ॥ २५ ॥ ऐसादृष्टांतहोतांचिपाहें ॥ महादाजीपंतविस्मित-
होय ॥ सकाळींचावडीसजाऊनिपाहें ॥ स्वप्नलवलाहेंसांगीतलें ॥ २६ ॥ ग्रामस्थआश्चर्यकरितीथोर ॥ ह्मणतीयथा
र्थचिपडिलें अंतर ॥ वेहरणआलें आह्मावर ॥ रुक्मिणीवरक्षोभविला ॥ २७ ॥ मगत्याकुणब्यासींबोलाऊन ॥ ग्रामस्थ
बोलतीअवघेजण ॥ पीकघेतलेंत्वांभरून ॥ दाणेआदमणठेविलेकां ॥ २८ ॥ मगतोबोलेतयांप्रती ॥ म्यादृष्टांतदेखिला
राती ॥ नेदीचतरीपांडुरंगमूर्त्ती ॥ क्षोभेलमजप्रतीनिश्चित ॥ २९ ॥ वाटीसुद्धांधान्यतेअवसरीं ॥ त्याणेंआणोनिदिधलें
सत्वरी ॥ आणीकहीसाहित्यझालेंबहुतांपरी ॥ चमत्कारभारीदेखोनियां ॥ ३० ॥ कोणीकणिककोणीतांदुळ ॥ कोणीघृ
तकोणीगुळ ॥ कोणीशाखाआणिडाळ ॥ साहित्यसकळहेंझालें ॥ ३१ ॥ सुदिनपाहूनिएकेदिनीं ॥ मूर्त्तीस्थापिलीसिं-
हासनीं ॥ मंत्रोक्तपंचामृतेंकरूनी ॥ चक्रपाणीन्हाणिला ॥ ३२ ॥ ब्राह्मणवैदिकस्वहस्तेंदेख ॥ देवासींकरितीअभिषेक ॥
वस्त्रेंलेववोनियांसुरेख ॥ उपच्यारअनेकतेकेले ॥ ३३ ॥ गंधाक्षतासुमनमाळा ॥ तुळसीबुकात्यावरीशोभला ॥ धूपदी
पनैवेद्यअर्पिला ॥ नमस्कारघातलासाष्टांग ॥ ३४ ॥ सप्रेमभरितहोऊनिसाचें ॥ तुकासभामंडपींनाचे ॥ अद्भुतप्रेमत्यास
मयांचें ॥ नयेवाचेवर्णितां ॥ ३५ ॥ ऐशारीतीउपच्यारजाणा ॥ देवासींकेल्याप्रदक्षिणा ॥ मगब्राह्मणबैसलेभोजना ॥ वि
डेदक्षिणात्यांसीदिल्ही ॥ ३६ ॥ देउळउद्यापनऐशारीती ॥ होतांतुकयासींसंतोषचित्तीं ॥ नित्यपूजीतोसगुणमूर्त्ती ॥ आ

वडी चित्तीं नित्य नवी ॥ ३७ ॥ निजांगें करावें कीर्त्तन ॥ ऐसी इच्छा धरिली मनें ॥ संत बोलिले पुरातन ॥ त्यांचीं वचनें पाठ केलीं ॥ ३८ ॥ पहिला अभ्यास कांहींच नव्हता ॥ आवडी आतां उपजली चित्ता ॥ प्राकृत अभंग शतकोटिकर्त्ती ॥ नामदेववार्त्ता बोलिले कीं ॥ ३९ ॥ त्या नामयाचे अभंग निश्चित ॥ पाठ करूनि गात नाचत ॥ हरिदिनीं सोंउपास करित ॥ संतांसमवेत जागरण ॥ ४० ॥ द्वादशी साधून करी पारणें ॥ यथाशक्ती ब्राह्मणासी अन्न ॥ दिंडीपताका मिरवणें ॥ वैष्णवचिन्हें बाणलीं ॥ ४१ ॥ आणिक संतांचे पाहिले ग्रंथ ॥ कबीर भक्त यवन विख्यात ॥ तयाचीं जीं वचनामृतें ॥ तीं पाठ करी प्रीतीनें ॥ ४२ ॥ आणिक अध्यात्मग्रंथ थोर ॥ स्वसुखें वदले ज्ञानेश्वर ॥ त्याची सुद्धप्रती साचार ॥ वैष्णववीरें मेळविली ॥ ४३ ॥ श्रीविष्णुअवतार एकनाथ देखा ॥ त्याणीं भागवतावरी केली टीका ॥ त्याचा प्रयत्न करून निका ॥ ग्रंथ नेटका मेळविला ॥ ४४ ॥ त्या ग्रंथाचें करावया मनन ॥ एकांतस्थळ योजिलें कोण ॥ रमणीक भांडारपर्वत जाण ॥ तेथ स्थळीं जाऊन बैसतसे ॥ ४५ ॥ ग्रंथाचें पारायण करूनी ॥ अर्थ अन्वय ध्यानासि आणी ॥ पूर्वाभ्यासीं जो शिरोमणी ॥ कैवल्यदानी-साह्य जया ॥ ४६ ॥ ग्रंथ व्हावया पाठांतर ॥ तुकयासी श्रम न लागती फार ॥ मनन करितां अहोरात्र ॥ सुखी अक्षरें बैसती ॥ ४७ ॥ प्रसादिक एकनाथाचीं वचनें ॥ जे कां भावार्थरामायण ॥ त्याचेंही पाठांतर पूर्ण ॥ निजप्रीतीनें करीतसे ॥ ४८ ॥ श्रीभागवतींच्या कथा सुरस ॥ स्वसुखें वदले महापुरुष ॥ त्यांहीं पाहिल्या सायासें ॥ लीला विशेष श्रीहरीची ॥ ४९ ॥ योगवा

सिद्धअमृतानुभवपूर्ण ॥ श्रीज्ञानेश्वरबोलिलेवचन ॥ त्याहीग्रंथांचेंकरूनिमनन ॥ अर्थशोधूनठेविला ॥ ५० ॥ आणी
कस्तुरापणेऐकतीफार ॥ परीमनननकरितीसाचार ॥ तेणेचित्याचापडेविसर ॥ संसारघोरवागविती ॥ ५१ ॥ चित्तशुद्धी-
नसलीजाणा ॥ आणिएकांतींबैसलादेवार्चना ॥ तरीपुढेंआढवेमनकामना ॥ तेरानोरानहिंडवी ॥ ५२ ॥ तैसीतुकयाची
नव्हेबुद्धी ॥ आधींकरूनिचित्तशुद्धी ॥ मगजाऊनिएकांतसंधी ॥ अर्थशोधीग्रंथाचा ॥ ५३ ॥ भांडारपर्वतींबैसेजाऊन ॥
परीतेथेंसर्वथानसेजीवन ॥ तेंहीझालेंअसेंनिर्माण ॥ निमित्तकारणतेंऐका ॥ ५४ ॥ तुकयाचीकांताहोतीकठिण ॥ ऐ-
सेंबोलतीसर्वत्रजन ॥ परीतिचेंस्वामिकाजींमन ॥ त्याजविणअन्ननसेवी ॥ ५५ ॥ भाकरपाणीघेऊनिनित्य ॥ पर्वतावरी
नेऊनिदेत ॥ दीडयोजनयेरझारनित्य ॥ करितांबहुतनिर्बुजली ॥ ५६ ॥ पंचप्राणभ्रतारापासीं ॥ परीविरोधचालवीदेवा
सी ॥ दर्शनानजायदेउळासी ॥ ह्मणेकाळादृष्टीसींनपडावा ॥ ५७ ॥ ह्मणेआमचापूर्वजविश्वंभर ॥ त्याणेंचआणिलादा
वेदार ॥ कुळींसंबंधलागलाथोर ॥ माझाभ्रतारवेडाकेला ॥ ५८ ॥ मुलेंलेंकुरेंकुटुंबफार ॥ यांसीमिळेनाअन्नवस्त्र ॥ म
जवरीटाकूनिसंसार ॥ पर्वतावरीबैसला ॥ ५९ ॥ च्यारघटिकालोटतांरात्र ॥ हळूचयेतोदेउळांत ॥ काळ्यापुढेंनृत्यकरित
॥ आगडधुतमेळऊनियां ॥ ६० ॥ प्रातःकाळींकरूनिस्नान ॥ त्यासेल्याचेंकरितोपूजन ॥ कोणतेजन्मींघेतलेंरीण ॥ तें-
चिउसणेफेडितो ॥ ६१ ॥ जवळगांवांतराहातांजरी ॥ तरीबोलीकोरडीदेतेंभाकरी ॥ येरझाराकरूंकितीतरी ॥ हेंनिर्धारी

उमजेना ॥ ६२ ॥ ऐसीतुकयाचीकांता ॥ आपुल्याघरींकरीतसेचिंता ॥ मगकरुणाआलीपंढरीनाथा ॥ अनाथनाथाविठोबासीं ॥ ६३ ॥ ह्मणेतुकाजाऊनिबैसेडोंगरीं ॥ हे मजगांजित्सेनानापरी ॥ आतांइचीयेरझाराहोईलदूरी ॥ तेंचरित्रनिर्धारींदाखऊं ॥ ६४ ॥ ऐसेंह्मणवोनिचक्रपाणी ॥ कौतुककेलेंतयेदिनीं ॥ एकभाकरभोंपळाभरपाणी ॥ आंवळीघेऊनजातहोती ॥ ६५ ॥ उष्णातीव्रझालेंथोर ॥ दिवसआलादोनप्रहर ॥ तोंकौतुककरीशारंगधर ॥ तेंऐकासादरभाविकहो ॥ ६६ ॥ पंथक्रमितांसाचार ॥ आवलीचीदृष्टीडोंगरावर ॥ ह्मणेआतांकिनीकउरलेंदूर ॥ उष्णातीव्रलागतसे ॥ ६७ ॥ पायींपायतननसेचिपाहीं ॥ खडेरुततीतेसमयीं ॥ तेणेकासाविसहोतसेहृदयीं ॥ तोंविघ्नआणीकहीवोडवलें ॥ ६८ ॥ करवंदीचाकांटाथोर ॥ मध्येंचहोतावाटेवर ॥ पायपडतांचीतयावर ॥ फुटोनसाचारवरआला ॥ ६९ ॥ तेणेंकासावीसहोऊनिमनीं ॥ मूर्छायेऊनपडलीधरणी ॥ भोंपळाभरहोतेंपाणी ॥ तेंउलंडोनीसांडलें ॥ ७० ॥ नेत्रउघडोनिपाहातसेपाय ॥ तोंत्यांतूनेरुधिरवाहतआहे ॥ ह्मणेम्याआतांकरावेंकाय ॥ ह्मणोनीधायमोकलित ॥ ७१ ॥ जन्मांतरींचेंहोतेंवैर ॥ तेंचिसाधिलेंसाचार ॥ पाठींबैसलादावेदार ॥ झालीमरमरसंसारीं ॥ ७२ ॥ माझ्याकंदींबांधूनमणि ॥ फुकटचिझालाअसेधणी ॥ दूरबैसतोजाउनी ॥ एकांतस्थानीपर्वतीं ॥ ७३ ॥ ऐशारीतीकरूनिरुदन ॥ कांटापाहानसेउपटोन ॥ परीतोसर्वथाननिघेचिजाण ॥ ह्मणेउपायकोणकरूंआतां ॥ ७४ ॥ माझ्याप्राक्तनाचीविचित्रगती ॥ विधिनेंलिहिलेंसंचितीं ॥ तेंनचुकेचिकल्पांतीं ॥ ह्म

णोनिविपन्न। भोगीनसे ॥७५॥ बहुतखर्चकरूनियांधन ॥ पितयानेंकेलेंथोरलग्न ॥ पिशाच्चेंपदरींबांधिलेंजाण ॥ सेव
टींघालूननिवडिलें ॥७६॥ आणिकोणेरीतीबंधूनेंसहज ॥ महायात्रेसीनेलेंमज ॥ तेंपुण्यउभेंनठाकेआज ॥ गेलीलाज
संसारीं ॥७७॥ बहुतद्रव्यखर्चोनिजाण ॥ माझीहीतुळाकेलीत्याणें ॥ येथेंपोटभरीनमिळेचिअन्न ॥ गेलेंपुण्यतेंवायां
॥७८॥ ऐशारीतीनरार्णी ॥ आवलीशोककरितसेमनीं ॥ परीदेवाह्मणवोनिनबोलवेवदनीं ॥ ह्मणेवैरीधांऊनियेईलतो
॥७९॥ माझाहूंदीरुक्मिणीवर ॥ त्यासींनकळोहासमाचार ॥ येथेंअकस्मातआलाजर ॥ तरीहांसेलसाचारमजला
गीं ॥८०॥ ह्मणेशिव्यादेनेंरात्रदिवस ॥ ह्मणऊनिकांटामोडलाअसे ॥ मगसंतोषवाटेलतयास ॥ तरीनहोऐसेंयेकाळीं
॥८१॥ विषमकाळेंघेतलीधांव ॥ तेंदुःखसोसिजेआपुल्याजीवें ॥ परीवैरीयासीतेंनसांगावें ॥ तरीचजन्मावेंसंसारीं ॥
॥८२॥ जीवींविषयवाटेगोमटा ॥ परीनिंदाकरितीलोकचोहटा ॥ तरीमायबापाचियापोटा ॥ व्यर्थकरंटातोआला ॥८३
॥ वर्मसांपडलेंवैरीयाहातीं ॥ तयासीनयावेंकाकुळती ॥ प्राणांतवोढवल्यानिश्चिती ॥ शरणत्याप्रतीनजावें ॥८४॥ ऐसा
निश्चयकरूनिमनें ॥ आवलीहळूचकरीरुदन ॥ कांटाननिघेचिप्रयत्नें ॥ उपायकोणकरावा ॥८५॥ हेंजाणूनिवैकुंठविहा
री ॥ ह्मणेतुकाबैसलाउपवासीडोंगरीं ॥ इचीतोंऐसीझालीपरी ॥ यास्तवश्रीहरीपावला ॥८६॥ सांवळासकुमारराजी
वनयन ॥ दिव्यपीतांबरनेसलाजाण ॥ मुकुटीझळकतीनानारत्नें ॥ भास्करासीउणेआणिती ॥८७॥ दिव्यकुंडलेंकानीं

नळपती ॥ गळांकौस्तुभवैजयंती ॥ पायींनेपुरें वांक्यावाजती ॥ दृष्टीं अवचितीदेखिला ॥ ८८ ॥ अवलीह्मणतसेतेवेळां ॥ हाकांयेथेंपातलामेला ॥ भ्रतारमाझावेडाकेला ॥ संसारीं अवकळायाचेनी ॥ ८९ ॥ माझी अवस्थाविपरीत ॥ देखोनिहांसेंयेईलयातें ॥ ह्मणवोनिसुखचंद्रपश्चिमेतें ॥ केलात्वरिततेसमयीं ॥ ९० ॥ तोलीळानाटकीजगदीश ॥ तिकडेही तैसाचिसन्मुखदिसे ॥ अष्टदिशाभोंवतेंचुकविनसे ॥ परीन्यूननसेकोठेंही ॥ ९१ ॥ तोंश्रोते आशंकितहोऊनिचित्तीं ॥ वत्यालागींप्रश्नकरिती ॥ अवलीचीनसतांप्रेमभक्ती ॥ द्वेषेंनिंदितीसर्वदा ॥ ९२ ॥ ऐसें असतांनिजकारणें ॥ देवकांदेतोबळेंचिदर्शन ॥ हाचिसंशयवाटतोपूर्ण ॥ तरितोनिरशनकरींकां ॥ ९३ ॥ ऐसासज्जनींप्रश्नकरितां ॥ उल्हासेंउत्तरदेतसेवक्ता ॥ द्वेषेंकरूनदेवभेटलाबहुतां ॥ हे तोंवार्त्तापुराणीं ॥ ९४ ॥ भक्तिभावेंपाहतांसाचार ॥ ध्यानासीनयेचिरामचंद्र ॥ द्वेषभावेंलंकानगर ॥ रावणासीसर्वत्ररामभासे ॥ ९५ ॥ तैसाचिकंसद्वेषकरी ॥ ह्मणेकृष्णाकेवळमाझावैरी ॥ याच्यादृष्टीपासूनिदूरी ॥ नहोयश्रीहरीसर्वथा ॥ ९६ ॥ तैसीतुकयाचीकांता ॥ ह्मणेदृष्टीसकाळानपाहेआतां ॥ ह्मणवोनिसायासनकरितां ॥ तीत्याभोंवताफिरतसे ॥ ९७ ॥ जैसीभिंगाचियासदनीं ॥ विष्णुमूर्त्तीस्थापिल्याकोणीं ॥ जिकडेपाहेतिकडेनयनीं ॥ चक्रपाणीदिसतसे ॥ ९८ ॥ हाहीदृष्टांतनसरेचियेथें ॥ अवलीचेंकंटाळलेंचित्त ॥ मगनेत्रझांकूनिनिवांतराहत ॥ तों आंतहीदिसतजगदात्मा ॥ ९९ ॥ ह्मणेकांहींइच्छानधरितांपोटीं ॥ वैरीकांउगाचिपडतोदृष्टी ॥ केशास्तवधेन

ळीमाझीपाठी ॥ यास्तवपोटींजल्पनसे ॥१००॥ ऐसीदेखोनितीचीस्थिती ॥ कायह्मणतसेवैकुंठपती ॥जेणेंआह्मा-
सीलावीलप्रीती ॥ तेचियुक्तीकरूंआतां ॥१॥ मगप्रकटहोऊनिपंढरीनाथ ॥ अवलीसनिजकरें आश्वासित ॥ ह्मणेक
न्यामाझीतूंनिश्चित ॥ चित्तींहेंतनधरावें ॥२॥ तूंमजह्मणसीदावेदार ॥ तरिस्याकोणतेंसाधिलेंवैर ॥ विदेहीकेलासा
ह्माभ्रतार ॥ हेंव्यर्थकिंउत्तरबोलसी ॥३॥ मुळींचफळदेंटींसुटलें ॥ मगवारालागनांखालींपडिलें ॥ तेवींतुकयाचेंनिमि
त्तभलें ॥ तैसेंचिआलेंमजवरी ॥४॥ नावरूपीलाऊनिचित्त ॥जाऊनिबैसतोअरंण्यात ॥तुजऐसेंझालेंमातें ॥ हिंडतसे
नित्यत्यामागें ॥५॥ तुह्मासींखावयानाहींअन्न ॥ यास्तवपीकआणिलेंसघन ॥ परीतुकासर्वथानघेचिधान्य ॥अन्या-
यकाययांतमाझा ॥६॥ ऐसेंह्मणवोनिपंढरीरायें ॥ मांडीवरीघेतलातिचापाय ॥ कांटाकाढूनिटाकिलापाहें ॥दुःखनो-
हे अणुमात्र ॥७॥ कृपादृष्टीपाहतांचिदेव ॥ मागीलक्लेशविसरलीसर्व ॥ तोमायालाघवीदेवाधिदेव ॥ नकळेमावब्र-
ह्मादिकां ॥८॥ अवलीह्मणतसेतेअवसरीं ॥ मजलाउशीरलागलाभारी ॥ पिसाबैसलाअसेडोंगरीं ॥ जावेंसत्वरी
त्याठाया ॥९॥ ऐसेंबोलूनियांउत्तर ॥ कुरकुलीघेतलीडोईवर ॥ जिजाईचालिलीसत्वर ॥ शारंगधरतिजमागें ॥११०॥
पर्वतींयेतांचिलवलाहें ॥ तुकानेत्रउघडोनिपाहे ॥ परमचित्तींविस्मितहोय ॥ ह्मणेअपूर्वआहेहेगोष्टी ॥११॥ आजि
रजनीआणिगभस्ती ॥ एकेठायींधरिलीवस्ती ॥ कींसमुद्रआणिअगस्ती ॥ ऐक्यासीयेतीनवलहें ॥१२॥ पंडितआ

णीअजापाळक ॥ सख्यपणें झालेएक ॥ विष अमृतमिळालेंदेख ॥ हें चिकौतुकवाटतें ॥ ११३ ॥ कांससाणा आणिरा
जहंसपाहीं ॥ सख्यलें मिळाले एकेठायीं ॥ तेवी अवलीसहितशेषशायी ॥ हें चिनवाई अगाध ॥ १४ ॥ ऐसें ह्मणवोनि
वैष्णववीर ॥ चित्तींसंतोषमानिलाथोर ॥ ह्मणेउभयतांचें होतें वैर ॥ तें झालें दूरयेसमयीं ॥ १५ ॥ घरकलहवाईट
जाणा ॥ विक्षेपवाटे क्षणक्षणा ॥ अवलीसभेटे वैकुंठराणा ॥ तरी आसुच्यामनांसंतोष ॥ १६ ॥ ऐशारीती भक्तप्रेम
ळ ॥ हर्षें वोसंडे तयेवेळ ॥ तों आवली आणिघननीळ ॥ आलीं जवळ उभयतां ॥ १७ ॥ तुकाउठोनिलवलाहें ॥ श्री
हरीचे धरिलेपाय ॥ मगअष्टभावें करूनिपाहे ॥ सद्गदितहोयतेधवां ॥ १८ ॥ तुकाआवलीजगज्जीवन ॥ स्वस्थबैस
लीं तिघेंजण ॥ मगप्रेमळभक्तकांतेसिह्मणे ॥ विठोबासीं भोजनघालीं कां ॥ १९ ॥ ऐसीऐकतांचिमान ॥ आवलील-
ज्जितचित्तांत ॥ ह्मणेएकभाकरआहे आंत ॥ कैसी दोघांतें पुरेलहे ॥ १२० ॥ मनांतपरमहोतसेकष्टी ॥ ह्मणे येथें हीका
व्यानेघेतलीपाठी ॥ धष्टपुष्टदिसतोमाझेदृष्टी ॥ कैसीगोष्टीकरूं आतां ॥ २१ ॥ ऐसें मनांतबोलोनीउत्तर ॥ देवाच्यापात्रीं
वाढिलीभाकर ॥ वेंचिलेंनाहीं अणुमात्र ॥ मगशारंगधरतुष्टला ॥ २२ ॥ अवंचकवृत्तीदेखोनिहरी ॥ अन्नेंनिर्मिलीं ना-
नापरी ॥ कुरकुलें भरूनिआलेंवरी ॥ वस्त्रत्यावरीझांकिलें ॥ २३ ॥ मागें क्षुधितहोतांश्रीकृष्ण ॥ मगद्रौपदीनेंदिधलें भा
जीपान ॥ कांहींचवेंचिलें नसतांजाण ॥ मगनिर्मिलीं अन्नेंनानापरी ॥ २४ ॥ तैसा अवलीचाभक्तिभावनाहीं ॥ परीविरो

धेंचितुष्टले शेषशायी ॥ मगआवलीसीं ह्मणती तेसमयीं ॥ तुकपासीलवलाहीं वाढीकां ॥ २५ ॥ ऐसें बोलतां रुक्मिणी
कांत ॥ जिजाईलज्जीत मनांत ॥ वस्त्रकाढोनी जंवपाहत ॥ तों भरलीं तयांत पक्वान्नें ॥ २६ ॥ परमविस्मित झाली मनीं ॥
ह्मणे मजपावली कुळस्वामिणी ॥ भैरव खंडेराव कीं भवानी ॥ त्यांहीं घेऊन रक्षिलें ॥ २७ ॥ कोणाचें कर्तृत्व हें नेणवे जाण ॥
ज्याणें रक्षिला माझा मान ॥ तयासी मी सर्वभावें शरण ॥ जीवें प्राणें असें कीं ॥ २८ ॥ जाणोनि आवलीचें मनोगत ॥ कायबो
लत रुक्मिणीकांत ॥ तूंजयासीं शरण निश्चित ॥ तोचमी अनंत नोळखसी ॥ २९ ॥ अन्नें निर्मिलीं देखत देखत ॥ हें माझें चि
कर्तृत्व जाण सत्य ॥ ऐसें सांगतां वैकुंठनाथ ॥ परी असत्य वाटत तिजलागीं ॥ १३० ॥ ह्मणे इतुकें सामर्थ्य असतें यया ॥ तरी
विदुराच्या कण्या खाता कासया ॥ द्रौपदीसीं हात वोडवोनियां ॥ देंटलवलाह्या भक्षीतसे ॥ ३१ ॥ बहुतबराडी याचें लक्ष
ण ॥ कीर्तनीं लोक ऐकती गाणें ॥ भिल्लणीचीं खाय उच्छिष्ट बोरें जाण ॥ चित्तीं अनमान न करितां ॥ ३२ ॥ इतुकें सामर्थ्य अ-
सतें यया ॥ तरी महाराचे घरीं निघता कासया ॥ चोख्याचीं ढोरें वोढोनियां ॥ तयासीं खावया मागतसे ॥ ३३ ॥ ऐशा कल्पना
नानारीती ॥ आवली आणीतसे चित्तीं ॥ अन्नघेऊनि आपुले हातीं ॥ दोघां मती वाढिलें ॥ ३४ ॥ जेव्हां कांटा मोडला पायीं
॥ भोंपळा लवंडला ते ठायीं ॥ पर्वतावरी जीवन पाहीं ॥ जवळ नाहीं सर्वथा ॥ ३५ ॥ आवलीस संकट झालें फार ॥ ह्मणे कैसा
करावा विचार ॥ जाणोनि तीचें निजअंतर ॥ शारंगधर काय ह्मणे ॥ ३६ ॥ पैल ते खोंगळी माझी साची ॥ जिव्हाळा दिसतसे

पाणियाचा ॥ तेथेंझरालागेलउदकाचा ॥ सत्यत्रिवाचाहेमाझी ॥१३७॥ आवलीससत्यनवाटेचिमात ॥ मगत्वरीपउचलूनिपाहेहातें ॥ तोंनिर्मळझराआंतूनियेत ॥ आश्चर्यवाटततिजलागीं ॥३८॥ ह्मणेनिर्जळवनींलाविलेंपाणी ॥ हेतोंअघटितयाचीकरणी ॥ अन्नेंनिर्मितांयेठिकाणीं ॥ याजवीणकोणीअसेना ॥३९॥ नानासाबरीमंत्रशिकून ॥ कपटविद्येंतझालानिपुण ॥ माझ्याभ्रतारासीघालूनिमोहन ॥ वेडाकरूनबैसविला ॥१४०॥ ऐशाकल्पनाआणोनिफार ॥ भोंपळाभरूनिघेतलेंनीर ॥ आपुल्याहातेंवाढीतपात्रें ॥ मगरुक्मिणीवरजेवीतसे ॥४१॥ विबुधबैसोनिविमानांत ॥ कौतुकपाहावयासीआलेतेथ ॥ ह्मणतीधन्यभक्तमहिमाअद्भुत ॥ पुष्पेंवर्षतीतेवेळीं ॥४२॥ तुकयासीह्मणेजगज्जीवन ॥ माझाप्रसादजेवितांप्रीतीनें ॥ कांहींउद्वेगनकरीमनें ॥ मीसिद्धीनेईनयोगतुझा ॥४३॥ ऐसेंह्मणऊनिभगवंतें ॥ ग्रासघालीतआपुल्याहातें ॥ आवलीसहितजेविलेतेथें ॥ नधरितद्वैतजगदात्मा ॥४४॥ तोब्रह्मरससेवितांप्रीती ॥ तुकयासीझालीसुखप्राप्ती ॥ मगकरशुद्धिदेऊनिप्रीती ॥ बोलेश्रीपतीकायतेव्हां ॥४५॥ ह्मणेरेतुकयाऐकवचन ॥ मीजनींजनार्दनभरलोंजाण ॥ चराचरमद्रूपपाहाणें ॥ जैसेंसुवर्णअलंकारीं ॥४६॥ कींपटपाहतांविच्यारून ॥ नरीकायस्यांततंतुवांचून ॥ तेवींविश्वनाहींमजवीण ॥ अनुभवेंकरूनतूंपाहें ॥४७॥ तरीआजपासूनियापर्वतीं ॥ नित्यनयावेंएकांतीं ॥ आवलीसकष्टबहुहोती ॥ ऐकवचनोक्तीहेमाझी ॥४८॥ ऐसेंसांगतांदीनदयाळ ॥ तुकाचरणींलोळेनलगेकाळ ॥ ह्मणेमीतुमचाल

डिवाळ ॥ यास्तवकळवळकरिनसां ॥ ४९ ॥ नेणेजपतपशास्त्रपठण ॥ नेणे अष्टांगयोगसाधन ॥ नकळे अध्यात्मब्रह्मज्ञा-
न ॥ पतितसंपूर्णसर्वांगीं ॥ १५० ॥ तुह्मीदीनबंधू अनाथनाथ ॥ हेब्रिदावळीजगविख्यात ॥ कीर्तनींगातीप्रेमळभक्त ॥ ते
केलीसत्यपांडुरंगा ॥ ५१ ॥ ऐकोनितुकयाचेंसप्रेमवचन ॥ राहेंह्मणतसेकृपाघन ॥ माताबाळकाचेंकरीरक्षण ॥ हास्याभा-
विकगुणतीचाकीं ॥ ५२ ॥ तेंवितूंमाझेंनिपटणें ॥ दृढूपणिचें आहेसिनान्हें ॥ ऐसेंबोलोनिमधुसूदनें ॥ दिधलेंआलिंगन-
तुकयासीं ॥ ५३ ॥ आपुल्याहृदयींचीसुखविश्रांती ॥ ज्ञानियांसींनसांगतांगुप्तहोती ॥ तेतुकयासीदेतसेश्रीपती ॥ सप्रे-
मभक्तीदेखोनियां ॥ ५४ ॥ तयेअवस्थेमाजीदेख ॥ देवभक्तझालेएक ॥ कोणकोणासींनाहींआर्तिक ॥ मगवैकुंठनायक
उमजले ॥ ५५ ॥ ह्मणेतुकामिळालाऐक्यासनी ॥ द्वैतभावासींघातलेंपाणी ॥ जैसेंदुग्धांतमिळेधारवणी ॥ तेंनदिसेपर-
तोनीसर्वथा ॥ ५६ ॥ शरीरांतसुरवाडलाप्राण ॥ कींआकाशींसंचलापवन ॥ कींसुवर्णकळिकेंतमकरंदपूर्ण ॥ राहेलपो-
नज्यारीती ॥ ५७ ॥ घंटेमाजीलोपलानाद ॥ कींशर्करेमाजीजैसास्वाद ॥ तैसातुकाझालियाअभेद ॥ मगसप्रेमबोधखु-
टला ॥ ५८ ॥ आश्चर्यकांहींवाटलेंपोटीं ॥ तेकोणासींबोलूंगुजगोष्टी ॥ कोणासीआलिंगूनिधरूंकंठीं ॥ ह्मणोनिजगजे-
ठीचिंतावला ॥ ५९ ॥ तुकाऐक्यासीआलाजाण ॥ तरीमाझाधांवाकरीलकोण ॥ मगमीकरूंकोणाचेंधांवणें ॥ वर्णील-
कोणगुणमाझे ॥ १६० ॥ ऐसेंजाणूनिदीनदयाळ ॥ तुकयासीह्मणेतेवेळे ॥ तूंकीर्त्तनींनाचतोसिजेवेळे ॥ तेथेंमीघननी

ळति ष्ठतसें ॥ ६१॥ ऐसें बोलतसे भक्तसखा ॥ नेत्र उघडोनि पाहे तुका ॥ पश्मात्वें मीस करूनि देखा ॥ देव भक्तिसुखा प्रति
पादीं ॥ ६२॥ ऐसीं देवभक्तांचीं उत्तरें ॥ विमानीं बैसोनि ऐकती सुर ॥ ह्मणती तुका वैष्णववीर ॥ करी उद्धार बहुतांचा ॥ ६३
॥ इंद्रपद घेऊनि निश्चिती ॥ आह्मी ठकलों बहुतां रीती ॥ प्रेमसुख लुटोनि भक्ती ॥ केला श्रीपती स्वाधीन ॥ ६४॥ धन्य धन्य
हा मृत्युलोक ॥ याचा महिमा दिसतो अधिक ॥ येथेंचि सामग्री असतां देख ॥ स्वर्गपदीं सुखभोगिनी ॥ ६५॥ धन्य हा
भांडारपर्वत जाण ॥ यासी पांडुरंगाचे लागले चरण ॥ धन्य देहू पुण्यक्षेत्र पूर्ण ॥ जेथें वैष्णवजन अवतरला ॥ ६६॥ धन्य
पंचक्रोशी साचार ॥ धन्य हे पाषाण मृत्तिका सार ॥ यास्थळीं हिंडला इंदिरावर ॥ महिमा अपार न वदवे ॥ ६७॥ वासवें क
रूनि ऐसी स्तुती ॥ स्वर्गासी नेल्हां विबुधजाती ॥ मग तुकयासी पुसोनि निजप्रीतीं ॥ अंतर्धान श्रीपती पावले ॥ ६८॥ म
जला ऐसें भासतसे जाण ॥ तुकयाचें हृदयकमळ पूर्ण ॥ त्यांत श्रीहरी मिलिंद होऊन ॥ निजप्रीतीने राहिला ॥ ६९॥ कीं
निजभक्ताचें हृदयसागर ॥ त्यांत मच्छ तळपे इंदिरावर ॥ अभाव हाचि शंखासुर ॥ निवटला साचार निजहस्तें ॥ ७०
प्रसादिक वाक्य निश्चिती ॥ तुका बोलिला सप्रेम भक्ती ॥ त्याच जाणाव्या निघाल्या श्रुती ॥ अन्यथा मती हे नव्हे ॥ ७१॥
तेचि विश्वासें गाती आदरें ॥ हेच महर्षी जाणावे थोर ॥ त्या वचनाचा धरून आधार ॥ सांप्रदाय थोर वाढविती ॥ ७२॥ अ
सो तयाचा अपार महिमा ॥ निरुपमासी न सरेचि उपमा ॥ अद्भुत बोलोनी भक्तिप्रेमा ॥ पुरुषोत्तमा वश केलें ॥ ७३॥ कलियु

गींबौद्धअवतारजाण ॥ हेतोंपुराणप्रसिद्धवचन ॥ परीतुकयाचामनोरथव्हावयापूर्ण ॥ देवसगुणहोतसे ॥ ७४ ॥ जैसें-
कामधेनूचेंतान्हेंजाण ॥ सांजवेळनहोतांचोरवीस्तन ॥ तेपान्हाघालीतनिजप्रीतीनें ॥ काळवेळनह्मणेसर्वथा ॥ ७५ ॥ कां
कल्पतरूखालीसाचार ॥ अघटितकामनाधरिलीथोर ॥ तोनविच्यारितांचिजन्मांतर ॥ मनोरथसाचारपुरवितसे ॥ ७६ ॥
तैसाचरीतीदीनदयाळ ॥ अवतारघ्यावयाचीनसतांवेळ ॥ सगुणरूपधरूननिर्मळ ॥ भक्तांसीतत्काळभेटत ॥ ७७ ॥ असोहे
दृष्टांतझालेफार ॥ उबगमानितीलश्रोतेचतुर ॥ तुकयासीभेटोनिशारंगधर ॥ वैकुंठपुरपावले ॥ ७८ ॥ मगआवलीच्यास
मागसेदेखा ॥ गांवांतआलावैष्णवतुका ॥ पुढिलेअध्यायींरसाळऐका ॥ वदवीलसखाप्रेमळाचा ॥ ७९ ॥ प्रभंजनाच्या-
योगेंकरून ॥ डोलेतृणाचेंबुजावणें ॥ परीलोकांसीभासपडतसेजाण ॥ बैसलाराखणशेतकरी ॥ १८० ॥ तेवींह्याचदृष्टीनें
पाहतांसर्व ॥ तयासीभासेकवीचेंलाघव ॥ सुज्ञानह्मणतीतैसेंनव्हे ॥ पंढरीराववदविता ॥ ८१ ॥ किंगरीवाजेनानालीळा ॥
ऐकूंयेतसेलोकांसकळां ॥ परीवाजविणारअसेवेगळा ॥ सज्ञानत्याजलापाहती ॥ ८२ ॥ तैसापांडुरंगमायालाघवी ॥ तोभ-
क्तचरित्रेंस्वयेंवदवी ॥ महिपतीहेंनिमित्तदावी ॥ पोसणाकवीसंतांचा ॥ ८३ ॥ स्वस्तिश्रीभक्तलीलामृतग्रंथ ॥ श्रवणेंचिपु-
रतीमनोरथ ॥ प्रेमळपरिसोतभाविकभक्त ॥ सप्तमोध्यायगोडहा ॥ १८४ ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ श्रीमज्जगदी
श्वरार्पणमस्तु ॥ ७ ॥ ७ ॥ ७ ॥ ७ ॥ ७ ॥ ७ ॥

अध्याय आठवा·
तुका·
काशीबाई·
मावशी·
गावकरी·
तुकाराम·ते
पितर जेवितात·
विठोबा
तुकाराम ब्राह्मणस्त्रीस वस्त्र देतो·
जीजाबाई·

तु॰च॰ श्रीगणेशायनमः ॥ श्रीकंसांतकायनमः ॥ तुझ्यानामावांचूननिश्चिती ॥ आणीकसाधननेणेश्रीपती ॥ जपतपअनुष्ठा अ॰
१ ननानारीती ॥ कांहींचमजपतीकळेना ॥ १ ॥ व्रतकरावेंयथाविधीनें ॥ तरीअन्नावांचूनिव्याकुळप्राण ॥ जरीहिंडावेंती ८
र्थाटण ॥ तरीशक्तिहीनशरीरकीं ॥ २ ॥ तुझीप्राप्तीव्हावयाश्रीहरी ॥ सत्पात्रींदानेंद्यावींजरी ॥ तरीधननाहींबहुतपद-
रीं ॥ कैशापरीहेंघडे ॥ ३ ॥ चराचरजेंदिसतेंकांहीं ॥ तेथेंतुजचिपाहावेंसर्वांठायीं ॥ तरीगुणदोषदिसतीसर्वही ॥ सम
नानाहींचित्तांत ॥ ४ ॥ श्रुतीअभ्यासकरावातलता ॥ तरीबाळबुद्धीनसेचिआतां ॥ अध्यात्मग्रंथपाहूंह्मणतां ॥ तरीतेथें-
आस्थानबैसे ॥ ५ ॥ तुझ्याभक्तकथेचीसांगडमोटी ॥ सप्रेमभावेंबांधिलीपाठी ॥ आतांपाहूनिकृपादृष्टी ॥ पाववींजगजे
ठीपैलतीरा ॥ ६ ॥ मागिलेअध्यायींकथासार ॥ अवलीसकांटामोडलाथोर ॥ तोकाढोनियारुक्मिणीवर ॥ तुकयासींस-
त्वरभेटले ॥ ७ ॥ गांवांतयेऊनिवैष्णवभक्त ॥ संतसेवेसींझालारत ॥ तयासीआदरकरूनिबहुत ॥ चरणप्रक्षाळितस्व
हस्तें ॥ ८ ॥ तेंतीर्थघालितांचिवदनीं ॥ ब्रह्मरसत्याहूनिगौणमानी ॥ सकळतीर्थेंसंतांच्याचरणीं ॥ निश्चयमनींदृढकेला
॥ ९ ॥ तुळसीमाळासुमनहार ॥ घालूनिपूजितवैष्णववीर ॥ तैसेचब्राह्मणद्विजवर ॥ सद्भावेंआदरकरीत्यांचा ॥ १० ॥ क्षु
धितवैष्णवअथवाविप्र ॥ तुकयासीकळतांसमाचार ॥ तयासीप्रयत्नकरूनिफार ॥ भोजनआदरेंघालीतसे ॥ ११ ॥ संतसे १
वेपरतेंकांहीं ॥ आणीकसाधनसर्वथानाहीं ॥ त्यांच्यावचनाचियाठायीं ॥ विश्वासजीवेंधरियेला ॥ १२ ॥ संतगातीकीर्त्ति

नांत ॥ त्यांच्यामागेंध्रुपदधरित ॥ तेणेसहजचिश्रवणहोत ॥ मगमननकरित एकांतीं ॥ १३ ॥ तुकयासीभेटलारुक्मिणी
वर ॥ तरीकरितसेपरोपकार ॥ खडेझाडितसेआपुल्याकरें ॥ जेथेंवैष्णववीरनाचती ॥ १४ ॥ प्रसंगपाहोनियांदेखा ॥ की
र्त्तनांतधरितसेदिवटीतुका ॥ नधरूनिलौकिकाचीशंका ॥ हरिनामेदेखाजागवितसे ॥ १५ ॥ कीर्त्तनींबैसतीसंतजन ॥
त्यांचेंपायतणकरितसेजतन ॥ जातेसमयींपुढेंठेऊन ॥ करितसेनमनसद्भावें ॥ १६ ॥ कीर्त्तनींध्रुपदधरितसेजेथें ॥ अद्भुत
रंगयेतसेतेथें ॥ प्रेमेंकंठहोयसद्गदित ॥ नेत्रींअश्रुपातवाहाती ॥ १७ ॥ हरिनामेगर्जोनिदेखा ॥ सप्रेमभावेंसांगेलोका ॥
मायामेळाउरलातुका ॥ विठोबासखयाचिनामें ॥ १८ ॥ उत्तमभक्ताचेंलक्षण ॥ श्रीभागवतींबोलिलेजाण ॥ तुकयाच्याअं
गींचेंचिन्ह ॥ एकहीन्यूनअसेना ॥ १९ ॥ देखोनिलोकह्मणतीत्यास ॥ तुकयासीलागलेंप्रेमपिसें ॥ भलतीचबडबडकरि
तसे ॥ उसंतनसेनिशिदिनीं ॥ २० ॥ सत्यवादीपरोपकारी ॥ भूतदयावसेअंतरीं ॥ कामसांगतीनरनारी ॥ तेंसत्वरकरीनिजां
गें ॥ २१ ॥ आर्तभूतपदार्थइच्छीमानसीं ॥ जवळीअसतांदेतसेत्यांसी ॥ कायावाचाआणिमनेसीं ॥ नवंचीकोणासीसर्वथा
॥ २२ ॥ स्वसुखेंलोकांसीसांगेज्ञान ॥ अहंब्रह्मचिपरिपूर्ण ॥ परीकवडीसाठींदेतीप्राण ॥ तरीव्यर्थचिबोलणेंतेंगेलें ॥ २३ ॥
तैसीतुकयाचीनव्हेकरणी ॥ बोलिल्यासारिखेंवर्तेजनीं ॥ आत्मवत्अवघेंविश्वमानी ॥ द्वैतस्वप्नींदिसेना ॥ २४ ॥ आपुलें
आणिपरावेंतान्हें ॥ रडतांदेखेनिजदृष्टीने ॥ दोहींचीकळवळतत्समानमानणें ॥ हेंचिलक्षणसंतांचें ॥ २५ ॥ आपुलीधन

संपत्तीनिश्चित ॥ तस्करींहरिलीऐकोनिमात ॥ चित्तींखेदनआणीकिंचित ॥ त्यासींचसंतह्मणावें ॥ २६ ॥ रायेंदिधलेंहिरे
रत्न ॥ आणिरंकेंआणिलेंभाजीपान ॥ दोहींचेंवांटेतत्समान ॥ हेंविलक्षणसंतांचें ॥ २७ ॥ कींनानाप्रकारेंकेलीस्तुती ॥
कोणीदुरुत्तरेंबोलती ॥ परीहर्षशोकनुपजेचित्तीं ॥ ऐसीचस्थितीतुकयाची ॥ २८ ॥ तंवकोणेएकेदिवसींजाण ॥ तुकया
चीकांताकरीतस्नान ॥ एकचिवस्त्रहोतेंआडजुनें ॥ तेंठेविलेंधुणोनिभिंतीवरी ॥ २९ ॥ बाहेरबैसलावैष्णववीर ॥ भजन
करितप्रेमादरें ॥ विश्वंभरलारुक्मिणीवर ॥ त्याजविणदुसरेंआननाहीं ॥ ३० ॥ तोंएकदुर्बळब्राह्मणीयेऊनतेथें ॥ तुक
यासींकाकुलतीयेत ॥ एकवस्त्रदेसीलमातें ॥ तरीपुण्यअगणितहोईलकीं ॥ ३१ ॥ ब्राह्मणसंसारकठिणफार ॥ दुसरेंपड
दणीसींनाहींवस्त्र ॥ जुनेंपानेंअसेलजर ॥ तरीद्यावेंसत्वरमज आतां ॥ ३२ ॥ ऐसेंबोलतांतेब्राह्मणी ॥ दयाउपजलीतुकया
चेमनीं ॥ खुणेनेंदाखवीतिजलागुनी ॥ वस्त्रघेऊनिजाह्मणे ॥ ३३ ॥ आवलीपरसांतस्नानकरी ॥ वस्त्रठेविलेंभिंतीवरी ॥
ब्राह्मणीयेऊनितेअवसरीं ॥ वोढोनिसत्वरीतेंनेलें ॥ ३४ ॥ ब्राह्मणीसंतोषलीचित्तीं ॥ ह्मणेसत्वशीळयाचीवृत्ती ॥ आशी
र्वाददेतसेप्रीती ॥ ह्मणेरुक्मिणीपतीतुजपावो ॥ ३५ ॥ तुकाखुणावितलवलाहें ॥ बोलूंनकोसत्वरजाय ॥ ऐसीसांगूनियां
सोय ॥ आपणहीजायसत्वर ॥ ३६ ॥ मगबैसोनिइंद्रायणीचेतीरीं ॥ भजनकरितसप्रेमगजरीं ॥ इकडेमंदिरींकैसीवर्तली
परी ॥ तेंसादरचतुरींपरिसिजे ॥ ३७ ॥ स्नानकरूनजिजाबाई ॥ वस्त्रपाहातसेतेसमयीं ॥ तोंठेविल्याजागींदिसतनाहीं ॥

विस्मितजीवींनेहोय ॥ ३८ ॥ ह्मणेमाझेंकर्मविपरीत ॥ पुढेंवोढवलेंबळिवंत ॥ वस्त्रनेलेंदेखतदेखत ॥ कल्पना मनांत आ
णीतसे ॥ ३९ ॥ बुबाईदासीनाहींघरीं ॥ शेणी आणावयासी गेलीदूरी ॥ गंगातान्हींखेळेबाहेरी ॥ विस्मित अंतरींहोतसे
॥ ४० ॥ महादेवस्नानासीगेलाजाण ॥ सर्वेंविठोबासीघेऊन ॥ वडिलांचेंलक्षणधरिलेंत्याणें ॥ चाढवेळजाऊनबैसला ॥
॥ ४१ ॥ कोढ्याचेंकोढीनहोयनिश्चिती ॥ तरीपांचडागआंगींदिसती ॥ ह्मणोनिरवाणतैसीमाती ॥ आह्मणाबोलतीज-
नांत ॥ ४२ ॥ काशीभागीरथीशाहाण्यादोन्ही ॥ सासुर्‍यांगेल्याजैंपासूनी ॥ घरींरक्षणनसेचिकोणी ॥ देतसेउच्चलोनी-
मळत्यासी ॥ ४३ ॥ दादुलाबैसलाहोनासदनी ॥ वस्त्रमागतहोतीब्राह्मणी ॥ तीचा आतांचशब्दध्वनीं ॥ त्याहीश्रवणीं
ऐकिला ॥ ४४ ॥ पिशानेंचवसांडिलीबरी ॥ धडचिघातलेंकांट्यावरी ॥ एकचिवस्त्रहोतेंघरीं ॥ तेंदेऊनिसत्वरपळाला ॥
॥ ४५ ॥ मेलाकाळतोंडासाजणी ॥ यास्तवगेलाचुकवोनी ॥ जैसावृश्चिकअन्यायकरुनी ॥ बैसेलपोनीआडकोठें ॥ ४६ ॥
येकवींबाहेरजातांचिदेखा ॥ काळ्याच्यानावेंमारितोहाका ॥ यास्तव आजराहिलासुका ॥ अन्यायनिका आठवोनी ॥ ४७
॥ चोरटाखानोरीसाचार ॥ पाटींबैसोनिसाधिलेंवैर ॥ पतीनोहेदावेदार ॥ पूर्वीलजन्मांतरसाधिलें ॥ ४८ ॥ कैंचीरांड आ
लीब्राह्मणी ॥ वस्त्रदिधलेंतिजलागुनी ॥ मजसींनबोलतांगेलारानी ॥ चुकवोनीबैसला ॥ ४९ ॥ माझ्यापित्या आपाजी
नें ॥ वस्त्रघेतलेंहोतेंजाण ॥ याच्याजोडाचेंकधींअन्न ॥ खादलेंचिनेणेसर्वथा ॥ ५० ॥ कंठींबांधोनिकाळेमणी ॥ फुकट

चिमेळाझालाधणी ॥ ठाउकीआहेत्याचीकरणी ॥ दिवाळेंकाढोनीबैसला ॥ ५१ ॥ अन्नअन्नकरितांदेख ॥ दुष्काळींबाईलमे
लीएक ॥ त्याचीलाजनधरीविवेक ॥ जनासींमुखदाखवितो ॥ ५२ ॥ रखुमाईच्यासुकृतहोतेंपदरीं ॥ ह्मणूनिगेलीमाझ्या-
अगोधरी ॥ माझीविपत्तीहोणारभारी ॥ यास्तवसंसारींवाचल्यें ॥ ५३ ॥ आतांघरांतजावेंजरीदेख ॥ तरीसमोरवागतीगां
विंचेलोक ॥ उपायकांहींनसुचेआणिक ॥ करीतसेशोकयासाठीं ॥ ५४ ॥ तोंशरीरसंबंधीआणिव्याही ॥ मिळोनिलग्ना
सीजातीपाहीं ॥ तेबोलावयासींआलेसर्वही ॥ ह्मणतीजिजाईबाहेरया ॥ ५५ ॥ ऐसेंबोलोनियांवचन ॥ घरांतप्रवेशले
अवघेजन ॥ आवलीशिळेवरीबैसलीनग्न ॥ लज्जितमनहोवूनियां ॥ ५६ ॥ ह्मणेआतांदावेदारअसतांघरीं ॥ तरीचडकणा
मारित्येंमुखावरी ॥ कायकरावेंयेअवसरीं ॥ उपायअंतरींसुचेना ॥ ५७ ॥ पिशुनसन्निधपातलेत्वरित ॥ तेणेंभयाग्नीपेटत ॥
शोकस्नेहत्यावरीपडत ॥ धडकलाबहुतत्याचेनी ॥ ५८ ॥ प्रीतीच्याइंधनेंप्रदीप्तझाला ॥ मोहाच्यावातेंखवळला ॥ लज्जे-
च्याआंगीलागतीज्वाळा ॥ चित्तींव्याकूळहोतसे ॥ ५९ ॥ त्रितापेंअग्नीजाळीतसेपाहीं ॥ आवलीह्मणेमीकरूंकायी ॥ तोंस
त्वरधांवूनिविठाबायी ॥ कौतुककायपैंकेलें ॥ ६० ॥ मागेंप्रावरणाचापीतांबर ॥ सत्वरटाकिलानिजवर ॥ लज्जारक्षीरुक्मि-
णीवर ॥ करुणाकरदासांचा ॥ ६१ ॥ मजलाभासेऐशारिती ॥ त्रितापेंआवलीजळतहोती ॥ निजवरीमेघरुक्मिणीपती ॥ स
त्वरगतीवोळला ॥ ६२ ॥ दिव्यवस्त्रदेखूनिनयनीं ॥ विस्मितझालीआपुलेमनीं ॥ ह्मणेहेकाळ्याचीदिसतेकरणी ॥ त्याजबाण-

कोणीकरीना ॥ ६३ ॥ दाखवितोनानाचमत्कार ॥ तरीमजकायत्याचाउपकार ॥ वेडाकेलानिजभ्रतार ॥ ह्मणऊनिवारं
वारसांभाळी ॥ ६४ ॥ दिव्यवस्त्रसत्वरनेसुन ॥ घरांतगेलीनलगतांक्षण ॥ मंदिरींप्रकाशपडेतेणेकरून ॥ आश्चर्यपि
सुनतेकरिती ॥ ६५ ॥ ह्मणतीमहावस्त्रेंदेखिलींफार ॥ परीऐसेंपाहिलेंनाहींअंबर ॥ तुकयानेबुडवोनीकोणाचेंघर ॥
कांतेसीपीतांबरघेतला ॥ ६६ ॥ घरांतघरकुलकरूनदेखा ॥ बाहेरआबावेंदाखवीलोका ॥ आतांबकध्यानधरिलेंदेख
॥ दिसतोतुकावैरागी ॥ ६७ ॥ पीतांबराचीपाहातांदीप्ती ॥ तेणेआसुचेनेत्रझांकती ॥ परिमळनसमायेमंदिराप्रती ॥ वि
स्मितचित्तीतेझाले ॥ ६८ ॥ एकह्मणतीपेटारींत ॥ हेंवस्त्रआजवरीठेविलेंगुप्त ॥ आतांनेसावयाकाढिलेंत्वरित ॥ नकळे
चिअंततुकयाचा ॥ ६९ ॥ ऐसेंबोलोनियेरयेरां ॥ जिजाईसह्मणतीत्याअवसरा ॥ तुमचावृत्तांतआहेकींबरा ॥ लग्नासीख
राचलावें ॥ ७० ॥ आवलीह्मणतसेतेसमयीं ॥ आसुचावृत्तांतविदितनाहीं ॥ संसारआशाटाकूनिसर्वही ॥ भ्रतारविदे-
हीझालाकीं ॥ ७१ ॥ ऐसेंसांगतांजिजाबाई ॥ पिसुनह्मणतीतेसमयीं ॥ लग्नासीयालकींवानाहीं ॥ हेंलवलाहींसांगावें ॥
॥ ७२ ॥ जाणोनिदुर्बळसंसार ॥ ह्मणतीहेकोठोनिआणीलअहेर ॥ आशाबद्धपिसुनसर्वत्र ॥ वरिवरीआदरकरिताती
॥ ७३ ॥ जैसीअभ्रच्छायाअशाश्वत ॥ क्षणलोटतांनाहींचहोत ॥ कींउष्णलागतांकिंचित ॥ पतंगउडतरंगजैसा ॥ ७४ ॥
नातरीबकाचेंध्याननिश्चित ॥ एकनिष्ठदुरोनिदिसत ॥ कींनटाचीज्यायासुंदरहोत ॥ तिजसीएकांतकरूंनये ॥ ७५ ॥ कीं

पंगुळवेलीचेंजेंसेंसुमन ॥ नेत्रासीसाजिरेंदुरून ॥ नाकासीलावितांदुर्गंधीघाण ॥ कंटाळेमनज्यारिती ॥ ७६ ॥ नातरीसु
लाम्याचीमोहर ॥ आंतअवघेंविभरलेंताम्र ॥ तैसापिशुनाचाआदर ॥ वरिच्यावरजाणावा ॥ ७७ ॥ परमअनास्थाजाणो
निचित्तीं ॥ आवलीतयांसीउत्तरदेती ॥ अनुकूळपडिलेंसंसाराहातीं ॥ तरीमागूननिश्चितीयेईनमी ॥ ७८ ॥ टाकणेंटाकू
नऐशापरी ॥ पिशुनगेलेतेअवसरीं ॥ पुढेंचरित्रवर्तलेंजेंपरी ॥ सादरचतुरींपरिसिजे ॥ ७९ ॥ ब्राह्मणीसचोरूनिदिधलें
वस्त्र ॥ आवलीबोलेदुरुत्तर ॥ यास्तवतुकावैष्णववीर ॥ गेलासत्वरवनांत ॥ ८० ॥ बैसोनियांसहजस्थिती ॥ ध्यानांतआ
णूनिपांडुरंगमूर्त्ती ॥ ह्मणेदेवाधिदेवारुक्मिणीपती ॥ माझीविनंतीअवधारीं ॥ ८१ ॥ सकळदुरिताचाकरूनिमेळा ॥ त्या
चानिर्माणझालोंपुतळा ॥ पतीतपावनदीनदयाळा ॥ निवेदनतुजलाअसोंदे ॥ ८२ ॥ मीसकळपातकांचीराशी ॥ परीसेवा
चोरपायांपासीं ॥ परीमानखंडणाहोईलजैसी ॥ तोदंडमजसीकरींदेवा ॥ ८३ ॥ मींतुमचाह्मणवितोंवरवर ॥ धूळमातीके
लासंसार ॥ परीतुकादोहींकडेचोर ॥ जाणसीअंतरविठोबा ॥ ८४ ॥ ऐसाअनुतापधरूनचित्तीं ॥ भजनकरीतप्रेमगती ॥
मगच्यारघटिकालोटतांराती ॥ देउळाप्रतीयेतसे ॥ ८५ ॥ हातींदगडाचाघेऊनिटाळ ॥ सप्रेमेंनाचेतयेवेळ ॥ सन्निधघर
होतेंजवळ ॥ आवलीसकळेंह्मणेआला ॥ ८६ ॥ देवेंनेसविलापीतांबर ॥ यास्तववरागकेलादूर ॥ मगलेंकीहातींभाजीभाक
र ॥ तुकयासींसत्वरपाठविली ॥ ८७ ॥ तोस्वल्पआहारसेऊनिप्रीती ॥ कीर्तनींउभासप्रेमयुक्ती ॥ कोणीभाविकलोकयेती

॥ गातीऐकतीहरिकथा ॥८८॥ दोनप्रहरपर्यंतजाण ॥ तुकयानेंदेउळींकेलेंकीर्तन ॥ तोंपर्यंतहोतेजन ॥ मगगेलेउठोन
घरासीं ॥८९॥ परीतुकाननिजेनिश्चिती ॥ देउळींबैसलाएकांतीं ॥ संतवाक्यह्मणतसेप्रीती ॥ पाठांतरअसतीअभंगजे
॥९०॥ दिवसासेवितसेवनांतर ॥ रात्रींकीर्तनदोनप्रहर ॥ डुकलीयेतसेवारंवार ॥ परीचोळोनिनेत्रउघडीतसे ॥९१॥ साध
कटाकूनिअहंकार ॥ पावलेआत्मसाक्षात्कार ॥ परीदेहस्वभावासीपडेअंतर ॥ मागिल्याभरेंचालतसे ॥९२॥ जैसाकापू
रजळालियावरी ॥ मागेंसुगंधराहेक्षणभरी ॥ तैसीदेहअहंतागेल्यावरी ॥ इंद्रियेंव्यापारींराहाटती ॥९३॥ नानरीच-
क्रभवंडितकुंभार ॥ तोदंडकाढोनिघेतल्यासत्वर ॥ परीमागीलअंगींअसतांवारें ॥ तेंचक्रफिरेगरगरां ॥९४॥ कींवाहु
टळीराहिल्यासाचार । परीक्षणभरीडोलतीतरुवर ॥ मेघवोसरल्यादिवसच्यार ॥ वोलथोरल्यामागें ॥९५॥ वासरम-
णीमावळल्यापाहे । च्यारघटिकाप्रकाशराहे ॥ तोएकाएकींचजायीलकाय ॥ देहस्वभावतयाचा ॥९६॥ ह्मणऊनितुक
यासींसाचार ॥ निद्रायेतसेवारंवार ॥ तीसजिंकावयासत्वर ॥ वैष्णववीरकायकरी ॥९७॥ शेंडीसबांधोनियांदोरी ॥
आपुल्याहातेंटांगीवरी ॥ ह्मणेमानेसींआसडाबैसल्यावरी ॥ मगनिद्रादुरीपळेलहे ॥९८॥ च्यारदिवसकरितांऐसें ॥
निद्राजिंकिलीनिःशेषें ॥ सर्वथाचित्तींनयेआळस ॥ केलेंतयासदेशधडी ॥९९॥ नऐकावेंतेंनायकतीकान ॥ नपाहावेंतें
नदेखतीनयन ॥ नबोलावेंतेंजिव्हेसीज्ञान ॥ स्वभावगुणतुकयाचे ॥१००॥ शाश्वतीस्थीरनव्हेचिमन ॥ हातासींनमि

ळेविष्णुअर्चन॥परोपकारींधांवतीचरण॥अगणितपुण्यह्मणोनियां॥१॥परोपकारीजोकांनर॥शुद्धअसेलजन्मांतर॥तरीपुढेंआरोग्यहोयशरीर॥तेनानाउपचारभोगिती॥२॥तुकयाचीतोंनिष्कामवृत्ती॥प्राप्तव्हावयारुक्मिणीपती॥परोपकारींवेंचितसेशक्ती॥कैशारीतीतेऐका॥३॥कोणीपांथस्थवाटेवरी॥अकस्मातगांठपडलीजरी॥त्याचेंओझें घेऊनिशिरीं॥विसावाक्षणभरीत्यासद्यावा॥४॥पर्जन्यमार्गीलागतांसबळ॥पांथस्थगांवांतपाहतीस्थळ॥तयांसीदाखवीचावडीदेऊळ॥नातरीतत्काळनेघरा॥५॥पंथक्रमितांचिलवलाहें॥यात्रेकऱ्यांचेसुजलेपाय॥मगउष्णपाणीकरूनिपाहे॥रगडितदेहनिजांगें॥६॥गायीवृषभासींनिर्बळपणीं॥मोकलोनिदेतीनिर्दयधनी॥तयासीहातेंकुरवाळोनी॥चारापाणीघालीतसे॥७॥मैदासाकरआणिघृत॥एकेजागींकरूनठेवित॥मुंगीयांच्याधांवींघालित॥ईश्वरप्रीत्यर्थनित्यकाळीं॥८॥अणुरेणुपर्यंतजाणा॥भूतमात्रींधरितसेकरुणा॥हिंसाघडेतेंकर्मजाणा॥सहसाहीमनानावडे॥९॥परीचालतांहालतांदिसेजवळी॥तेंरगडेलअवचितपायांतळीं॥यास्तवजीवकळवळी॥जैंसीमासोळीउदकाविण॥११०॥उष्णाकाळींझालियाउबारा॥कीर्तनामाजीघालीतसेवारा॥अन्ननमिळतांक्षुधातुरा॥प्रयत्नेंमेळवूनदेत्यासी॥११॥उष्णाकाळींजीवनवाटेवर॥नसतांउपायकरितसेथोर॥घागरभरूनिसत्वर॥मार्गावरनेतेथें॥१२॥वाचातपहेंचिथोर॥असत्यनबोलेसर्वथाउत्तर॥परोपकारींवेंचीशरीर॥आळसअणुमात्रअ-

सेना ॥ ११३ ॥ पांथस्थासीव्याधीमार्गींहोत ॥ जवळीनसतांसुहृदआप्त ॥ तयासीराहावोनिदेउळांत ॥ औषधपथ्यकरवीतसे ॥ १४ ॥ जडभरतवर्णिलाभागवतीं ॥ तैसीतुकयाचीझालीस्थिती ॥ संसारिककाबाडकामसांगती ॥ तेंसत्वरगती करीतसे ॥ १५ ॥ ममतालोभसांडोनित्वरित ॥ सांगीतलेंतेंचिसत्वरकरित ॥ एकदांइंद्रायणीच्यातटांत ॥ भजनकरित बैसला ॥ १६ ॥ तोंनवलाख्याच्याउंबऱ्यांत ॥ बाजाराव्यवसाईजातहोते ॥ तेविनोदेंह्मणतीतुकयातें ॥ आह्मासांगातेंचालआतां ॥ १७ ॥ अवश्यह्मणवोनीभक्तवैष्णव ॥ सत्वरजातसेतयांसवें ॥ भजनकरीतसप्रेमभावें ॥ उगेंनसावेंक्षणभरी ॥ १८ ॥ तोंएकदुर्बळह्मातारीब्राह्मणीन ॥ शरीरझालेंशक्तिहीन ॥ बाजारासीजातसेजाण ॥ काठीटेंकूनहळुहळू ॥ १९ ॥ तेंतुकयानेदेखोनिदृष्टीसी ॥ दयाउपजलीचित्तासीं ॥ ह्मणेमातेतूंबहुश्रमलीसी ॥ तरीमाझेपाठीसीबैसआतां ॥ १२० ॥ ऐकोनितुकयाचीवाणी ॥ कायह्मणतसेब्राह्मणी ॥ माझेंतेलदेशीलआणुनी ॥ तरीपरतोनिमीजात्यें ॥ २१ ॥ अवश्यह्मणतांप्रेमळभक्त ॥ संतोषलेंतिचेंचित्त ॥ तुकयाच्यास्वाधीनपैसेकरित ॥ पात्रहीदेतबरोबरी ॥ २२ ॥ ह्मातारीपरतोनिगेलीघरा ॥ सुखझालेंतीच्याअंतरा ॥ तुकाजातसेबाजारा ॥ परोपकाराकारणें ॥ २३ ॥ तेथेंव्यवसाईकामसांगती ॥ तेंकरूंलागेतयांप्रती ॥ आणिभजनकरितसप्रेमयुक्ती ॥ सात्विकवृत्तीबाणली ॥ २४ ॥ तेलघेऊनिदुसरेदिवसीं ॥ आणोनिदिधलेंब्राह्मणीसी ॥ तेह्मणेउपकारफेडावयासीं ॥ कांहींचमजपासींअसेना ॥ २५ ॥ कांहींदिवसलोटतांजाणा ॥ मगते-

स्वसुखेंसांगेजना॥ एकनवलवाटतेंमाझ्यामना॥ सांगावेंकोणानिजसुखें॥२६॥ आठदिवसाचेंतेलनिश्चित॥ तुकयाहा
तींआणविलेंहोतें॥ परीतेंगेलेंदिवसबहुत॥ नवलवाटतमजलागीं॥२७॥ ऐसेंबोलतांतेब्राह्मणी॥ मातफांकलीका
नोंकानी॥ ह्मणेतुकातेलदेतोआणुनी॥ तेंबहुतदिवसजातसे॥२८॥ एकह्मणतीसदैवखरा॥ घरींखावयासीनमिळेपो
रां॥ अन्नावीणमेलीदारा॥ परीत्याच्याअंतरालाजनाहीं॥२९॥ कोणीचमत्कारपाहती॥ तुकयाहातींतेलआणविती॥
तेंबहुतदिवसगेलेह्मणती॥ आश्चर्यचित्तींवाटलेंत्या॥१३०॥ आशाबद्धजनत्याअवसरा॥ ह्मणतीतुकशेटजाऊनिबाजा
रा॥ तेलआणोनिद्यावेंघरा॥ तुमच्याउपकारानविसरों॥३१॥ बरेंमायबापबोलेउत्तर॥ नव्हेआपूनदिधलेफार॥ ग-
ळ्यांतपिशवीसीबांधलादोर॥ त्यांतपैसेसर्वत्रटाकिती॥३२॥ मार्गावरीलगांवकोणी॥ वृत्तांतकळतांत्यांजलागुनी॥
पात्रपैसेदेतीआणुनी॥ परीतुकयासीमनींसंतोष॥३३॥ कांहींनव्हेघेतलेहातीं॥ कोणीगळ्यांतआडकिविती॥ परीतु
कयासींउबगनयेचित्तीं॥ विदेहस्थितीजाहला॥३४॥ मगबाजारींसत्वरजाऊन॥ तेलियाचेंपाहिलेंदुकान॥ नव्हेपैसेत्या
च्यास्वाधीन॥ करीतसंपूर्णतेधवां॥३५॥ तेलीपुसेतुकयाप्रती॥ कोणतेपात्रींघालूंकिती॥ तुकाह्मणेहेंनकळेमजप्रती
॥ कळेलयुक्तीतेकरीं॥३६॥ ऐसेंतयासीवचनबोलत॥ तोंआणीकव्यवसाईहाकमारित॥ तुक्यापालेंदेऊंलागलरित॥
उशीरबहूतजाहला॥३७॥ परमहरिखेंतेअवसरीं॥ त्यांचींवोझींवाहातसेशिरीं॥ हातींखडेझाडितसेसत्वरी॥ पालें

बाजारीं देऊंलागे ॥ ३८ ॥ जोजेंजैसेंकामसांगत ॥ नितुकेंकरीतवैष्णवभक्त ॥ चारापाणीआणूनिदेत ॥ पाठाळें बांधित
निजांगें ॥ ३९ ॥ भूतमात्रीं पाहूनि देवा ॥ अभ्यांचीहीकरीसेवा ॥ तुकाआवडेसर्वत्रजीवा ॥ कोणासीनव्हावाहूंनाहीं ॥ १४०
॥ रात्रसमयहोतांचिजाण ॥ देउळांतजाऊनकरीकीर्त्तन ॥ भाविकसप्रेमेंकरितश्रवण ॥ अनुतापमनाहोयत्यांच्या ॥ ४१ ॥
प्रातःकाळहोतांचिदेखा ॥ तोंव्यवसाईमारितीहाका ॥ तयांचाशब्दऐकोनिनिका ॥ येतसेतुकाधांवोनी ॥ ४२ ॥ सप्रेमेंनाम
स्मरणकरित ॥ ऐकूंजातसेगांवांत ॥ ह्मणेहरिस्मरणावीणसत्य ॥ संसारव्यर्थदवडूंनका ॥ ४३ ॥ ओझींबांधोनिसत्वरग
ती ॥ उचलूंलागेसकळांप्रती ॥ कामसांगतांनानारीती ॥ उबगचित्तीं मानीना ॥ ४४ ॥ मगतेलियापासींजातांसत्वर ॥ तो
ह्मणेस्नेहघातलेंबरोबर ॥ अवस्यह्मणेवैष्णववीर ॥ घेऊनिसत्वरचालिला ॥ ४५ ॥ मार्गींचेलोकजपतबैसती ॥ आपुल
लींपात्रेंचाळखूनिनेती ॥ परीकौतुककरितसेरुक्मिणीपती ॥ तेंसादरश्रोतींपरिसावें ॥ ४६ ॥ नळ्यांततेलघातलेंसमान
॥ हेंतुकासर्वथावांटूंनेणे ॥ परीजितुकेंज्याचेंद्रव्यजाण ॥ त्याच्याधारणेंत्यासिदिसे ॥ ४७ ॥ जैसेअनंतप्राणीयेथेंमरती ॥
त्यादेहाचीएकवटहोयमाती ॥ परीपुढिलेजन्मीनानारीती ॥ संचितेंनिवडितीवेगळालीं ॥ ४८ ॥ त्यापृथ्वीऐसीचसमता
पाहीं ॥ बाणलीतुकयाचेठायीं ॥ अधिकउणेनदिसेचिकांहीं ॥ परीशेषशायीनिवडित ॥ ४९ ॥ संतांचातोसमानभाव ॥ सा
रिखातयासीरंकराव ॥ परीप्रारब्धनेमूनिदेवाधिदेव ॥ दरिद्रवैभवभोगवी ॥ १५० ॥ आतांअसोवैष्णवभक्त ॥ प्रवेशतांदे

हुगांवांत ॥ मगराउळासीजाऊनित्वरित ॥ घाली दंडवतसद्भावें ॥ ५१ ॥ सांवळाश्रीरंगपाहूननयनी ॥ परमानंदवाटेमनी ॥ जैसीतान्हयासीभेटतांजननी ॥ उल्हासमनींतियेच्या ॥ ५२ ॥ मगलोकयेऊनिसत्वरगती ॥ आसुत्तालेनळेवोळखोनिनिनेती ॥ तें आवलीनेदेखोनिनिश्चिती ॥ अपशब्दबोलतीकायतेव्हां ॥ ५३ ॥ ह्मणेहेमेलेलोकदुर्मती ॥ वेडाझालासेमाझापती ॥ त्यापिशाच्याहातींकोलितदेती ॥ कामसांगतीआपुलें ॥ ५४ ॥ एकावृषभाचेंओझेंनिश्चिती ॥ मनुष्याहातींहें आणविती ॥ मरोनिगेलियामाझापती ॥ संतोषपावतीमगतेव्हां ॥ ५५ ॥ आवलीभांडतांऐशारीती ॥ कोणीनिजलाउत्तरदेती ॥ लोकांचेंनऐकतातुझापती ॥ तरितेसांगतीकासया ॥ ५६ ॥ ज्याचाकांसद्गुणविशेष ॥ तेणेंचिबंधनहोतसेत्यास ॥ वनगाईचेंपुच्छसुभ्रदिसे ॥ यास्तवतयासीतोडिती ॥ ५७ ॥ रांवाशिकविलियानायकेमात ॥ तरीपिंजऱ्यांतबंधनकासयाहोत ॥ ज्याचासद्गुणत्यासबाधित ॥ समजचित्तांतआपुल्या ॥ ५८ ॥ दर्वेशानेसांगतांसाचार ॥ मलामलोकांसकरीवानर ॥ यास्तवबंधनपाऊनिथोर ॥ घरोघरींहिंडविती ॥ ५९ ॥ ह्मणोनिऐकेंजिजाबाई ॥ तुझाभ्रतारझालाविदेही ॥ सांगीतलेंऐकेलवलाहीं ॥ तरीलोकांसीबोलकायआतां ॥ १६० ॥ याच्याहातेंपुरतेंतेलसाचार ॥ हाबहुतांसीआलाचमत्कार ॥ ह्मणऊननव्हेदेऊनिफार ॥ तेलवारंवारआणविती ॥ ६१ ॥ तुकाविदेहीदिसतोवेडा ॥ आणिआह्मासीबोलकांएवढा ॥ आपलाअसतांदामकुडा ॥ मगपराव्यासीझगडाकासया ॥ ६२ ॥ ऐसीऐकोनियांदृष्टांतमात ॥ आवलीराहिलीमगनिवांत ॥ ह्मणे

खोटें आहेमाझेंसंचित॥ झालीजनांतफजिती॥ ६३॥ तुकयाचीतोंऐसीस्थिती॥ स्त्रीजातमानीप्रकृती॥ पुरुषतेपांडुरं
गभासती॥ करुणाभूतींयास्तव॥ ६४॥ प्रातःकाळींउठोनिजाण॥ ब्राह्मणाचेघरींवाहेजीवन॥ आंगणवोसरीझाडून॥
सडासमार्जनघालीतसे॥ ६५॥ हिंसकपक्षीधरितीफार॥ तुकयाचेदृष्टीसपडेलजर॥ तयासीबोलूनिनम्रउत्तर॥ नानाप्र
कारेंसोडवी॥ ६६॥ साधुसंतांचाविक्रितदास॥ पायवणीप्रीतीनेघेतअसे॥ त्याच्याउच्छिष्टापुढेंदिसे॥ ब्रह्मरसउणाची
॥ ६७॥ श्रीभागवतामाजीजाण॥ बोलिलींभक्तांचींलक्षणे॥ तुकयाचेअंगींतितुकींचिन्हें॥ एकहीउणेअसेना॥ ६८॥ आ
वलीतोंअविद्यासाचार॥ तुकानिजपासूनझालादूर॥ ह्मणवोनिभांडेदिवसरात्र॥ कठिणोत्तरेंबोलोनियां॥ ६९॥ एके-
दिवसींजिजाबाईनिश्चित॥ तुकयाप्रतीकायबोलत॥ आजितुझ्यावडिलांचीपुण्यतिथ॥ साहित्यकिंचितअसेना॥ ७०
॥ ऐकोनिह्मणेवैष्णववीर॥ मीरानांतजाऊनिसत्वर॥ भाजीआणोनिदेतोंफार॥ तेंशिजवोनिपितरजेववीं॥ ७१॥ ऐसेंह्म
णोनिप्रेमळतुका॥ विठ्ठलनामेंमारितसेहाका॥ मगरानांतजाऊनियांदेखा॥ वैकुंठनायकाआठवी॥ ७२॥ ध्यानांत
आणोनिपांडुरंगमूर्ती॥ लाविलींदोनीनेत्रपातीं॥ सप्रेमभरितहोऊनिचित्तीं॥ करुणाएकांतींभाकीतसे॥ ७३॥ ह्म-
णेजयजयाजीरुक्मिणीवरा॥ भक्तवत्सलाकृपासागरा॥ पतितपावनादीनोद्धारा॥ करुणाकराश्रीविठ्ठला॥ ७४॥ काया
वाचामनेंनिश्चित॥ मीतुझाजाहलोंशरणागत॥ तूंचिमाझाजिवलगआप्त॥ नानाघातचुकविसी॥ ७५॥ संसाराची

भरोवरी ॥ मागेंकेली बहुतांपरी ॥ तों अधिकदुःखाचियेपरी ॥ नानाप्रकारीं देखिली ॥ ७६ ॥ नाशिवंताचीसांडोनिआस्था
॥ तुजशरणमीरुक्मिणीकांता ॥ सर्वभारतुझियामाथा ॥ करिसीलआतांतेंकरीं ॥ ७७ ॥ ऐसेंह्मणोनितेवेळे ॥ पुढेंचालि
लाभक्तप्रेमळ ॥ तोंगहूंपिकला असेप्रबळ ॥ मजूरसकळसंवंगिती ॥ ७८ ॥ तेतुकयासीविनोदेंह्मणतीपाहीं ॥ गहूंउप
डीकांलवलाहीं ॥ ऐसेंऐकोनितेसमयीं ॥ अवस्यविदेहीह्मणतसे ॥ ७९ ॥ मजूरांच्याबरोबरी ॥ आपणपाथधरिलीदुस-
री ॥ सप्रेमनामाचियागजरीं ॥ तुकयाकरीसंवगणी ॥ १८० ॥ वरकडकामकरितीकुचर ॥ परीत्यांजपुढेंजातवैष्णववीर ॥ तु
कयाचेंसुदृढ अंतर ॥ आंगअणुमात्रनराखी ॥ ८१ ॥ परीभाजी आणावयासी आलेंमनी ॥ घरींवाटपाहीलराणी ॥ हाआ
ठवतुकयालागोनी ॥ सर्वथामनींनहोय ॥ ८२ ॥ नामरूपींजडलेंचित्त ॥ ह्मणोनिझालीविदेहीस्थित ॥ प्रेमाचेंभोजननित्य
करित ॥ धष्टपुष्टदिसतसे ॥ ८३ ॥ असोइकडेतेअवसरीं ॥ कांताशिव्यादेतसेघरीं ॥ ह्मणेमेलाचोरटाखानोरी ॥ गेलाबा
हेरीउठोनियां ॥ ८४ ॥ मीकोणाचीबाईलहोऊन ॥ घरींपुरऊंवस्त्रअन्न ॥ घरींपितरसांगीतलेंजाण ॥ आपणतोंवनहिंडत
से ॥ ८५ ॥ लोकांचेकष्टकरावयासी ॥ बहूतबळयेतसेत्यासी ॥ परीऋणानुबंधनाहींमजसीं ॥ आतांसंसारासीकायकरूं ॥
॥ ८६ ॥ ऐसीतुकयाचीकांता ॥ आपुलेघरींकरीतसेचिंता ॥ करुणाआलीपंढरीनाथा ॥ ह्मणेसाहित्यआतांकरावें ॥ ८७ ॥ नि
जभक्ताचेंपडतांउणें ॥ तरितेंआपुल्यासीं अश्लाघ्यवाणें ॥ दासाचेंदास्यखलागेकरणें ॥ जेअनन्यभावेंअनुसरले ॥ ८८

॥ ऐसें ह्मणऊनि याचित्तीं ॥ तुकयाचें रूप धरी श्रीपती ॥ सामग्रीची मोट मस्तकावरुती ॥ सदनाप्रती येतसे ॥ ८९ ॥ जें योगि
यांचें निजध्यान ॥ नीलग्रीवाचें देवतार्चन ॥ तो निजभक्ताचें पडतांडणे ॥ नाठवी थोरपण सर्वथा ॥ १९० ॥ जो कां क्षीरसागर
विहारी ॥ लक्ष्मी ज्याचे चरणचुरी ॥ तो सामग्रीची मोट शिरावरी ॥ घेत श्रीहरी निजांगें ॥ ९१ ॥ ब्रह्मादिक महर्षी थोर ॥ जयासी
ध्याती दिवसरात्र ॥ तो भक्तकैवारी राजीवनेत्र ॥ थोरपण अणुमात्र धरीना ॥ ९२ ॥ अष्टमासिद्धी सहित देख ॥ इंदिरा ज्याची
आज्ञाधारक ॥ तो निजांगें कष्ट करी अनेक ॥ वैकुंठनायक जगद्गुरू ॥ ९३ ॥ मोट उतरूनत्ते अवसरीं ॥ आवलीस ह्मणतसे श्री
हरी ॥ सामग्री काढोनि घे सत्वरी ॥ स्वयंपाक करी निजहस्तें ॥ ९४ ॥ आह्मी बाहेर जाऊनि सत्वर ॥ भांडीं मिळवून आणितों
च्यार ॥ ऐसें ह्मणऊनि शारंगधर ॥ उठिले सत्वर तेधवां ॥ ९५ ॥ जिजाबाई बाहेर येत ॥ मोट सोडोनि जंव पाहत ॥ तों सर्वसा
मग्री आहे त्यांत ॥ नवल वाटत निजलागीं ॥ ९६ ॥ कणिक दाळ घृत तांदुळ ॥ शर्करा शाखा आणि गुळ ॥ जिरें सुंठ मिर्यें सकळ
॥ देखे तत्काळ दृष्टीनें ॥ ९७ ॥ साहित्य घेऊनि ते समयीं ॥ स्वयंपाकासी निघे जिजाबाई ॥ तों भांडीं मिळवून लवलाही ॥ शे
षशाई पातले ॥ ९८ ॥ मग गांवांत जाऊनि घरोघर ॥ आमंत्रण देत शारंगधर ॥ आमुच्या घरीं आहेत पितर ॥ यावें सत्वर भोज
ना ॥ ९९ ॥ ऐसें बोलतां जगज्जीवन ॥ लोक आश्चर्य करिती जाण ॥ ह्मणती आज तुकयानें मन ॥ घातलें असे संसारीं ॥ २०० ॥
एक ह्मणती शाश्वत काई ॥ घरीं साहित्य किंचित नाहीं ॥ तुका अविच्यारी विदेही ॥ गांव सर्व ही सांगीतला ॥ १ ॥ असो या प-

रीत्रिविधजन ॥ नानापरीबोलतीवचन ॥ ह्मणतीलटक्याचें आमंत्रण ॥ जेविल्यावांचूनसाचनाहीं ॥ २ ॥ तोंदिवसआला
दोनप्रहर ॥ पाकनिष्पत्तीझालीसत्वर ॥ देवेंहिंडोनिघरोघर ॥ भोजनासींसर्वत्रपाचारिले ॥ ३ ॥ इंद्रायणीतीरींजाऊन ॥ सर्व
आलेकरूनिस्नान ॥ देवेंतयासीदेऊनिआसन ॥ निजांगेंपूजनकरितसे ॥ ४ ॥ सर्वधर्मटाकोनिनिश्चित ॥ जेभक्तअनन्यशर
णयेत ॥ त्यांचींसत्कर्मेंपूर्णकरित ॥ रुक्मिणीकांतकृपाळू ॥ ५ ॥ पादपूजाबुकागंधतुलसी ॥ निजांगेंकरीतहृषीकेशी ॥ जि
जाबाईवाढीतयांसी ॥ उल्हासमानसींधरूनियां ॥ ६ ॥ जेजेपदार्थकेलेसर्वही ॥ तेतेपात्रींवाढिलेलवलाहीं ॥ घृतवाढोनशे
षशायी ॥ संकल्पपाहींसोडित ॥ ७ ॥ साहित्यकरितांलक्ष्मीवर ॥ तेंअन्नलागेरुचिकर ॥ लोकजेवितीपोटभर ॥ घ्यावयानी
रठावनाहीं ॥ ८ ॥ लीलानाटकीजगदोद्धार ॥ प्रार्थनाकरीतवारंवार ॥ जेंजयारुचेतेंसत्वर ॥ अन्नग्राह्यकरावें ॥ ९ ॥ करशुद्धि
घेतांचित्सापणीं ॥ विडेदिधलेत्रयोदशगुणी ॥ लोकआश्चर्यकरूनमनीं ॥ आवलीलागुनीबोलती ॥ २१० ॥ ह्मणतीजिजाबा
ईआजपासून ॥ संसारचिंतानकरणेंजाण ॥ तुकयानेंप्रपंचांतमन ॥ घातलेंदिसोनयेतसे ॥ ११ ॥ ऐसेंऐकूनितेसमयीं ॥ आ
वलीह्मणेभरंवसानाहीं ॥ लोकघरासींगेलेसर्वही ॥ संतोषजीवींमानूनियां ॥ १२ ॥ आणीकअन्नार्थीयाचकबहुत ॥ माहार-
पोरेंमागावयासीयेत ॥ तयासीअन्नेंवाढिलींबहुत ॥ रुक्मिणीकांतेंतेधवां ॥ १३ ॥ आवलीह्मणेचित्तांत ॥ अन्नासींबरकत
आलीबहुत ॥ मगभांडींगोळाकरूनिसमस्त ॥ रुक्मिणीकांतकायह्मणे ॥ १४ ॥ पात्रेंआणिलींमागुत्न ॥ तींज्यांचींत्यांसदे

तोंनेऊन ॥ मगनिश्चिंतपणेंकरूंभोजन ॥ उतावेळमननव्हावें ॥ २१५ ॥ इंद्रायणींच्याजळांत ॥ पात्रेंप्रक्षाळूनिसमस्त ॥ ज्यांचींत्यांसनेऊनदेत ॥ मगअदृश्यहोतजगदात्मा ॥ १६ ॥ इकडेतुकावैष्णववीर ॥ निजांगेंगहूंउपडिलाफार ॥ शेतकरीयाणेंकृतोपकार ॥ पेंढ्याच्यारदीधल्या ॥ १७ ॥ त्याघेऊनिमस्तकावरी ॥ परतोनिमाघारायेतसेघरीं ॥ तोंमोहळ्यासींकुसळलागतांवरी ॥ त्यामाशासत्वरीऊठल्या ॥ १८ ॥ शरीरींझोंबल्यासमस्त ॥ परीतुकानउडवीकोणातें ॥ ह्मणेहादेहनाशिवंत ॥ परोपकारार्थवेंचावा ॥ १९ ॥ कींआजिवडिलांचीपुण्यतिथ ॥ तेमक्षिकारूपेंआलेसमस्त ॥ ह्मणऊनियांवैष्णवभक्त ॥ ब्रह्मार्पणसोडीतदेहाचें ॥ २२० ॥ ऐसादेखोनिनिश्चयअंतरीं ॥ तेथेंगुप्तरूपेंपातलेश्रीहरी ॥ माशाउडवोनिवरिच्यावरी ॥ सौख्यशरीरींदीधलें ॥ २१ ॥ मगघरासीयेऊनप्रेमळभक्त ॥ कांतेप्रतीकायबोलत ॥ यांचासांजाभरडोनित्वरित ॥ भोजनपितरांतेंघालीकां ॥ २२ ॥ आवलीतुकयासीबोलताहे ॥ ह्मणेवेडलागलेंकाय ॥ तुह्मींचकरविलेंसकळठाय ॥ मगस्वयंपाकलवलाहेंदाखविला ॥ २३ ॥ सांगीतलेंआद्यंतवर्तमान ॥ ऐकोनितुकयाविस्मितमन ॥ अश्रुपातेंभरलेनयन ॥ ह्मणेजगज्जीवनकष्टविला ॥ २४ ॥ कंठसद्गदितहोऊनपाहीं ॥ ह्मणेकृपावंतविठाबाई ॥ जरितूनयेसीलयेसमयीं ॥ तरीमीनजेवींसर्वथा ॥ २५ ॥ तुकयाचीकरुणाऐकोनिसत्वरी ॥ तत्काळआलेपीतांबरधारी ॥ दिव्यकुंडलेंमकराकारी ॥ शंखचक्रकरींमंडित ॥ २६ ॥ ऐसेंरूपदेखोनिपाहे ॥ मगतुकयानेधरि-

लेपाय॥ जिजाईपात्रींवाढोनिठाय॥ आणीतलवलाहें तेसमयीं॥२७॥ मगशब्दांच्याउपचारें निश्चिती॥ तुकयाने
पूजिलारुक्मिणीपती॥ देवआणिभक्तनिजप्रीती॥ एकेपंक्तीजेविले॥२८॥ भावाच्याउपचारेंजाण॥ तृप्तझालारुक्मिणीरमण॥ देवपावलेअंतर्धान॥ विस्मितमनजिजाइचें॥२९॥ अहोभक्तलीलामृतग्रंथसुंदर॥ हाचिमानससरोवर॥ नानाचरित्रेंसाचार॥ ह्याकमळणीथोरविकासती॥२३०॥ आर्तवंतश्रोतेचतुर॥ जेकांप्रेमआमोदसेवणार॥
तेचियेथेंजाणावेभ्रमर॥ देतीगुंजारवनिजप्रीती॥३१॥ फुदलेअध्यायींरसअद्भुत॥ वदविताश्रीरुक्मिणीकांत॥ महिपतीत्याचालडिवाळआप्त॥ बोलबोलतशिकविले॥३२॥ स्वस्तिश्रीभक्तलीलामृतग्रंथ॥ श्रवणेंचिपुरतीमनोरथ॥
प्रेमळपरिसोतसंतभक्त॥ अष्टमोध्यायगोडहा॥२३३॥ ॥श्रीकृष्णार्पणमस्तु॥ छ॥ छ॥ छ॥

॥ अध्यायनववा ॥
वि·
तुकाराम·
चोर·
म्हैस·
चोर·
विगे·सौ·
झाडें खाते तुकारामाची म्हैस·
मंबाजीबावा·
तुकारामास·
मंबाजी मारितो·

श्रीगणेशायनमः ॥ श्रीकृष्णायनमः ॥ अज्ञानबाळकलडिवाळसाचें ॥ बोबडेबोलबोलतांवाचे ॥ मायबापासींकौतुकत्याचें
॥ पुसतीतेंचपडताळोनी ॥ १ ॥ श्रीमंताचेघरींजाण ॥ पक्कान्नाचीकायसीवाण ॥ परितेंपालटासाठीं
कंदन ॥ निजप्रीतीनेंसेविती ॥ २ ॥ जेवींक्षीराब्धिपुढेंसाचार ॥ नैवेद्यासीठेविलेंतक्र ॥ तैसींमाझींआर्षउत्तरें ॥ संतांस
मोरदिसतीपैं ॥ ३ ॥ नातरीउजळोनीकाडवाती ॥ अर्चनींवोंवाळिजेगभस्ती ॥ कींशीतळव्हावयानिशापती ॥ विंझणाहातींपालवीजे ॥ ४ ॥ नातरीकनकाद्रीसीसाचार ॥ केलेबेगडाचेअळंकार ॥ तैसींमाझींआर्षउत्तरें ॥ संतांसमोरदिसतीपैं
॥ ५ ॥ मागीलअध्यायाचेशेवटीलकथन ॥ तुकयाच्यारूपेंजगज्जीवन ॥ सर्वसाहित्यघरीं आणून ॥ पितरसंपूर्णजेवविले ॥ ६ ॥ मगघरासियेतांवैष्णवभक्त ॥ कांतेनेंसांगीतलावृत्तांत ॥ ह्मणेआह्मांनिमित्तरुक्मिणीकांत ॥
श्रमलाबहूतनिजांगें ॥ ७ ॥ मगप्रातःकाळहोतांचिजाण ॥ इंद्रायणीसीकेलेंस्नान ॥ श्रीमूर्त्तीचेंकरूनिपूजन ॥ स
प्रेमेंस्तवनकरीतसे ॥ ८ ॥ ह्मणेकृपासागरापंढरीनाथा ॥ तुवांमागेंतारिलेशरणागता ॥ यातीकूळनविचारितां ॥ संकटीं
अनंतारक्षिसी ॥ ९ ॥ नामयाचींउपवासीमरतांपोरें ॥ राजाईकष्टीहोतसेथोर ॥ तूंकेशवशेटहोऊनिशारंगधर ॥ हो
नगोणीभरआणिले ॥ १० ॥ चोखामेळाजातीचामहार ॥ त्याचींनिजांगेंवोढिलींढोरें ॥ देखोनित्याचीप्रीतीथोर ॥ त्या
च्याबरोबरजेविसी ॥ ११ ॥ ज्ञानदेवाचियेप्रीती ॥ तुवांनिजांगेंचालविलीभिंती ॥ तुझेपवाडेरुक्मिणीपती ॥ वर्णिलेसं

तींबहुफार ॥ १२ ॥ दामाजीपंतभक्तउदार ॥ त्याणेंलुटविलेंधान्यअपार ॥ मगहोऊनविठ्यानाकमहार ॥ रसदसत्वरभरलीखां ॥ १३ ॥ मिराबाईसाठीनिश्चित ॥ तुवांविषघेतलेंअनंतें ॥ तिचीलज्जारक्षोनितेथें ॥ जगींसत्कीर्त्तितेंवाढविलें ॥ ॥ १४ ॥ नरसीमेहताभक्तवैष्णव ॥ त्याचीहुंडीभरिलीदेवें ॥ निजांगेंहोऊनसावळशाव ॥ अपूर्वलाघवदाखविलें ॥ १५ ॥ ऐसेतुझेभक्तश्रीपती ॥ वैष्णवगातीत्यांचीकीर्त्ती ॥ माझीतोंअल्पमूढमती ॥ सप्रेमचित्तींइच्छितसे ॥ १६ ॥ ऐसीस्तुतीऐकोनिकानीं ॥ संतुष्टझालेचक्रपाणी ॥ ह्मणेतुकावदूलउचितवाणी ॥ तेंउचितदेउनीगौरऊं ॥ १७ ॥ कायिकवाचिकमानसीकजाण ॥ तुकयासीतपेंघडलींतीन ॥ परोपकाराचेंमहापुण्य ॥ तेथेंशक्तिसंपूर्णवेंचिली ॥ १८ ॥ आणिआषाढीकार्तिकीनिर्धारीं ॥ चालवीतपंढरीचीवारी ॥ जैसीसासुरवासिणजातमाहेरीं ॥ उल्हासअंतरींधरूनियां ॥ १९ ॥ अश्ववहनींनबैसेचिदेखा ॥ अनवाणीपंढरीसजायतुका ॥ कीर्त्तनगजरऐकोनिनिका ॥ सप्रेमस्वसुखाभोगीतसे ॥ २० ॥ संतसेवापरोपकार ॥ अनवाणीयात्राकेल्याफार ॥ हेंत्रिकायिकतपसाचार ॥ वैष्णववीरकरीतसे ॥ २१ ॥ आतांवाचिकतपकेंशारीती ॥ असत्यनबोलेवचनोक्ती ॥ नामस्मरणअहोरात्री ॥ विसरचित्तींपडेना ॥ २२ ॥ आतांमानसतपाचेंलक्षण ॥ पांडुरंगचरणींस्थिरावलेंमन ॥ जैसेंकांच्यातकपक्षीजीवन ॥ मेघावांचोनिनघेती ॥ २३ ॥ कींतान्हेंबाळकरडतांपाहे ॥ तेंमातेवांचूनिसमजेलकाय ॥ तैसातुकयाचानिश्चय ॥ पंढरीरायउपासिला ॥ २४ ॥ ऐकोनिआशंकावाटेलभाविका ॥ पं

डुरंगावीणनेणेचितुका॥तरीपरोपकारींकां भजतसे लोकां॥उत्तरऐकायेविषयीं॥ २५ ॥एकथ्थी हरीच्यासत्तेनें ॥चरा
चरवर्त्ततसेजाण॥त्याचेंमनोगतरक्षावयापूर्ण॥करितसेनमनसर्वांभूतीं॥ २६॥जैसीसासुरवासिणपतिव्रता॥तीच्या
चित्तींआवडेभर्त्ता॥जाणोनिपतीच्यामनोगता॥परिवारासभक्तांआर्जवी॥ २७॥सासूसासरानणदादीर॥हे बोलती-
नानादुरुत्तर॥तरीत्यांचेकष्टकरीतसेफार॥जाणोनीअंतरपतीचें॥२८॥तरीप्राणनाथावीणसाचार॥प्रीतीनसेचिआ
णिकांवर॥तैसेंतुकयाचेंमनस्थिर॥पांडुरंगींसुरेनिजप्रीती॥२९॥एकनधरितांउपासना॥साधकेंप्रयत्नकेलेनाना
॥तरीसाक्षात्कारनव्हेचिजाणा॥बहुतांचापाहुणाउपवासी॥३०॥तैसेंतुकयाचेंनव्हेचिमन॥कर्मउपासनाआणिज्ञा
न॥तीनीकांडांतअसेनिपुण॥दाखवीवर्तूनजनासी॥३१॥कायिकतपतेंकर्मकांडजाण॥वाचिकउपासनावर्णिवेगु-
ण॥पांडुरंगावीणकाहींचनेणें॥पूर्णआत्मज्ञाननव्हेचिकीं॥३२॥हेतिन्हीतपाचेअलंकारजाण॥तुकयाच्याअंगीं
बाणलेंलेणें॥देवतुकासीयेईलजेणें॥तेंसात्विकपुण्यजोडलें॥३३॥ऐसेंजाणोनिश्रीकृष्णमूर्त्ती॥विचारकरीतआ
पुलेचित्तीं॥ह्मणेतुकावदेलमाझीकीर्ती॥तेंकवित्वस्फूर्तीत्यासिद्यावी॥३४॥मगनामदेवाचाधरूनिहात॥देहुसी
आलेपंढरीनाथ॥तुकारात्रीअसतांनिद्रिस्थ॥दृष्टांतदाखवितजगदात्मा॥३५॥निजकरेंथापटोनिपाठी॥सावधक
रितसेजगजेठी॥ह्मणेरेतुक्यावेगींउठी॥सांगतोंगोष्टीतेऐक॥३६॥हानामामाझानिजभक्तपूर्ण॥मागेंसंकल्पयाचे-

कैलाजाण॥कींशतकोटीग्रंथप्राकृतकरीन॥इतुकापणबोलिला॥३७॥मगमींत्यासीदिधलीस्फूर्ती॥कवित्वलिहिलेंआपुल्याहातीं॥संख्यामोजितांझालेकिती॥तेहीतुजमतीसांगतों॥३८॥चाळीसलक्षचव्याणवकोटी॥नवलक्षलब्धितआलेंशेवटीं॥बाकींप्रेमाराहिलापोटीं॥मगआलावैकुंठीस्वइच्छे॥३९॥एकावनलक्षपांचकोटीजाण॥शेषराहिलेंयाचेंबोलणें॥तेंतूंवदेंप्रसादवचनें॥सप्रेमदानमीदेतों॥४०॥तुझेनियोगेंकरूनसाचा॥उद्धारहोईलबहुतांचा॥आतांव्यर्थवाउगीनवेंचींवाचा॥प्रारंभकवित्वाचाकरींकां॥४१॥इतुकादृष्टांतदाखवोनिजाण॥देवपावलेअंतर्धान॥जागृतीयेऊनिवैष्णवजन॥ह्मणेचमत्कारपूर्णदाखविला॥४२॥देवभक्तदेखिलेस्वप्नीं॥तेंध्यानसर्वआठवेमनीं॥ह्मणेप्रेमाचेंउचितचक्रपाणी॥गेलेदेउनीमजआतां॥४३॥तुकयाचेंअल्पसंतोषीमन॥पाठांतरइच्छितसंतवचन॥मगआज्ञाकेलीजगज्जीवनें॥प्रसादिकवचनेंबोलावीं॥४४॥मगतुकयासीआनंदचित्तीं॥वाटलातेव्हांकैशारीती॥जैसादिवटीचाप्रकाशइच्छितांराती॥तोंतेथेंगभस्तीउगवला॥४५॥कींऔषधवल्लीधुंडितांवनीं॥तोंअमृतकुंडदेखिलेंनयनीं॥कांध्रुवराज्यइच्छितामनीं॥तोअढळपदींनेऊनिबैसविला॥४६॥नातरीउपमन्युब्राह्मणकुमर॥दूधमागतांवाटीभर॥मगप्रसन्नहोऊनिलक्ष्मीवर॥क्षीरसागरींबैसविला॥४७॥तुकयासीउल्हासतैशाचरीतीं॥जिव्हाग्रीं बैसलीसरस्वती॥कवित्वासीप्रारंभकेलाप्रीतीं॥सप्रेममतीआपुल्या॥४८॥बाळबोधअक्षरेंलिहावींपाहीं॥हांमार्गें

अभ्यासनव्हताकांहीं ॥ कोऱ्याकागदांचीकरूनिवही ॥ स्वमतीलिहीआपुल्या ॥ ४९ ॥ वेदशास्त्राचेंनिजमथित ॥ व्या
सेंकादिलेंश्रीभागवत ॥ त्यांतहीदशमहरिलीलामृत ॥ गोकुळींक्रीडतजगदात्मा ॥ ५० ॥ तेबाळक्रीडातुकयानेआपले
मती ॥ प्रथमारंभींलिहिलीग्रंथीं ॥ नऊशेंओव्यात्याच्याअसती ॥ स्वानुभवेंजाणतीसंतसाधू ॥ ५१ ॥ कीर्तनामाजीसाचार
॥ चरित्रनसलेंपाठांतर ॥ त्याचाअभंगवरच्यावर ॥ वैष्णववीरकरितसे ॥ ५२ ॥ प्रसादिककविताऐकोनिकानी ॥ श्रोतेआ
श्चर्यकरितीमनीं ॥ कीर्तनीरंगयेतसेचौगुणी ॥ वरदवाणीह्मणोनियां ॥ ५३ ॥ जैसामेघवर्षतांसाचार ॥ अगणितउठती
तृणांकुर ॥ कांसागरींयेतीतरंगअपार ॥ संख्यानकरवेतयाची ॥ ५४ ॥ तैशाच्चपरीतुकयाप्रती ॥ कीर्तनींअनेकशब्दस्फू
र्ती ॥ संशयनराहेकोणाप्रती ॥ खळतेहीहोतीभाविक ॥ ५५ ॥ पांडुरंगाच्यादेउळींनित्य ॥ दोनप्रहरकीर्तनहोत ॥ जवळी
लगांवचेभाविकभक्त ॥ श्रवणासीयेतनित्यकाळीं ॥ ५६ ॥ एकादशीसहरिजागर ॥ कीर्त्तनहोयच्यारप्रहर ॥ कीर्त्तीप्र
कटलीदुरीचादूर ॥ प्रतिष्ठाथोरवाढली ॥ ५७ ॥ तोमंबाजीबावाब्राह्मणपाहीं ॥ चिंचवडीहोतादिवसकाहीं ॥ मगतोम
हापुरुषहोऊनिगोसावी ॥ देहूगावींराहिला ॥ ५८ ॥ मठबांधोनितेठायीं ॥ कुटुंबआणिलेंतेथेंसर्वही ॥ शिष्यशाखाअ
सतीकाहीं ॥ योगक्षेमतेहीचालविती ॥ ५९ ॥ तुकयाचीप्रतिष्ठावाढतांतेथें ॥ त्याचेमनींद्वेषउपजत ॥ ह्मणेएकामेणांतदो
नसुऱ्यानिश्चित ॥ सामावतीलकैशापरी ॥ ६० ॥ याणेआह्लादेखतांसाचार ॥ वह्याकेल्यापाठांतर ॥ याचीप्रतिष्ठावाढली

फार॥ विप्रनमस्कारकरिताती॥ ६१॥ तुकातोंशुद्रजातीचावाणी॥ मीप्रतिष्ठितमहंतयेठिकाणीं॥ याचीकीर्तीप्र
गटलीजनीं॥ मजलाकोणीनपुसती॥ ६२॥ जैसीनिरापेक्षाचींसांगतांस्थिती॥ आशाबद्धतेमनींजल्पती॥ कांस
हदेवमतासीहेळसिती॥ ज्योतिषीजैसेनिजद्वेषें॥ ६३॥ केतुह्मणेहावासरमणी॥ गांठपडतांटाकीनवदनीं॥ कींसंपू
र्णचंद्रदेखोनिनयनीं॥ राहूनिजमनींजल्पतसे॥ ६४॥ तैशाचपरीतुकयाचा॥ मंबाजीद्वेषकरीतसेसाचा॥ ह्मणेए
कदांअपमानकरूनियाचा॥ सूडसाचारघेयीनमी॥ ६५॥ इतकाद्वेषवागवीतमनीं॥ परीलौकिकार्थबैसेकीर्तनीं॥
तुकयासीतोंशत्रुमित्रमनीं॥ तत्समानदोनीसारिखे॥ ६६॥ देवालयामागेंदक्षिणेसजाण॥ झाडेंलाविलींअसतीत्या
णे॥ त्याजपासींसर्वदामन॥ कुडरक्षणसभोंवता॥ ६७॥ तोंआवलीतुकयाचीनिजकांता॥ आपाजीगुळव्यातिचापि
ता॥ त्याणेंलेंकीचीधरूनममता॥ ह्मैसतखतादिधलीपैं॥ ६८॥ तेपाण्यावरसोडितांनिश्चित॥ मंबाजीच्याबागांतशि
रत॥ कूडरेंटोनिगेलीआंत॥ झाडेंबहूतभक्षिलीं॥ ६९॥ हेंदृष्टीसीदेखोनिसाचार॥ चित्तींविक्षेपवाटलाथोर॥ अप
शब्दबोलोनीनानाप्रकार॥ मगनिवांतस्थिरराहिला॥ ७०॥ कांहींदिवसलोटतांयासी॥ तोंआलीहरिदिनीएकादशी
॥ यात्राआलीदेवदर्शनासी॥ अस्तमानासीसूर्यजातां॥ ७१॥ प्रदक्षिणेच्यावाटेवरीजाण॥ कांट्यारोविल्यामंबाजीनें॥
त्यानिजकरेंउपडिल्यातुकयानें॥ मार्गाकारणेंतेसमर्पा॥ ७२॥ हेंवेषधारियानेंदेखोनिनयनीं॥ क्रोधेंपेटलाजैसावन्ही

॥ आधींचद्वेषहोतामनीं ॥ त्यावरीपुरवणीहीझाली ॥ ७३ ॥ जैसामहासर्पेंधरिलाडाव ॥ त्याच्याशेपटीवरीपडिला
पाय ॥ तोधुधुःकारटाकितधांवे ॥ घ्यावयाजीवतयाचा ॥ ७४ ॥ तैंशापरीतोद्विजवर ॥ अपशब्दबोलतनानाप्रकार ॥ तु
कयापासीयेऊनसत्वर ॥ काठीनिजकरेंघेतली ॥ ७५ ॥ प्रेमळतुकयाच्याआंगावरी ॥ निकरेंमारीततेअवसरी ॥ परीक्ष
माशांतिधरूनअंतरीं ॥ प्रत्युत्तरींनबोले ॥ ७६ ॥ निकरेंमारितांसत्वरगती ॥ काठीफिंजहोऊनजाती ॥ मगदुसरीउपटो
निघेतलीहातीं ॥ परीदयाचित्तींउपजेना ॥ ७७ ॥ निकरेंमारितांसाचार ॥ दाहावीसकाठ्यामोडल्यावर ॥ परीतेथोनिंनढ
ळेचिवैष्णववीर ॥ सप्रेमगजरेंनामजपे ॥ ७८ ॥ तुकयाचीक्षमावर्णितांसाचार ॥ तरीदुजानदिसेपृथ्वीवर ॥ दुसरादृष्टांतयो
जितांनसरे ॥ कुंठितअंतरकवींचे ॥ ७९ ॥ निर्दयासींनाहींभूतदया ॥ मासखायित्यासीकैंचीमाया ॥ ब्राह्मणाचीवरदिसत
सेकाया ॥ परीअनामिकतयाह्मणावें ॥ ८० ॥ जैसाकुणबीविरवडझोडित ॥ तैसामारिलावैष्णवभक्त ॥ त्याचेहातदुख-
तांनिश्चित ॥ मगनिवांतराहिला ॥ ८१ ॥ दुर्जनमठासीगेलाजेव्हां ॥ तुकादेउळासीयेतसेतेव्हां ॥ गाऱ्हाणेंसांगेरुक्मिणी
धवा ॥ मारबरवादेवविला ॥ ८२ ॥ आणिशिव्यागाळ्यासींनाहींनीती ॥ हेंतुझेंचिकर्तृत्वलक्ष्मीपती ॥ आतांनकोदुर्जना
चीसंगती ॥ विक्षेपचित्तींहोयतेणें ॥ ८३ ॥ ऐशारीतीअभंगदेख ॥ निजमुखेंतुकावदलाएक ॥ कांटेमोडलेजेसकळिक ॥ ते-
पाहतीलोकदृष्टीसी ॥ ८४ ॥ सदयहृदयींज्याचाकळवळा ॥ दृष्टीसींतुकयाचीदेखिलीअवकळा ॥ आसुवेंआलींत्याच्या

डोळां ॥ ह्मणती भक्तप्रेमळा गांजिलें ॥ ८५ ॥ मग आवली नेनाच कंड घेऊनि करीं ॥ कांटे उपडिले ते अवसरीं ॥ ह्मणे काळ्याने पाठ घेतली वरी ॥ केली संसारीं फजिती ॥ ८६ ॥ मग कृपादृष्टी पंढरीनाथें ॥ तुकयाकडे पाहिलें त्वरित ॥ तों काळ्याचीं क्षतें मिळालीं समस्त ॥ आराम वाटत शरीरासी ॥ ८७ ॥ एकादशी सह हरिज्यागर ॥ यात्रा मिळाली असे फार ॥ कीर्तनीं बैसले लोक समग्र ॥ मग वैष्णववीर काय ह्मणे ॥ ८८ ॥ मंबाजी बावा महापुरुष ॥ अखंड येता ती कीर्तनास ॥ आजि कां उशीर लागला त्यांस ॥ मग बोलावयासी पाठविलें ॥ ८९ ॥ त्याणें तुकयासी धाडिलें उत्तर ॥ माझें अंग दुखतें फार ॥ ऐसें ऐकोनि वैष्णववीर ॥ जात सत्वर त्यापासीं ॥ ९० ॥ साष्टांग दंडवत घालोनि जाण ॥ आंग रगडीत बैसे आपण ॥ ह्मणे निजांगें झोडितां कांटवण ॥ आला शीण स्वामीसी ॥ ९१ ॥ म्या झाडासीं उपद्रव दिधला नसता ॥ तरी तुमचा विक्षेप कासया होता ॥ हा अपराध क्षमा करूनि तत्वता ॥ कीर्तनासी आतां चलावें ॥ ९२ ॥ ऐसें ह्मणऊनि वैष्णववीर ॥ रगडित बैसे घटिका च्यार ॥ मंबाजीचें लज्जित अंतर ॥ मग कीर्तनासी सत्वर चालिला ॥ ९३ ॥ जैसा समुद्रें झांकिला वडवानळ ॥ त्यातें वेष्टीत अवघेंचि जळ ॥ परि तो न विझेचि अळुमाळ ॥ शोषी न सकळ ह्मणतसे ॥ ९४ ॥ तैसाचि तुका शांतिसागर ॥ मंबाजी तयासी वैश्वानर ॥ शीतळ दिसतो बाह्याकार ॥ परी द्वेषें झुरे निज अंतरीं ॥ ९५ ॥ संतीं चमत्कार दाखविले फार ॥ परी खळाचें सुटून व्हेचि अंतर ॥ ये विषयीं दृष्टांत साचार ॥ ऐका चतुर निजकर्णीं ॥ ९६ ॥ घ्यावया पांडवांचा कैवार ॥ देवें चरित्र दाखविलें फार ॥

॥ परीदुर्योधनाचेंकपटीअंतर ॥ तेंसाचारपालटेना ॥ ९७ ॥ तैसाकुचरबैसलाकरीतश्रवण ॥ परीगुणदोषावरीत्याचें मन ॥ कींबकाचेंशुद्धध्यान ॥ कैंचेंपुण्यतेठायीं ॥ ९८ ॥ सर्पनखायअन्नासी ॥ तरीत्यासीकायघडलीएकादशी ॥ जरीचित्तसुद्धनसतांमानसीं ॥ तरीसाधनतयासीघडेना ॥ ९९ ॥ दगडबोलतनाहींकोणा ॥ तरितोकाययोगीअबोलणा ॥ राखेंतगाढवेंलोळतीजाणा ॥ परीअनुतापमनानहोय ॥ १०० ॥ उंदीरबिळांतबैसलापरी ॥ तोसर्वदाआंतउकरी ॥ तैसाकुचरबैसलाकीर्तनीजरी ॥ परीद्रवेनाअंतरींसर्वथा ॥ १ ॥ परीतुकयाचीसमताजाण ॥ शत्रुमित्रतत्समान ॥ चित्तींसर्वथानधरीचकुडेपण ॥ सप्रेमकीर्तनकरीतसे ॥ २ ॥ नामरूपींजडलेंचित्त ॥ ह्मणोनिझालादेहातीत ॥ कीर्त्तनामाजीबैसलेश्रोतेसंत ॥ सप्रेमभरिततेझाले ॥ ३ ॥ कृष्णाविष्णुहरिगोविंदा ॥ अच्युतामाधवाआनंदकंदा ॥ परमपुरुषासच्चिदानंदा सोडवींभवबंधापासूनी ॥ ४ ॥ अनाथरक्षकापांडुरंगा ॥ मदनतातारुक्मिणीरंगा ॥ कर्मकर्दमनलिंपेअंगा ॥ ऐसेंश्रीरंगाकरावें ॥ ५ ॥ काळचक्रामाजीनिश्चिती ॥ जीवभ्रमतोनिजकर्मगती ॥ येथोनिसोडवींसत्वरगती ॥ रुक्मिणीपतीश्रीविठ्ठला ॥ ६ ॥ ऐसीकरुणाभाकूनिफार ॥ कीर्तनीनांचेसप्रेमगजर ॥ टाळविणेवाजतीसुस्वर ॥ नादेंअंबरकोंदलें ॥ ७ ॥ टाळ्याचुटक्यांचीघाई ॥ निद्राआळसकोणासनाहीं ॥ कीर्तनीश्रोतेझालेविदेही ॥ हेंचिनवाईअगाध ॥ ८ ॥ संतचरित्रेंरसाळपूर्ण ॥ हेंचिलाविलेंअनुसंधान ॥ श्रवणकरितीभाविकजन ॥ वेधलेंमनतयांचें ॥ ९ ॥ असोतुकाकीर्त्तनक-

रित ॥ कांतानिद्रिस्थमंदिरांत ॥ तोंदोघेतस्करयेऊनितेथ ॥ कायकरितीतेंऐका ॥ ११० ॥ दुभतीह्मैसबांधिलीघरीं ॥ तीसोडूनिनेलीतेअवसरीं ॥ पुढेंएकमोहरकीधरी ॥ मागूनसत्वरीएकहांकी ॥ ११ ॥ गांवापासूनिपश्चिमेस ॥ थोडक्याचीवाडीपावकोश ॥ तेथवरीजातांतस्करांस ॥ हेंदेवासश्रुतझालें ॥ १२ ॥ ह्मणेतुकातोंरतझालाअसेकीर्तनीं ॥ आवलीनिद्रिस्थझालीसदनीं ॥ ह्मैसनेलीतस्करांनी ॥ तेसोडऊनिआणावी ॥ १३ ॥ आह्मीनजातांयेअवसरीं ॥ तुकयासीगांजीलनानापरी ॥ ऐसेंह्मणऊनिभक्तकैवारी ॥ कौतुककायकरिततेव्हां ॥ १४ ॥ महाविक्राळपुरुषश्रीपती ॥ रूपनटलासहजस्थिती ॥ थोरटोणपाघेतलाहातीं ॥ तस्करांप्रतीमारावया ॥ १५ ॥ चोरपुढेंजातीसत्वर ॥ तोंविक्राळपुरुषवाटेवर ॥ हातींमुसळघेतलेंथोर ॥ मस्तकावरीहाणावया ॥ १६ ॥ एकमेकांसीबोलतीउत्तर ॥ हाकोणपुरुषवाटेवर ॥ नेणोंमहद्भूतदिसेथोर ॥ कैसाविचारकरावा ॥ १७ ॥ गाऊललागलेंहोतेंहातीं ॥ परीहेंनाहींआपुलेसंचितीं ॥ प्रारब्धाचीविचित्रगती ॥ नेणोंसंचितींकायआहे ॥ १८ ॥ ऐसेंह्मणऊनितेतस्कर ॥ दुसऱ्यापंथेंचालिलेसत्वर ॥ तोंतिकडेहीटोणपाघेऊनिथोर ॥ शारंगधरउभाअसे ॥ १९ ॥ परमभयवाटलेंचित्तीं ॥ ह्मणतीआतांकैसीकरावीगती ॥ अष्टदिशाविलोकूनपाहाती ॥ तोंदिसेश्रीपतीचहूंकडे ॥ १२० ॥ ह्मणतीकाळपुरुषहाधरिंगण ॥ आडवायेतोआह्मांकारणें ॥ ब्रह्मराक्षसकींपिशाचजाण ॥ घ्यावयाप्राणपातला ॥ २१ ॥ पाहांटझालीउगवेलदिन ॥ मगभलताचिधरीलआह्मांकारणें ॥ आ

तांउपायकरावाकवण॥उद्विग्नमनयासाठीं॥२२॥मगएकमेकांसीं विचारकरित॥तुकाविठोबाचाह्मणवितोभक्त
॥त्याचीह्मैसनेतोंनिश्चित॥यास्तवभूतपुढेंआलें॥२३॥नेणोदेवाचीमाव अघटित॥आपणासींअपराधघडला
सत्य॥ आतांह्मैसबांधावीजेथीलतेथ॥तरीच अघातचुकेलहा॥२४॥ऐसेंह्मणऊनितेतस्कर॥गांवाकडेधरिलीमो
हर॥ मागूनियेतसेरुक्मिणीवर॥टोणपानिजकरेंघेऊनियां॥२५॥तस्करांभयवाटेचित्ता॥ह्मणतीमागूनिहाणील
कायअवचिता॥ऐशारीतीधाकेंघालितां॥गावांततत्वताप्रवेशले॥२६॥मगजाऊनितुकयाच्यावाडियांत॥ह्मैसबांधि
लीजेथिंच्यातेथ॥लगबगांगांवाबाहेरजात॥तोंतेथेंजगन्नाथउभाअसे॥२७॥विक्राळरूपभयानक॥हातींमुसळ
घेतलेंदेख॥तस्करींमार्गधरिलाआणिक॥तोंवैकुंठनायकउभातेथें॥२८॥गावांतखिंडीठायींठायीं॥निघोंपाहती-
लवलाहीं॥तोकाळपुरुषसर्वाठायीं॥एकहीनाहींस्थळरितें॥२९॥तस्करांसीभयवाटलेंफार॥ह्मणतीतुकाकरि-
तोकीर्त्तनगजर॥तेथेंजाऊनियांसत्वर॥त्यासीहाविचारसांगावा॥१३०॥ऐसेंह्मणऊनितेअवसरीं॥कीर्त्तनामाजी
आलेसत्वरीं॥लज्जाभयनधरूनिअंतरीं॥मधुरोत्तरींबोलती॥३१॥हातजोडूनितेचोर॥उभेराहातीतुकयासमोर॥
ह्मणतीआह्मीदोघेतस्कर॥अपराधथोरआचरलों॥३२॥तुमचीह्मैससोडोनिदेख॥नेतहोतोंतात्काळिक॥तोंवाटे
सकाळपुरुषएक॥आडवासम्यकदेखिला॥३३॥टोणपाघेतलासेनिजकरीं॥जिकडेजातोंतिकडेयेतसेसमोरी॥ते

ध्वांहेंसआणोनीसत्वरी॥तुमचेघरींबांधिली॥३४॥मगसत्वरपळोनिजातांपाहे॥तोंगांवद्वारींबैसलाचआहे॥जिकडेजातोंतिकडेचिहोय॥यासींउपायकोणना॥३५॥तूंविष्णुभक्तअद्वेष्टापूर्ण॥शत्रुमित्रतत्समान॥आतांआमचीस्फूटकाहोईलजेणें॥तोउपायकरणेंसमर्था॥३६॥ऐसीतस्करांचीवाणी॥सकळलोकऐकतीश्रवणीं॥तेविस्मितझालेआपुलेमनीं॥चरित्रऐकोनीअद्भुत॥३७॥तुकयासीआश्चर्यवाटलेंचित्तीं॥मगध्यानांतआणीपांडुरंगमूर्ती॥तोंकीर्त्तनांतनाहींरुक्मिणीपती॥ह्मणेयथार्थसांगतीतस्कर॥३८॥नेत्रझांकोनियांतेव्हां॥पांडुरंगाचामांडिलाधांवा॥ह्मणेपंढरीनाथादेवाधिदेवा॥गेलासीकेव्हांयेथोनी॥३९॥आह्मीकरितोंहरिजागरण॥तूंतरीफिरतोसीरानोरान॥ढोरेंराखावयाचीसवयजाण॥पहिल्यापासोनलागली॥१४०॥आह्मीसद्भावेंवर्णितोंगुण॥येथेंनरमेचितुझेंमन॥आणिवेडेंवाकुडेंरूपधरून॥देशीदर्शनतस्करांसी॥४१॥आतांप्रभातसमयझालापाहीं॥आरतीचेसमयींतरीयेईं॥कृपासागराशेषशायी॥उचितनाहींहेंतुझें॥४२॥आमच्यानावडतीसप्रेमगोष्टी॥पळोनिगेलासीउठाउठी॥हातींघेऊनिथोरकाठी॥धांवसीपाठीचोरांच्या॥४३॥तूंसखानसंतांप्रेमळांचा॥कीर्तनींरंगनभरेसाचा॥ऐकोनिधांवातुकयाचा॥आलादेवाचादेवहरी॥४४॥तुकानाचतसेंकीर्त्तनांत॥तोंमागूनआलेपंढरीनाथ॥हातींटोणपाघेतलानिश्चित॥लोकपाहातसभोंवते॥४५॥तस्करांसींविक्राळदिसेमोठा॥इतरलोकांसाधारणगाठा॥तु

कातस्करांसीह्मणेउठा ॥ आपुल्यावाटाक्रमावें ॥ ४६ ॥ ह्मैसलागेलतुह्माकारणें ॥ तरीआतांचिसत्वरन्यावीसोडून
॥ तस्करह्मणतीवांचलाप्राण ॥ हेंचितुझेदेणेआह्मांसी ॥ ४७ ॥ ऐसेंह्मणूनियांतेचोर ॥ पळोनिगेलेवरिच्यावर ॥ अ
द्भुतचरित्रदेखोनिथोर ॥ करितीगजरनामघोषें ॥ ४८ ॥ चरित्रदेखिलेंऐकिलेंकानीं ॥ मंबाजीविस्मितझालामनीं ॥
ह्मणेयाचीप्रतिष्ठावाढेलजनीं ॥ ऐसीकरणीदिसताहे ॥ ४९ ॥ ऐसेंह्मणोनियांमानसीं ॥ आपुल्याजागीउगाचसुससु
सी ॥ विष्णुभक्ताचीमहिमाकैसी ॥ द्वेषबुद्धिसीकळेना ॥ १५० ॥ असोयाअभक्तांचीकथा ॥ वारंवारयेतसेदृष्टांता ॥ ते
णेवाग्देवीभ्रमतसेवृथा ॥ उबगश्रोतांनमानिजे ॥ ५१ ॥ अभक्तनिर्माणहोतसेक्षिती ॥ यास्तवभक्तांचीवाढलीकीर्ती ॥
जरीखोटीनाणींनिर्मिलीनसतीं ॥ तरीखरेंह्मणतीमगकोणा ॥ ५२ ॥ जरीनिर्मिलीनसतीयमपुरी ॥ तरीस्वर्गाचीआ-
शाकोणधरी ॥ हिंडणेंनसतेंचवऱ्यासीफेरीं ॥ तरीमोक्षाचीधरीकोणआस्था ॥ ५३ ॥ साचपणेंचिदेहासीमरणनसतें ॥
तरीमगअमृतासीकोणपुसतें ॥ तेवीअभक्तांच्यायोगेंनिश्चित ॥ भक्तप्रख्यातझालेकीं ॥ ५४ ॥ महाअंधकारनसतांरा-
त्री ॥ तरीकैसीझळकतीदीपकज्योती ॥ रावणाच्यायोगेंनिश्चिती ॥ श्रीरामसत्कीर्तीपावला ॥ ५५ ॥ असोतहींभाषणे
बहुवस ॥ तस्करानींनेलीनसतीह्मैस ॥ मगकैसादाखविताजगन्निवास ॥ चरित्रविशेषसंतांचें ॥ ५६ ॥ मगवैष्णवतु
कातेअवसरीं ॥ चरित्रगातसेनानापरी ॥ ह्मणेभक्तासीपावलाश्रीहरी ॥ कैशापरीतेंऐका ॥ ५७ ॥ विष्णुचीकीर्तीनाय

केकानी॥ह्मणोनिहिरण्यकशपूजल्पतसेमनीं॥प्रल्हादाचाधांवाऐकोनी॥खांबांतचक्रपाणीप्रकटला॥५८॥अपायकरितांनिजभक्तांस॥अधिकचिवाढेकीर्तीघोष॥दुर्योधनेंगांजितांद्रौपदीस॥तोंचरित्रविशेषवाढलें॥५९॥निजभक्ताचेंनसाहेउणें॥यास्तवधांवलाश्रीकृष्णा॥अनंतवस्त्रेंनेसविलीजाण॥मगसकळदुर्जनलाजले॥१६०॥पवित्रसाधूंचाप्रतिपाळ॥स्वधर्मस्थापावेनिजांगेंसकळ॥ह्मणोनिनपाहातांकाळवेळ॥अवतरेघननीळनिजांगें॥६१॥मजलाभासेऐशारीती॥कलियुगाचीतोंअद्भुतख्याती॥भक्तांसाठींनानाविपत्ती॥रुक्मिणीपतीसोसीतसे॥६२॥सांवतामाळीभक्तप्रेमळ॥त्याजपासींजायघननीळ॥लपावयासीमागतांस्थळ॥उदरतत्काळचिरियेलें॥६३॥ज्याच्यारोमरंध्रींसकळसृष्टी॥तोनिजभक्ताच्यासमावेपोटीं॥सांवत्यापासींगुजगोष्टी॥बोलेजगजेठीप्रीतीनें॥६४॥तोंनामाआलाविलापत॥तोंसांवत्यानेगिळिलारुक्मिणीकांत॥पीतांबराचीदशीदिसत॥मगवोढोनिकाढितनिजहस्तें॥६५॥उदरांतूनिनिघेघननीळ॥तरीतोसांवत्याच्यापोटींचाबाळ॥ऐसेंतुकयानेतेवेळ॥चरित्रप्रेमळगायिलें॥६६॥श्रोतयांसह्मणेवैष्णवभक्त॥संसारअवघाअशाश्वत॥जोश्रीहरीभजनींहोईलरत॥तरीकळिकाळअंकितहोयत्याचा॥६७॥ऐसाउपदेशहोतांकीर्तनीं॥तोंउदयापावलावासररमणी॥जयजयकारेंटाळ्यापिटोनी॥विठ्ठलस्मरणींगर्जती॥६८॥मगउजळोनिमंगळारती॥वोंवाळिलाश्रीरुक्मिणीपती॥पुढिलेअध्यायींरसोत्पत्ती॥तरीसादरश्रोतीं

परिसिजे ॥१६९॥ अहोभक्तलीलामृतग्रंथसार ॥ वदविताश्रीरुक्मिणीवर ॥ महिपतीनिमित्तासींआधार ॥ हेंसर्वज्ञचतुरजाणती ॥७०॥ स्वस्तिश्रीभक्तलीलामृतग्रंथ ॥ श्रवणेंचिपुरतीमनोरथ ॥ प्रेमळपरिसोतभाविकभक्त ॥ नवमोध्यायरसाळहा ॥१७१॥

॥श्रीकृष्णार्पणमस्तु॥ छ॥ छ॥ छ॥ छ॥

अध्याय दाहावा.
वि.
आवली
तुकाराम
वि.
अरण्य
ब्राह्मण
तुकाराम
महातारी
आवली
मुलगा
शेजारी

श्रीगणेशायनमः ॥ श्रीपूतनाप्राणहरणायनमः ॥ जयजयकरुणासिंधुजगजेठी ॥ तूंभक्तांसीपाहासीकृपादृष्टी ॥ तैंत्यांसंसाराचीपाडोनितुटी ॥ नोडिसीफांसाटीभवबंधा ॥ १ ॥ सगुणकांतादेतांनयातें ॥ तेथेंभक्तांचीबैसलीप्रीत ॥ यास्तवकर्कशेचीसंगत ॥ देशीनिश्चितत्यालागीं ॥ २ ॥ सत्पुत्रभक्तासीदेतां ॥ तरीसंसारींगुंतेलत्याचीआस्था ॥ ह्मणोनिबापलेंकांतउभयतां ॥ बिघडअवचितापाडिसीतूं ॥ ३ ॥ धनधान्यभक्तांसीदेतांफार ॥ तरीसुखेंकरितीलतेसंसार ॥ मगमाझ्याभजनींपडेलविसर ॥ ह्मणोनिथोडेंचअन्नवस्त्रदेत्यांसी ॥ ४ ॥ तुझीकरणीपंढरीराया ॥ बरीचित्तींबिंबलीमाझिया ॥ कृपादृष्टीनेपाहासीजया ॥ त्याचीमायानिवारिसी ॥ ५ ॥ दुर्जनासीघालोनिअनिवारभ्रांती ॥ भक्तांसीछळविसीतयांहातीं ॥ मगआपुलेंचरित्रनानारीती ॥ श्रीरुक्मिणीपतीदाविसीतूं ॥ ६ ॥ विष्णुसहस्रनामांतजाण ॥ तुझेंनामठेविलेंद्वैपायनें ॥ कींतूंभयकृद्भयनाशन ॥ तेंसत्यचदिसोनमजआलें ॥ ७ ॥ एवंतूंचिअवघासत्ताधारी ॥ हालविसीयाचित्राचीदोरी ॥ निमित्तठेऊनमजवरी ॥ जडमूढवैखरीवदविसी ॥ ८ ॥ मागिलेअध्यायांचरित्रसुरस ॥ तस्करघेऊनजातांह्मैस ॥ तीसोडऊनिहृषीकेशें ॥ कौतुकजनासीदाखविलें ॥ ९ ॥ कालहरिदिनीव्रतथोर ॥ च्यारीप्रहरझालाजागर ॥ मगवोंवाळूनिरुक्मिणीवर ॥ वैष्णववीरकायकरी ॥ १० ॥ इंद्रायणीतीराजाऊन ॥ केलेंतुकयानेंप्रातःस्नान ॥ मगपांडुरंगाचेंकरितांअर्चन ॥ निजप्रीतीनेंआपुल्या ॥ ११ ॥ आवलीससकळलोकसांगती ॥ तुझीह्मैसतस्करेंनेलीराती ॥ मगविठोबानेदाखवू

निमचीती ॥ आणविली मागुती माघारी ॥१२॥ ऐसा चमत्कार ऐकोनि तेथें ॥ विस्मित झाली आपुल्या चित्तें ॥ तुकयासी बैसविलें भोजनातें ॥ अतिहर्षातें मानूनियां ॥१३॥ शिजविली होती भात भाकरी ॥ तयासी भाजी वाढिली तिसरी ॥ मग दूध आणिलें वाटीभरी ॥ तेव्हां आश्चर्य करी विष्णुदास ॥१४॥ मग आवलीसी तुका बोले उत्तर ॥ आपुलें सुस्थ करून अंतर ॥ दूध देसील तांब्याभर ॥ तरी देवासी सत्वर पाजीन मी ॥१५॥ मग पितळेचें पात्र उठोनि निहातें ॥ दूध भरूनि दिधलें त्यांत ॥ देउळीं जाऊन प्रेमळ भक्त ॥ मूर्त्तीसी पाजित तेधवां ॥१६॥ आतां पाषाणमूर्त्ती दिसती लोकां ॥ तिसीं दूध नित्य पाजीतसे तुका ॥ जो वश न व्हे चित्र ब्रह्मादिकां ॥ तो होतसे भाविकां स्वाधीन ॥१७॥ ऐसे लोटतां चि दिवस फार ॥ आवलीस विकल्प पातला थोर ॥ ह्मणे नित्य दूध नेतो तांब्याभर ॥ कैसा विच्यार कळेना ॥१८॥ घरीं पोर वडार वावयासी साजणी ॥ कैसें होईल ताकपाणी ॥ संसार चालेल कैसेनी ॥ निघलें लोणी किंचित ॥१९॥ मग तान्ही कन्या भागीरथी ॥ देउळीं नित्य जात सांगाती ॥ जिजाई पुसे तयेसी एकांतीं ॥ गोजारूनि प्रीती निजलोभें ॥२०॥ ह्मणे दूध मागूनि मजला ॥ देउळीं नेतो तुझा ब्याला ॥ तें सत्य चि पीत असतो काळा ॥ ऐसें मजला सांगावें ॥२१॥ ऐकोनि ह्मणे भागीरथी ॥ सत्य चि दूध पीतसे मूर्त्ती ॥ उरलें शेष तें वडील घेती ॥ मज ही देती किंचित ॥२२॥ ऐकोनि लेंकुराची वाणी ॥ आश्चर्य करीत आपुले मनीं ॥ मग तुकयासी ह्मणे एक दिनीं ॥ दूध पाजोनि मी येत्यें ॥२३॥ अवश्य ह्मणतां प्रेमळ भक्त ॥ आवली जातसे देउळांत ॥ संकटीं पडिले पंढरीनाथ

॥ ह्मणतीकैसीमानकरावी ॥ २४ ॥ दूधप्यावेंजरीयेसमयीं ॥ तरीसप्रेमइच्छाभावार्थनाहीं ॥ आणिचमत्कारनदाख-
विनांकांहीं ॥ तुकयासीगृहींगांजीलहे ॥ २५ ॥ ऐसेंह्मणऊनिरुक्मिणीकांत ॥ उगेचिराहिलेमगनिवांत ॥ आवलीचेंभ
यवाटलेंबहुत ॥ विरोधचालविनह्मणोनी ॥ २६ ॥ दूधप्यावेंकीनप्यावेंयेथ ॥ ऐसेंकल्पीतपंढरीनाथ ॥ भक्तांसाठींसगु
णहोत ॥ येऱ्हवींगुणातीतजगदात्मा ॥ २७ ॥ जोक्षीराब्धिवासी देवाधिदेव ॥ त्याचाहीदुग्ध्यांतपडिलाजीव ॥ तरीनायके
अकळिलाशिव ॥ नवलअपूर्वमजवाटे ॥ २८ ॥ आंधारेंकोंडिलावासरमणी ॥ कींचंद्रकांपतोहिवेंकरूनी ॥ काळासीभ
यवाटलेंमनीं ॥ येतोऐकूनीबागुल ॥ २९ ॥ प्रभंजनकोंडिलापिंजऱ्यांत ॥ आकाशआडकलेंघागरींत ॥ नक्षत्रतेजेंआदि
त्यलोपत ॥ हेंतोंअघटितदिसतसे ॥ ३० ॥ अविनाशनिश्चळपरब्रह्ममूर्त्ती ॥ ज्यासीयोगीहृदयींध्याती ॥ तोचिंताक्रांतजा
हलाचित्तीं ॥ सप्रेमभक्तीचेनिजबळें ॥ ३१ ॥ मगदूधघेऊनितांब्याभर ॥ आवलीदेउळासीआलीसत्वर ॥ चित्तींनसेनि
प्रेमादर ॥ शुद्धअंतरमगकैचें ॥ ३२ ॥ दूधउष्णाहोतेंफार ॥ बैसोनिनिववावें क्षणभर ॥ हाआवलीसनकळेचिविच्यार ॥ द्वा
वेदारह्मणेदेवा ॥ ३३ ॥ ह्मणेवेडाकरूनिघरधणी ॥ याणेंलाविलाआपुलेभजनीं ॥ यास्तवविरोधचालवीमनीं ॥ मगच
क्रपाणीकरीकाय ॥ ३४ ॥ उष्णातांब्यालाविलाहोटीं ॥ तेणेंचिपोळलाजगजेठी ॥ मानवांकुडीकरितांदिठी ॥ आवलीपोटीं
विस्मित ॥ ३५ ॥ ह्मणेकाळापाषाणदिसतोनयनीं ॥ परीजीवआहेपाळाशुनी ॥ दूधपाजितोनित्यघरधनी ॥ असत्यकर

पीहेनोहे ॥ ३६ ॥ आवलीन्याहाळोनिपाहेकोडें ॥ उगीचविलोकीदेवाकडे ॥ तों होटासी आला असेफोड ॥ ह्मणे
नवलरोकडें हें दिसे ॥ ३७ ॥ ऐसाचमत्कारदेखोनिपाहीं ॥ घराआलीजिजाबाई ॥ तों तुक्याचेध्यानीं शेषशायी ॥ ये
ऊनकायसांगतसे ॥ ३८ ॥ तुवांआळसधरूनिचित्तीं ॥ दूधपाठविलें आवलीहातीं ॥ तीणेउष्णतांब्याळाविलाहोटीं
॥ विचारपोटींनकेला ॥ ३९ ॥ तुवांटाकिलासंसार ॥ यास्तवमजसींचालवीवैर ॥ नांवठेविलें दावेदार ॥ मायाअणुमा
त्र असेना ॥ ४० ॥ ऐसेंसांगतांहृषीकेश ॥ तुकाझालाकासाविस ॥ कांतेसीह्मणेउष्णकैसें ॥ दूधदेवासपाजिलें ॥ ४१
मगआवलीबोलेप्रतिवचन ॥ तूंनित्यदेउळींगातोसिगाणें ॥ कींद्वादशगावींगोंविला भग्न ॥ तुझ्यास्त्रीकृष्णेंगोकुळीं
॥ ४२ ॥ आणिमाझें दूधकिंचितउष्ण ॥ यास्तवबांकुडीकेलीमान ॥ होंटासीफोडआलातरतरोन ॥ पाहेंजाऊनदेउळीं ॥
॥ ४३ ॥ जरीमागीलसत्यअसतीलीळा ॥ तरीदूधपितांकैसापोळला ॥ ऐकोनिआवलीच्याबोला ॥ तुकाझालासद्गदित
॥ ४४ ॥ मगजाऊनिधांवतधांवत ॥ देउळींजाऊनिमूर्तीपाहात ॥ तोंमानआखडिलीपंढरीनाथें ॥ फोडदिसतहोटासीं ॥
॥ ४५ ॥ मगतुकयाचेंसप्रेममन ॥ अश्रुपातें भरलेलोचन ॥ जैसें बाळकपोळतांदेखोन ॥ कासाविसमनहोयमातेचें ॥
॥ ४६ ॥ तैशाचपरीप्रेमळतुकया ॥ गहिंवरेंकंठदाटोनियां ॥ ह्मणेतूंपोळलासीपंढरीराया ॥ अनाथसखयाजगद्गुरू ॥
॥ ४७ ॥ स्तुतिस्तोत्रेंगातांपाहीं ॥ फोडनोजिरलातेसमयीं ॥ परीमानबांकुडीराहिलीकांहीं ॥ तेपाहातीसर्वहीअद्यापी ॥

॥ ४८ ॥ पुढेंपाहावयाचमत्कार ॥ साक्षठेवीनरुक्मिणीवर ॥ आपुल्यादासाचीकीर्तीथोर ॥ करुणाकरवाढवीतसे ॥
॥ ४९ ॥ एकदांचाकुणाच्यारानांत ॥ तुकयाएकटाजातसेपथें ॥ तों अकस्मातडांसयेऊन अगणित ॥ झोंबलेबहुत
शरिरासीं ॥ ५० ॥ हें देखोनियांवैष्णवभक्त ॥ त्याचेंदुःखनमानीकिंचित ॥ ह्मणेपरोपकारीं देह लागत ॥ ह्मणऊननिवां
तबैसला ॥ ५१ ॥ आपणशरीररक्षावेंजाण ॥ तरीइतुक्याजीवांचेंदुखवेलमन ॥ अशाश्वत देहजायालजाण ॥ अनु-
तापेंपूर्णवोळखिलें ॥ ५२ ॥ डांसडसतांनानारीती ॥ शरीरासीबहूतयातनाहोती ॥ परितोदुःखनमानीनिचित्तीं ॥ भ-
जनप्रीतीनेंकरितसे ॥ ५३ ॥ तोंवाटसऱ्याचेरूपेंनिश्चिती ॥ सत्वरपातलेरुक्मिणीपती ॥ सिंदीचाफडघेतलाहातीं ॥
डांसझोंबतीह्मणोनियां ॥ ५४ ॥ आणिकहीपांतस्थआलेकोणी ॥ त्याणींतुकयासीदेखिलेंनयनीं ॥ परीआपल्या-
जीवाच्याभयेंकरूनी ॥ सुडवितीकोणीसर्वथा ॥ ५५ ॥ तान्ह्याचाकळवळापाहे ॥ मातेवांचोनिकोणासीनये ॥ तैसीकृ-
पाळुविठ्ठलमाय ॥ येतसेलवलाहें तुकयाजवळी ॥ ५६ ॥ डांसउडवूनिआपुल्याकरीं ॥ निजकरेंकुरवाळीतश्रीहरी ॥
तेणेंकरूनसुखझालेंशरीरीं ॥ मगतुकासत्वरीचालिला ॥ ५७ ॥ अस्तमानासीजातांदिनकर ॥ तुकापावलादेहुक्षेत्र
॥ मगराउळासीयेऊनिसत्वर ॥ रुक्मिणीवरपाहिला ॥ ५८ ॥ जैसीदंडकाठीपडेलखालती ॥ उठावेंहेंनेणेचित्तीं ॥ दंड
वतघातलेंतयारीती ॥ सप्रेमगतीकरूनी ॥ ५९ ॥ रात्रसमयहोतांचिसत्वरी ॥ कीर्त्तनमांडिलेंतेअवसरीं ॥ जयपतीन-

पावनाश्रीहरी ॥ भवसागरींतारावें ॥ ६० ॥ खावयासीनमिळोअन्न ॥ पुढेंनवाढोसंतान ॥ परीतुझीकृपाइच्छितसें
जाण ॥ विच्यार आननसेकीं ॥ ६१ ॥ शरीरविटंबोनानारीती ॥ संसारींहोवोतकांविपत्ती ॥ परीतुझी कृपाइच्छि तोंचि
त्तीं ॥ नलगेश्रीपती आनकांहीं ॥ ६२ ॥ जैसीमाझीवाचाभजसीं ॥ नित्यस्वसुखेंउपदेशी ॥ आणीककोणीपुसतील्या
सी ॥ याचिमार्गासींलाविन ॥ ६३ ॥ ऐसेंह्मणऊनिवैष्णवभक्त ॥ सप्रेमभावेंभजनकरित ॥ रामकृष्णादिनामगात ॥ ऐक
तिजनासीं ॥ ६४ ॥ तीनप्रहरलोटतांरात्री ॥ मगउजळिलीमंगळारती ॥ ओंवाळूनिश्रीरुक्मिणीपती ॥ दंडवतप्रीतीघा
लें ॥ ६५ ॥ घरासीं गेलेश्रोतेसज्जन ॥ मगतुकयानेघातलें आसन ॥ नामरूपींलाऊनिमन ॥ सप्रेमभजनकरितसे ॥ ६६ ॥
ऐसेलोटतांकांहींदिवस ॥ तोंचरित्रवर्तलेंअतिसुरस ॥ दोघेपुत्रअसतीतुकयास ॥ नामेंतयांसकोणतीं ॥ ६७ ॥ वडील
कुमरतोमहादेवजाण ॥ विठोबाधाकुट्यासनामाभिधान ॥ तंवज्येष्ठपुत्राकारणें ॥ व्यथादारुणजाहली ॥ ६८ ॥ मूत्रखडा
लागलाअसे ॥ तेणेहोतसेकासाविस ॥ आवलीउपायबहुवस ॥ करीतसेतेधवां ॥ ६९ ॥ जेंजें औषधसांगतीकोणी ॥ तेंतें
मिळऊन आणीतनानाप्रयत्नीं ॥ पथ्यकरवितत्याकडोनी ॥ झुरेनिशिदिनीपुत्रलोभें ॥ ७० ॥ वैद्यवाणीकेलेफार ॥ परी
॥७६॥ देवाधिदेवारुक्मिणीवरा॥ जावेंतुकयाच्यासमाचारा॥ ऐसेंह्मणऊनित्याअवसरा॥ आपुलाल्याघराचालिले
॥७७॥ पंथक्रमितांनित्यानित्य॥ देहूसीवारकरीआलेसमस्त॥ तोंतुकाबोळवीतआलापंथ॥ उभातेथेंचिअसेकीं॥
॥७८॥ निढळावरीठेऊनिकर॥ वाटपाहातनिरंतर॥ देखोनिविस्मितवैष्णववीर॥ ह्मणतीऐसानिर्धारनव्हेकोणा॥
॥७९॥ श्रीहरीकीर्त्तनकरितांस्वयमेव॥ कायाब्रह्मचिझालीसर्व॥ तरीनसोडीचसप्रेमभाव॥ ऐसावैष्णवकोणअसे
॥१८०॥ राजाघालीलोटांगण॥ गांवमोकासेघ्याजीह्मणे॥ परीघेतलेनाहींतुकयानें॥ निष्कामसमनेंसर्वदा॥८१॥ लोहपा
सापाहतांनयनीं॥ कांचनझालेंततक्षणीं॥ परीकांतेवरीनाहींफुटकामणी॥ विटाळमानीसोन्याचा॥८२॥ चालतांपा
ऊलपडेजेथें॥ अष्टमासिद्धीवोळंगतीतेथें॥ परीएकादिवसाचेंधान्यकिंचित॥ घरींनिश्चितनठेवी॥८३॥ असोआतां
पंढरीहून॥ वारकरीआलेपरतोन॥ तेतुकयानेंदृष्टीसीदेखोन॥ लोटांगणघालीतयां॥८४॥ रामेश्वराऐसाब्राह्मणपा
हीं॥ ह्मणवीतुकयाचासांपदाई॥ त्यासीलोटांगणघालितसेविदेही॥ महंतीनाहींकिंचित॥८५॥ आपुलाशिष्यदेखो
नी॥ तयासीदेवासमानमानी॥ तोचिजगद्गुरुपूर्णज्ञानी॥ अद्वैतभजनींनिवाला॥८६॥ जैसेंअमंगळमिळतांपाणी॥

तें ससुहृद आपल्या सन्मानमानी ॥ कांहिं गणचंदनकाष्ठें दोनी ॥ पडतां कृशानी सारखीं त्या ॥ ८७ ॥ तैसा तुकयाचा सप्रेम
भाव ॥ अपूज्य पूज्य नाठवे सर्व ॥ सेवक ह्मणती जीवें भावें ॥ तेही देवचि भासती ॥ ८८ ॥ असो तयाचा भक्तिप्रेमा ॥ निरुपमा
सी कैंचि उपमा ॥ ज्याणें वाढवोनि भक्तिमहिमा ॥ पुरुषोत्तमा वश केलें ॥ ८९ ॥ वारकरी आलिया परतोन ॥ तयासी घालीत
लोटांगण ॥ परस्परें देती आलिंगन ॥ निजप्रीतीनें तेधवां ॥ ९० ॥ प्रसाद देती वारकरी ॥ तो आवडीनें सेवित ते अवसरीं ॥
ह्मणे सुखी आहेत कीं श्रीहरी ॥ टाकिलें दुरी मज येथें ॥ ९१ ॥ उत्साह झाला कैशा रीती ॥ तो साकल्य वृत्तांत भक्त सांगती ॥
तुह्मासी भेटावया रुक्मिणीपती ॥ सत्वर चि येती आज येथें ॥ ९२ ॥ इतुका निरोप कर्णसंपुटीं ॥ ऐकतां बांधिली शकुनगां
ठी ॥ भेटीचें आर्त्त बहुत पोटीं ॥ ह्मणे चाल जगजेठी सत्वर ॥ ९३ ॥ ऐसें ह्मणऊनि वैष्णववीर ॥ निढळावरीं ठेविला कर ॥ वा
ट पाहे धरूनि धीर ॥ करुणास्वरें आळवोनी ॥ ९४ ॥ तुकयाचा निश्चय देखोनि अंतरीं ॥ मग गावांत प्रवेशले यात्रेकरी ॥ जा
ऊनियां आपुलाल्या घरीं ॥ प्रपंचव्यापारीं गुंतले ॥ ९५ ॥ पत्र पाठवितां पंढरीस ॥ तुका तेथेंचि उभा असे ॥ मागें अभंग एकु
णवीस ॥ वैष्णवदास बोलिला ॥ ९६ ॥ त्याचा प्रयत्न करून समस्तीं ॥ वचन ध्यानासी आणि जे संतीं ॥ पुढें ही वाट पाहातसे
प्रीती ॥ ह्मणे रुक्मिणीपती कां नये ॥ ९७ ॥ कोण त्या निज भक्ताची पूजा ॥ घेत बैसलासी गरुडध्वजा ॥ तेथें चि प्रेमा गुंतला
तुझा ॥ आणि विसर माझा पडिला कीं ॥ ९८ ॥ कां आणिक संकट घातलें कोणी ॥ तेथें गुंतलासी चक्रपाणी ॥ आणि माझा

विसरपडिलामनीं ॥ टाकिलेंवनीएकटें ॥ ९९ ॥ ऐशारीतीप्रेमळतुका ॥ चित्तीं आठवीवैकुंठनायका ॥ तोंगगनीं झळके
गरुडटका ॥ निजभक्तसखायेतसे ॥ २०० ॥ खगवहनींवैकुंठपती ॥ अकस्मातउतरलेक्षिती ॥ पीतांबराचीझळकेदी-
प्ती ॥ तेणेगभस्तीलोपला ॥ १ ॥ ठाणसाजिरेंसुकुमार ॥ जंघनीशोभतीदोनीकर ॥ दिव्यकुंडलेंमकराकार ॥ श्रीसुखमनो
हरहरीचें ॥ २ ॥ दिव्यकौस्तुभवैजयंती ॥ मयूरपिच्छेंशिरीं असती ॥ तुळसीहारगळांमिरविती ॥ देखतांविश्रांतीहोयजीवा
॥ ३ ॥ रुक्मिणीसहितशारंगधर ॥ उभातुकयाचेसमोर ॥ चहूंभुजींकरुणाकर ॥ आलिंगनसत्वरदेतया ॥ ४ ॥ मगसावधहो
ऊनिउठाउठी ॥ उघडोनिपाहेजोंदृष्टी ॥ तोंसगुणस्वरूपपाहिलेंजगजेठी ॥ चरणींमिठीघातली ॥ ५ ॥ जैसीमातातान्हयाका
रणें ॥ हृदयींधरितनिजप्रीतीनें ॥ तैशाचरीतींजगज्जीवन ॥ तुकयाकारणेंसंबोखी ॥ ६ ॥ पुढिलेअध्यायींरसोत्पत्ती ॥ वद-
विताश्रीरुक्मिणीपती ॥ श्रोतयांसीविनवीमहिपती ॥ श्रवणींसद्भक्तीअसोंद्या ॥ ७ ॥ स्वस्तिश्रीभक्तलीलामृतग्रंथ ॥ श्रव
णेंचिपुरतीमनोरथ ॥ प्रेमळपरिसोतभाविकभक्त ॥ चतुर्दशोध्यायगोडहा ॥ २०८ ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ७ ॥ ७

वि
तुकारामकीर्तनकरितात:
अध्याय १५
स्त्री
लोहगांवकरश्रोते:
जोसी
गाढवदोन
आजारीमुलगा
इंद्रायणी:
तुकोबा
आध्यात्मिक
दादुकोंड
देवपधिक

श्रीगणेशायनमः ॥ श्रीद्वारकाधीशायनमः ॥ जयभीमातीरवासी रुक्मिणीपती ॥ सच्चिदानंदा करुणामूर्त्ती ॥ जगविख्यात
तुझी कीर्त्ती ॥ पवाडे गर्जती पुराणीं ॥ १ ॥ श्रुतिशास्त्रें वर्णिती गुण ॥ त्यांसी नकळे चि तुझें महिमान ॥ तेथें मी मूढमती अज्ञान ॥
प्राकृतमतीनें काय वाणूं ॥ २ ॥ नाहीं अंगीं चातूर्य कुशळता ॥ नव्हे बहुश्रुत व्युत्पन्नता ॥ वायांच उपजला धिवसा चित्ता ॥ तरी शे
वटासी ग्रंथा पाववीं ॥ ३ ॥ तुझ्या आधारें चक्रपाणी ॥ म्यां हातीं धरिली असे लेखणी ॥ तरी सर्वदा हृदयस्थ राहुनी ॥ आठवम
नीं देयीजे ॥ ४ ॥ संतचरित्रें वदतां आतां ॥ तरी सर्वथा हा भार तुझिया माथां ॥ न्यून वचन पडिलें अवचिता ॥ तरी संपूर्ण अनं
तातूं करीं ॥ ५ ॥ त्रितापाचे आवर्त्त पूर्ण ॥ पुढें आलिया अनंत विघ्नें ॥ त्यावरी धाडून सुदर्शन ॥ ग्रंथ निर्विघ्न सिद्धी न्यावा ॥ ६ ॥
हे अघटित आळ निश्चिती ॥ घेतली असे म्यां रुक्मिणीपती ॥ परी शेवट करणें तुझ्या हातीं ॥ ह्मणोनि महिपती विनवीतसे
॥ ७ ॥ मागिले अध्यायीं कथा सुरस ॥ तुकयासी नवतें सावकाश ॥ मग लिखित पाठवितां देवास ॥ पंढरीनिवास पातले ॥ ८ ॥
सगुणस्वरूपें देऊनि भेटी ॥ तुकयासी आलिंगूनि धरिलें पोटीं ॥ येरें चरणीं घातली मिठी ॥ आनंद सृष्टीं न समाये ॥ ९ ॥ मग
तुकयाचा धरूनि कर ॥ घरासी आले शारंगधर ॥ मोडकें खोपट असे जर्जर ॥ प्रभंजन भरे दशदिशा ॥ १० ॥ तुकयासी ह्मणे
वैकुंठविहारी ॥ मी क्षुधातुर झालों अंतरीं ॥ भोजन इच्छितों पोट भरी ॥ तरी साहित्य लवकरी करावें ॥ ११ ॥ आवलीसीं वि
चारी ते अवसरीं ॥ देवाधिदेव आले घरीं ॥ यासी भोजन घालीं सत्वरी ॥ शुद्ध अंतर करूनियां ॥ १२ ॥ मग कण्या रांधोनी स

त्वरी॥ आणीककांहीं भाजीभाकरी॥ वाढोनियांपात्रावरी॥ बैसलेश्रीहरीजेवावया॥१३॥ महर्षीयागकरितांजाण॥ तेथें
नघेजोअवदान॥ तोनिजभक्ताचेघरींचेंकदान्न॥ अतिआदरेंजेवितसे॥१४॥ यज्ञामुखीं काढीतसेखोडी॥ तोभिल्लुणी
चीदेखोनीआवडी॥ उच्छिष्टबोरें अतितांतडी॥ लवडसवडीभक्षीतसे॥१५॥ दुर्योधनेंपक्वान्नेंनिर्मिलींफार॥ तेथेंनज
यचिशारंगधर॥ धुंडोनिविदुराचेंघर॥ कण्यासत्वरभक्षितसे॥१६॥ ऐसाभक्ताचाबांधिलादेव॥ जाणतीसर्वज्ञभक्तवैष्णव
॥ तोतुकयाचादेखोनिनिष्कामभाव॥ कदान्नेंपाहाहोजेवितसे॥१७॥ भावाच्याउपच्यारें करून॥ तृप्तझालाजगज्जीवन॥
मगमुखशुद्धीतुळसीपान॥ निजप्रीतीने अर्पिलें॥१८॥ यापरीतुकयासींतोषवून॥ देवपातले अंतर्धान॥ कींभक्तहृदयक
मळपूर्ण॥ तेथें मिलिंदहोऊनबैसले॥१९॥ आणिककथाऐकारसिक॥ एकब्राह्मणहोताअध्यात्मिक॥ तेणेविवेकसिंधू
लिहूनपुस्तक॥ वाचितसेदेखनिजप्रीती॥२०॥ त्याणेंतुकयाचीकीर्त्तीऐकोनिकानीं॥ धिक्कारूंलागेआपुलेमनीं॥ मगह्म
णेहृदयस्थदेवअसोनी॥ रानोरानीकांजावें॥२१॥ ऐसेंह्मणऊनितोद्विजवर॥ चित्तींकरितसेविच्यार॥ ह्मणेविवेकसिंधू
ऐकिलियावर॥ समजेलअंतरतुकयाचें॥२२॥ मगदेहुग्रामींयेऊन॥ तुकयासींपाहेतोब्राह्मण॥ तोंइंद्रायणीचेतीरींवैष्ण
वजन॥ नामस्मरणकरितसे॥२३॥ होतांतुकयाचेंदर्शन॥ मगपरस्परेंकेलेंनमन॥ ब्राह्मणबोलेविनीतवचन॥ निजप्री
तीनेंतेधवां॥२४॥ श्रीमुकुंदराजविरचित॥ विवेकसिंधूअध्यात्मग्रंथ॥ मीपारायणकरितोंयेथें॥ कराश्रवणार्थनिजप्री

तों ॥ २५ ॥ त्याचारक्षावयामान ॥ प्रेमळभक्तअवस्यह्मणे ॥ मगगोधडीआंगावरघेऊन ॥ सर्वांगतेणेंझांकिलें ॥ २६ ॥ ब्राह्मणाप्रतीबोलेवचन ॥ चराचरपाहतांफांकेमन ॥ यास्तवआह्मींझांकिलेनयन ॥ तुह्मींपारायणकरावें ॥ २७ ॥ ऐकूनितुक्याचेंउत्तर ॥ ग्रंथासीआरंभकरीतोद्विजवर ॥ अर्थहीसांगेनानाप्रकार ॥ परीकांहींचउत्तरनबोलती ॥ २८ ॥ एकप्रहरलोटतांनिश्चित ॥ तोंपर्यंतवाचिलाग्रंथ ॥ परीतुकानहालेनबोलेमात ॥ मगब्राह्मणकरितकायतेव्हां ॥ २९ ॥ गोधडीउचलोनिपाहेनयनीं ॥ तोंतुकयानेंविपरीतकेलीकरणी ॥ दोनीबोटेंघातलींकानीं ॥ नामस्मरणींउह्मत ॥ ३० ब्राह्मणविरसचित्तांत ॥ ह्मणेदूरीआलोंक्रमोनिपंथ ॥ एकप्रहरवाचिलाग्रंथ ॥ श्रमव्यर्थमीकेले ॥ ३१ ॥ तुमचीसंगतीकरूनपाहीं ॥ अर्थअन्वयकळेलकांहीं ॥ तोंकानबुजोनिझालाविदेही ॥ आर्त्तनाहींश्रवणार्थी ॥ ३२ ॥ ऐसेंऐकोनिवैष्णववीर ॥ स्वसुखेंबोलेअभंगसत्वर ॥ यासाठींत्यजूनिघर ॥ वनांतरसेवितों ॥ ३३ ॥ नामरूपींधरिलानेम ॥ माझेंदिठावेलप्रेम ॥ बुद्धीहोईलकींनिष्काम ॥ अहंब्रह्मसमतेची ॥ ३४ ॥ याजकारणेंअद्वैतवार्त्ता ॥ कानींनऐकेंमीसर्वथा ॥ विक्षेपहोईलदेवभक्ता ॥ तोश्रमद्याकरूंनये ॥ ३५ ॥ मुखेंसांगतीआत्मज्ञान ॥ कींब्रह्मरूपअवघेजन ॥ आणिकवडीसाठींदेतीप्राण ॥ करितीभांडणबाजारीं ॥ ३६ ॥ अवघेंब्रह्मरूपभासलेंआहे ॥ तरीगेल्याआल्याचीहळहळकाय ॥ निर्गुणींकांहींचबोलूंनये ॥ शब्दठायखुंटला ॥ ३७ ॥ यालागींदेवभक्तपण ॥ खंडितांहोयअधःपतन ॥ देवेंमर्यादालावि-

लीजाण ॥ त्याप्रमाणेचालिजे ॥ ३८ ॥ उदंडब्रह्मनिष्ठझालाजर ॥ तरीईश्वरीसत्ताअनिवार ॥ सृष्टीउत्पत्तीआणिसंहा
र ॥ याचेनीसाचारनव्हेकीं ॥ ३९ ॥ तिन्हीदेवआपुलाल्यागुणें ॥ जोंवरीअसतीकांसगुण ॥ तोंवरीअसावेंमर्यादेनेंजाण
अद्वैतवचनबोलूंनये ॥ ४० ॥ ऐसेंसांगतांवैष्णवभक्त ॥ ब्राह्मणाअनुभवेंआलीप्रचीत ॥ सगुणभजनींत्याचेंचित्त ॥
जडलेंनिश्चिततेसमयीं ॥ ४१ ॥ करुणापरजेंकांभाषण ॥ संतबोलिलेपुरातन ॥ तेंगातऐकतआवडीकरून ॥ मगसर्वां-
गींपूर्णनिवाला ॥ ४२ ॥ एकेदिवसींलोहगांवकर ॥ गृहस्थयेऊनिथोरथोर ॥ तुकयासींघेऊनगेलेसत्वर ॥ कीर्त्तनगजर
ऐकावया ॥ ४३ ॥ पक्वान्नेंनिर्मूनियांनाना ॥ घालितीविप्रांच्यासमाराधना ॥ रात्रींप्रारंभकरितीकीर्त्तना ॥ भवाब्धितार
पालागुनी ॥ ४४ ॥ तोंहुताशनीचीलोटतांराती ॥ तोंउदयासपावलागभस्ती ॥ तेथेंक्षारउदकाचीवापिकाहोती ॥ जीव
नन्नघेतीकोणीतीचें ॥ ४५ ॥ त्यामाजीयेऊनतुकयानें ॥ अकस्मातकेलेंसचैलस्नान ॥ तत्काळगोडझालेंजीवन ॥ चम-
त्कारदारुणअद्यापीहा ॥ ४६ ॥ कांसारविहीरनामतीस ॥ लोहगांवींअद्यापीअसे ॥ निजभक्ताचाकीर्त्तीघोष ॥ पंढ
रीनिवासवाढवी ॥ ४७ ॥ तेथेंएकब्राह्मणभक्तवैष्णव ॥ तुकयाचेठायींत्याचाभाव ॥ कीर्त्तनघोषऐकतांअपूर्व ॥ प्रपंच-
सर्वटाकूंपाहे ॥ ४८ ॥ स्वरूपेंसुंदरत्याचीकांता ॥ द्वेषउपजलातीच्याचित्ता ॥ ह्मणेवेडाकेलामाझाभर्त्ता ॥ कसूनिआतां
यासीपाहूं ॥ ४९ ॥ भ्रतारगांवासगेलियाजाण ॥ कडुभोंपळेरांधिलेतिणें ॥ मगतुकयासीमंदिरींआणून ॥ ह्मणेकरा

वेंभोजनयेठांयीं॥५०॥रसनाजिंतोनिवैष्णवभक्त॥इंद्रियांनेमकेलानिश्चित॥कडूगोडनकळेचित्यातें॥विदेह
स्थितीह्मणूनी॥५१॥बहुतगोडजाह्लीशाख॥ऐसेंह्मणतांवाढीअनेक॥तुकयासीजेऊनिजातांदेख॥तोंवैकुंठना
यकक्षोभला॥५२॥तीच्यासर्वांगासीभलीं॥आंवळ्याऐसींगुल्मेंआलीं॥तीनजातीचऔषधेंकेलीं॥गतीफळली
कर्माची॥५३॥देवाचाद्वेषकरितांसदा॥तेणेपावलेमोक्षपदा॥परीभक्तद्वेषीयासीरवरवसदा॥नचुकेआपदातया
ची॥५४॥लोहगांवींएकब्राह्मण॥परमभाविकअसेपूर्ण॥सोमवारव्रतत्याजकारणें॥तुकयासीआमंत्रणदीधलें
॥५५॥स्त्रीपुरुषदोघेंउभयतां॥निसरेंसाहित्यनसेचिदेतां॥तोंदिव्यांतीलतेलसरलेंजेवितां॥ह्मणवोनिचिंताक्रांत
मनीं॥५६॥कोरडीपडिलीअसेवात॥आतांकोणजाईलबाजारांत॥देखोनितुकाप्रेमळभक्त॥कायबोलततयासीं॥
॥५७॥रिताबुधलाघरांत॥ह्मणेतेलअसेलपाहात्यांत॥मगघरस्वामीणविलोकित॥तोंस्नेहआंतबहुदिसे॥५८॥तें
दिव्यासआपूनतात्काळघालितां॥हर्षेंआनंदलींउभयतां॥जेथेंदेवभक्तांची आस्था॥तरीसिद्धीसमस्ताआंदण्या
॥५९॥तीउभयतांहोतीजोंवर॥स्नेहसरलेंनाहींतोंवर॥आणीकएकचमत्कार॥ऐकासादरभाविकहो॥६०॥शि
ळाहोतीपाटलाचेद्वारीं॥तुकारामबैसतीतिजवरी॥तोंतुंबडीवालाघालितसेफेरी॥तोनृत्यकरीत्याजपुढें॥६१॥एकमास
पर्यंतजाण॥गांवांतफेरीघातलीत्याणें॥खात्याचींघरेंफिरून॥लोखंडघेऊनतोआला॥६२॥मगयेऊनतुकयासमोर॥ह्म

णतसेमाझीतुंबडीभर ॥ तयासीह्मणेवैष्णववीर ॥ मिळालेंसाचार कायआजी ॥ ६३ ॥ लोहाचेतुकडेहोतेजाण ॥ तेशि
ळेवरीरिचविलेत्याणें ॥ त्याचेंतत्काळझालेंकांचन ॥ ह्मणतीनेईभरूनिसत्वर ॥ ६४ ॥ याचकपावोनिसंतोषचित्तीं ॥ कनक
नेलेंसत्वरगती ॥ कामनिकलोकआश्चर्यकरिती ॥ लोखंड घासितीशिळेवरी ॥ ६५ ॥ परीतेंसर्वथानपालटेजाण ॥ ह्मणती-
परीसनव्हेहापाषाण ॥ तुंबडीवालासभाग्यपूर्ण ॥ लाधलेंधनत्यालागीं ॥ ६६ ॥ तुकयाचेजेथेंलागलेपाय ॥ तेशिळाअद्या
पीतेथेंचिआहे ॥ आणीकचरित्रवर्तलेंकाय ॥ ऐकतांतन्मयसंतसाधु ॥ ६७ ॥ ऐकेदिवसीवैष्णवभक्त ॥ लोहगांवांतकीर्त्तन
करित ॥ मंडपउभारिलेअसतीबहूत ॥ पताकाफडकतसभोंवत्या ॥ ६८ ॥ तुकयाचीसत्कीर्त्तीऐकोनिथोर ॥ यात्रामिळाली
दोनसहस्र ॥ गांवींचेसकळलाहानथोर ॥ श्रवणासींसादरबैसले ॥ ६९ ॥ तेथीलजोशीभाविकपूर्ण ॥ नित्यऐकेहरिकीर्त्त
न ॥ त्याच्यापुत्रासींव्यथादारुण ॥ होतातीप्राणकासाविस ॥ ७० ॥ घरींटाकूनित्याजकारणें ॥ श्रवणासीआलातोब्राह्मण
॥ ह्मणेहोणारतेंनचुकेजाण ॥ उदासहोऊनबैसला ॥ ७१ ॥ एकप्रहरलोटतांरात्र ॥ मुलासीनेतीयमदूत ॥ कांतेनेंउचलोन
तेंप्रेत ॥ हरिकीर्त्तनांतआणिलें ॥ ७२ ॥ तुकयासीह्मणेतेअवसरीं ॥ यासींसत्वरउठविसीलजरी ॥ तरीचविष्णुभक्तनिर्धारीं
नाहींतरीदांभिक ॥ ७३ ॥ भ्रतारलागलातुझेध्यानीं ॥ तैंपासोनिहोतसेहानी ॥ आपुल्यासंसारासीघातलेंपाणी ॥ तैशाच
वाणीआह्मांकेलें ॥ ७४ ॥ हेंकीर्त्तनामाजीयेतांचिविघ्न ॥ विक्षेपपावलेंसकळांचेंमन ॥ जैसीपात्रींजेवितांपक्कान्नें ॥ त्यांत-

विषआपूनकालविलें॥७५॥ऐसेंसंकटदेखोनिजाण॥नेत्रझांकिलेतुकयानें॥मांडिलेंपांडुरंगाचेंध्यान॥एकाग्रमनकरूनियां॥७६॥ह्मणेजयजयाजीपुराणपुरुषा॥भक्तवत्सलावैकुंठाधीशा॥विश्वव्यापकासर्वसाक्षा॥पंढरीनिवासाश्रीविठ्ठला॥७७॥तुवांमागेंपवाडेकेलेबहुत॥तेसत्कीर्तीगाती वैष्णवभक्त॥तेसत्यकरूनिदाखवींयेथें॥अनुभवेंप्रचीतदाखऊनी॥७८॥भजनांतविक्षेपझालापूर्ण॥याहूनिआह्मासीकोणतेंमरण॥हातींघेऊनिआतांसुदर्शन॥निवारीविघ्नविठोबा॥७९॥जरितूंनयेसीलयेथें॥तरीप्राणमीनठेवींचसत्य॥ऐसेंह्मणवोनिप्रेमळभक्त॥अश्रुवाहातनेत्रांतुनी॥८०॥ऐसाधांवाकरितांचतेथें॥तत्काळआलेपंढरीनाथ॥तुकयासीसावधकरूनिह्मणत॥तूंचिंताक्रांतकासया॥८१॥तुजपासींभक्तशिरोमणी॥असेअमृतसंजीवनी॥तेउच्चारितांहरिकीर्त्तनी॥प्राणपरतोनीयेतील॥८२॥ऐसेंआश्वासनदेतांश्रीहरी॥तुकयासीसंतोषझालाअंतरीं॥मगनेत्रउघडोनितेअवसरीं॥सावधकरीश्रोतयां॥८३॥ह्मणेटाळ्याचुटक्यावाजवोनिहातें॥विठ्ठलनामेंगर्जासमस्त॥तेणेंमहाविघ्नेंनिवारत॥संशयचित्तांतनधरावा॥८४॥आज्ञापितांचिवैष्णवभक्त॥सकळश्रोतेभजनकरित॥नादब्रह्मचिमूर्त्तिमंत॥अवतरलेंनिश्चिततेंसमयीं॥८५॥टाळविणेमृदंगसुस्वर॥विठ्ठलनामेंहोतसेगजर॥टाळ्याचुटक्यावाजतीथोर॥रंगअपारवोडवला॥॥८६॥एकप्रहरऐशारीती॥सकळश्रोतेभजनकरिती॥तेणेंचिविसरूनिदेहभ्रांती॥विदेहस्थितीतुकयाची॥८७॥

तोंकौतुककरीपंढरीनाथ ॥ श्रोतेपरिसासभाग्यवंत ॥ कीर्त्तनामाजीटाकिलेंप्रेत ॥ परतलेंनिश्चितप्राणत्याचे ॥ ८८ ॥
उठोनिबैसेहरिकीर्त्तनी ॥ भजनकरीसप्रेमेकरूनी ॥ सन्निधहोतीत्याचीजननी ॥ तीलागलीचरणीतुकयाच्या ॥
॥ ८९ ॥ जयजयकारेंपिटोनिटाळी ॥ आनंदलीभक्तमंडळी ॥ हरिस्मरणीवृत्तीवेधली ॥ अधिकोत्तरतेधवां ॥ ९० ॥ इ
तुकेंचरित्रवर्त्तलीयावर ॥ तोंरात्रझालीदोनप्रहर ॥ तोंश्रीपादसंन्यासीयेऊनिथोर ॥ कीर्त्तनांतसमोरबैसले ॥ ९१ ॥ ना
ममहिमाभक्तिपर ॥ स्थापीततेव्हांवैष्णववीर ॥ नामसकळसाधनांतसार ॥ नामपरात्परपरब्रह्म ॥ ९२ ॥ कर्मप्रारंभक
रितांचिपूर्ण ॥ आधींकेशवनारायण ॥ व्यंगपडतांब्रह्मकर्म ॥ विष्णुस्मरणेंब्रह्महोय ॥ ९३ ॥ करितांवधूवरांचेंलग्न ॥
घटितपाहतीछत्तिसगुण ॥ सेवटींलक्ष्मीकांताचेंस्मरण ॥ केल्यावांचूनिसरेना ॥ ९४ ॥ पितृश्राद्धेंसांगआचरती ॥ सेव
टींजनार्दनस्वरूपींअर्पिती ॥ हरिनामावांचोनिनिश्चिती ॥ सत्कर्मासीगतीअसेना ॥ ९५ ॥ ऐसेंवदोनिप्रेमळभक्त ॥ वि
ठ्ठलनामेंगर्जनाकरित ॥ तेथेंसंन्यासीखळदोघेहोते ॥ तेबोलतीकुत्सितएकमेकां ॥ ९६ ॥ शूद्रमुखींचेंनामस्मरण ॥ हेंस
र्वथानायकावेंआपण ॥ ऐसेंह्मणऊनितेदुर्जन ॥ गेलेउठोनिसत्वर ॥ ९७ ॥ शिखाटाकिलीबोडूनी ॥ परीअहंतावाढ
लीदशगुणीं ॥ भक्तांचाद्वेषधरितांमनीं ॥ तरीअधःपतनीतेजाती ॥ ९८ ॥ दादुकोंडदेवमोकासी ॥ पुण्यांतहोतातेदिव
सीं ॥ फिर्यादगेलेतयापासीं ॥ दोघेसंन्यासीश्रीपाद ॥ ९९ ॥ सक्रोधहोऊनितयेक्षणी ॥ दंडकमंडलुटाकिलाधरणीं ॥

॥ मस्तकपिटोनितयेक्षणी ॥ सांगतीगाऱ्हाणींतींऐका ॥ १०० ॥ तुकाशूद्रजातीचावाणी ॥ त्याणेंविपरीतमांडिलीक
रणी ॥ भाविकजनासीघालोनिमोहनी ॥ नामस्मरणींलाविलें ॥ १ ॥ भक्तिमहिमावाढविलाथोर ॥ कर्ममार्गबुडविला
समग्र ॥ जातीचाअसोनियांशूद्र ॥ करितीनमस्कारब्राह्मण ॥ २ ॥ तूंतरीदेशींचाअधिकारी ॥ यास्तवसांगावयाआलोंसत्व
री ॥ तुह्मावांचोनिनिर्धारी ॥ आमचाकैवारीकोणअसे ॥ ३ ॥ तरीतुक्यासीबोलाऊनयेथवर ॥ शिक्षाकरावीसत्वर ॥ जरी
आमचेंनऐकसीलउत्तर ॥ तरीप्राणसत्वरत्यजूंआह्मीं ॥ ४ ॥ ऐसानिग्रहदेखोनियोर ॥ दादुकोंडदेवबोलेउत्तर ॥ तुमचें
स्वस्थअसोंद्याअंतर ॥ तुक्यासीयेथवरबोलावितों ॥ ५ ॥ तुमचात्याचाप्रतिवादझालिया ॥ जोहरेलशिक्षाकरीनतया ॥ ऐ
सेंश्रीपादासीबोलूनिया ॥ दूतलवलाह्यापाठवित ॥ ६ ॥ लोहगांवींच्याब्राह्मणाला ॥ पन्नासरुपयेलिहिलामसाला ॥ कीं
संन्यासीआलेसांगावयाला ॥ पत्रींलिहिलावृत्तांत ॥ ७ ॥ दादुकोंडदेवाचेभृत्य ॥ लोहगांवासीआलेत्वरित ॥ ब्राह्मणगो
ळाकरूनिसमस्त ॥ मगपत्रदेतत्याहातीं ॥ ८ ॥ ऐसेंअरिष्टदेखोनिनिश्चिती ॥ अर्धरासींभयउपजलेंचित्तीं ॥ ह्मणतीकैसी
होहोईलगती ॥ ह्मणऊनिकांपतीथरथरां ॥ ९ ॥ हातुक्यासींकळतांवृत्तांत ॥ सकळब्राह्मणासींअभयदेत ॥ शिरींअस
तांपंढरीनाथ ॥ चिंताकिमर्थकरावी ॥ ११० ॥ विप्रांसीह्मणतीराजकिंकर ॥ मसालाभरूनिद्यावाशिघ्र ॥ तेथेंचदेऊंचला
सत्वर ॥ अवघेद्विजवरबोलती ॥ ११ ॥ निग्रहकरावाजरीत्याणी ॥ तरीतुक्याचीप्रतिष्ठाबहूतजनीं ॥ राजायेतसेलोटांग-

पी॥ हें सकळांलागूनि विदित असे॥ १२॥ मगटाळविणेमृदंगदोन॥ सवेंध्रुपदेंच्चघोजण॥ दिंड्यापताकाउभारून॥ क
रीतकीर्त्तनचालिलें॥ १३॥ गांवींचे ब्राह्मणसकळलोक॥ पाहावयासी आले कौतुक॥ मगयेऊनिपुणियाच्यासाम्यक॥ सं
गमींसकळिकउतरले॥ १४॥ स्नानेंकरूनसकळिकानी॥ नित्यनेमसारिलेकोणी॥ मगबैसोनितुक्याचेकीर्त्तनीं॥ सादरश्र
वणीऐकती॥ १५॥ ध्यावयातुक्याचेंदर्शन॥ आणीकयात्राआलीदुरून॥ समुदायएकवटहोतांजाण॥ दिसतसेसैन्यउतर
लें॥ १६॥ कीर्त्तनगजरऐकतीप्रीती॥ गांवींचेलोकदर्शनासीयेती॥ पूजेचेंसाहित्यनानारीती॥ भाविकआणितीतबकांत
॥ १७॥ केळेंनारिकेळेंखर्जुर॥ बुकातुळसीसुमनहार॥ पुढेंठेऊनियासत्वर॥ करितीनमस्कारसद्भावें॥ १८॥ मोकासीजा
ऊनिउपरीवरी॥ बाहेरविलोकोनियाहेसत्वरी॥ ह्मणेकोणाचेंसैन्यदिसतेंदूरी॥ ह्मणऊनिविच्यारीभृत्यातें॥ १९॥ तेह्मण
तीलोहगांवकरीतुकाविष्णुभक्त॥ संगमीयेऊनिकीर्त्तनकरित॥ गांवींचेलोकमिळोनिसमस्त॥ दर्शनाजाततयाच्या
॥ १२०॥ ऐसावृत्तांतऐकून॥ दादुकोंडदेवद्रुबळामनें॥ ह्मणेआपणहीपूजाघेऊनित्वरेनें॥ घ्यावेंदर्शनतुकयाचें॥ २१
॥ ऐसेंह्मणऊनिचित्तासीं॥ चालिलागांविचामोकासी॥ तोंआडवेयेऊनिसंन्यासी॥ ह्मणतीहेंकायकरिसीअधिकारि
या॥ २२॥ तूंसर्वस्वआमुचाकुवसा॥ हाधरिलाहोताभरवसा॥ आणित्याच्यादर्शनासीजातोसिकैसा॥ तरीआमुची
आशाव्यर्थगेली॥ २३॥ ऐसेंबोलतांसंन्यासी॥ प्रतिउत्तरदेतमोकासी॥ जनाबरोबरदर्शनासी॥ जाणेंआह्मासीअग

स्य॥२४॥तुकयासीभेटोंनियेंअवसरीं॥गांवांतघेऊनयेतोंसत्वरी॥तुह्मींतयासीजिंतिलेंजरी॥तरीशिक्षाबरी-
त्यासीलाऊं॥२५॥अथवात्याणेतुह्मासजिंतिलेंजर॥तरीमर्यादानधरींअणुमात्र॥स्वस्थअसोंद्याअंतर॥बळक
टविचारकरूनी॥२६॥इतुकेंश्रीपादासीबोलोनीउत्तर॥पूजेचेंसाहित्यघेतलेंसत्वर॥सवेंगृहस्थथोरथोर॥तुकयासीस
त्वरभेटले॥२७॥टाळविणेमृदंगघोष॥कीर्त्तनीवोतलाप्रेमरस॥नृत्यकरितीविष्णुदास॥परित्यासुखासपारनाहीं॥२८
श्रीहरिचरित्रनानालीळा॥गातांसद्गदितहोतसेगळा॥आनंदेंअश्रुयेतीडोळां॥पाझरखळांसीनलकाळ॥२९॥तोंकौतु
कवर्त्तलेंतेअवसरीं॥सादरऐकिजेभक्तचतुरीं॥एकनग्नदिगंबरजटाधारी॥कीर्त्तनाभीतरीप्रकटला॥१३०॥तेजेंलखल
खीतदिव्यकांती॥त्यावरीचर्चिलीदिव्यविभूती॥तुकयासीआलिंगनदेऊनिप्रीती॥घातलेंक्षितींदंडवत॥३१॥तुक्या
प्रतीबोलेउत्तर॥दर्शनाचीआस्थाफार॥मनोरथपुरलेसमग्र॥इतुकेंउत्तरबोलिला॥३२॥ऐसेंह्मणोनितुकयासी॥
निराळमार्गेंजायतापसी॥लोकबैसलेकीर्त्तनासी॥तेकौतुकहर्षेंसीपाहती॥३३॥एकमेकांसींबोलतीकाय॥ह्मातरीकै
लासवासीहोय॥एकह्मणतीदत्तात्रेय॥परीप्रत्ययानयेचीसर्वथा॥३४॥संन्यासीहोतेतेसमयीं॥त्याणींपुसावेंजोका
हीं॥हेंचरित्रदेखोनियांतिहीं॥कुंटितसर्वहीतेझाले॥३५॥ब्रह्मरसवोतलानिखळ॥राहिलीसकळांचीतळमळ॥ह्म
णतीधन्यतुकावैष्णवप्रेमळ॥वैकुंठपाळसाह्ययासी॥३६॥विठ्ठलनामेंगर्जोनिप्रीती॥मगउजळिलीमंगलारती॥वो

वाळूनिरुक्मिणीपती ॥ क्षीरापतीवांटिल्या ॥३७॥ खर्जुरकेळें आणिसाकर ॥ वांटिलेनानाप्रकार ॥ ह्मणतीआजीधन्यसु
दिनथोर ॥ झालाउद्धारसकळांचा ॥ ३८ ॥ दादुकोंडदेवसन्निधयेऊन ॥ तुक्यासीविनीतबोलेवचन ॥ आतांनगरामाजी-
येऊन ॥ सनाथकरणेंमजलागीं ॥ ३९ ॥ देखोनितयाचें आर्त्त ॥ मान्यकरीतवैष्णवभक्त ॥ संन्यासीमनींचिंताक्रांत ॥ ह्मण
तीप्रांतबरानाहीं ॥ १४० ॥ तुक्याचाव्हावयाअपमान ॥ यास्तवसांगीतलेंगाऱ्हाणें ॥ तोंअधिकचिकीर्त्तीवाढलीजाण ॥ उ-
पायकोणकरावा ॥ ४१ ॥ असोआतांतेअवसरीं ॥ तुकयासीनेलेंनगरांतरीं ॥ हवेलीथोरपाहूनबरी ॥ ठावसत्वरीदीधला ॥
॥ ४२ ॥ लोहगांवकरब्राह्मण ॥ मसाल्लाकरूनिआणिलेजाण ॥ त्यांसबहूतसन्मानकरून ॥ साहित्यआणूनदीधलें ॥
॥ ४३ ॥ नगरवासीसावकार ॥ त्याणेंसाहित्यकेलेंफार ॥ तुक्याच्यापंक्तीसदोनसहस्र ॥ जेविलेद्विजवरतेदिवसीं ॥ ४४ ॥
तृतीयप्रहरयेतांनिश्चित ॥ मगकीर्त्तनासीप्रारंभकरित ॥ दादुकोंडदेवसंन्याशासीह्मणत ॥ आतांघालिजेवादार्थ
तुकयासीं ॥ ४५ ॥ जोहरीसयेईलदोघांतून ॥ त्यासमीरासभावरीबैसवीन ॥ संन्यासीह्मणतीनलगतांक्षण ॥ त्या
जकारणेंजिंतूंआह्मी ॥ ४६ ॥ आणिकखळकुटिळकोपी ॥ त्यांसीहीआणिलेंबोलाऊनी ॥ जेवींकावळ्याचाशब्द
ऐकोनिकानीं ॥ स्वयातधांवोनीयेतसे ॥ ४७ ॥ कींसारमेयशब्दकरितांजाण ॥ भुंकोंलागतीगांवीचेश्वान ॥ कींविष्णु
द्रोहीदशानन ॥ त्यासीकुंभकर्णपाठिराखा ॥ ४८ ॥ कींदुर्योधनाचेप्राणसखे ॥ शकुनीशिशुपाळपाठिराखे ॥ तैसेसंन्या

शानीसाद्यदेख ॥ पंडितवादकुमेळविले ॥ ४९ ॥ एक्याचभक्तें तेसमयीं ॥ कीर्त्तनांतयेऊनबैसलेपाहीं ॥ परीद्वेषवा
र्तातुक्यासीनाहीं ॥ नमनसर्वांसीकरितसे ॥ १५० ॥ वक्तयाच्यासन्मुखजाण ॥ श्रीपादबैसतीप्रतिष्ठेने ॥ विष्णुभक्ता
च्याद्वेषेंजाण ॥ पदरींचेंपुण्यवेंचिती ॥ ५१ ॥ विठ्ठलनामेगर्जानिहाका ॥ कीर्त्तनासीप्रारंभकरीतुका ॥ सावधकरितसक
ळलोकां ॥ वैकुंठनायकाभजावें ॥ ५२ ॥ प्रहरघटिकापळपळ ॥ आयुष्यभक्षितोमहाकाळ ॥ जैसाउंदिरसांडोनिनिघतां
बीळ ॥ बोकातत्काळभक्षीतया ॥ ५३ ॥ कांव्रतस्थकरितांएकादशी ॥ राताळेंघातलींशिजावयासी ॥ पाकासीयेतांक्ष
धितयासी ॥ तैसादेहासीकाळजपे ॥ ५४ ॥ कांअसावधअसतांजळींमीन ॥ परीबकसान्निधकरितोध्यान ॥ केव्हांगिळी
लनकळेजाण ॥ अकळेविंदानकाळाचें ॥ ५५ ॥ जेंजेंभासतेंदृष्टीसी ॥ परिणामींनाशअसेत्यासी ॥ याचेंनिवारणव्हाव
यासी ॥ तरीश्रीहरिसीशरणजावें ॥ ५६ ॥ नकरितांश्रीहरीचीभक्ती ॥ तरीसर्वथाजन्ममृत्यूनचुकती ॥ साधनेंकेलींना
नारीती ॥ परीपुनरावृत्तीचुकेना ॥ ५७ ॥ सकामअथवानिष्काम ॥ वाचेसींजपतांश्रीहरीचेंनाम ॥ तयासीगांजूंनशकेचियम ॥ पुरुषोत्तमपाठिराखा ॥ ५८ ॥ अजामिळब्राह्मणसुत ॥ तोवृषलीसींझालारत ॥ तेणेपापाचेपर्वत ॥ जोडले
बहुतसंसारीं ॥ ५९ ॥ त्याचास्पर्शव्हावयानिश्चिती ॥ महातीर्थेंभयेंकांपती ॥ सप्तनरकतेहीभीती ॥ प्रायश्चित्तीमोकलिला ॥ १६० ॥ तोंअकस्मातऋषीसमर्थ ॥ तयांसीभेटलेअवचित ॥ मगअनुतापधरूनमनांत ॥ तयासीवृत्तांतसांगी

तला ॥ ६१ ॥ ऐकोनिह्मणतीसाधुजन ॥ पुत्रावरीममतातुझीपूर्ण ॥ याचेंनामनारायण ॥ आळवीठेऊननिजप्रीती ॥ ६२
ऐसेंसांगोनितयासी ॥ साधुगेलेतीर्थवासी ॥ अंतकाळयेतांविदेहासी ॥ अजामिळपुत्रासीपाचारी ॥ ६३ ॥ नारायणाज
वळयेह्मणतां ॥ करुणाआलीवैकुंठनाथा ॥ दिव्यविमानपाठऊनतत्वतां ॥ मुक्तिसायुज्यताभोगवी ॥ ६४ ॥ सुकमिसेंराघो
ह्मणताहोदीं ॥ गणिकेसीनेलेंवैकुंठीं ॥ नक्रेंगजेंद्रकरितांकष्टी ॥ त्यांसीसोडवीजगजेठीनिजांगें ॥ ६५ ॥ कढयींतघातलें
मंडूकसान ॥ तळींपेटविलाकृशान ॥ मगसंस्कारेंस्मरेकृष्णा ॥ तेणेंउदकउष्णनव्हेची ॥ ६६ ॥ अग्निपाणीवदतसेतेवेळे ॥ क
ढयींतूनकाढामंडूकबाळ ॥ उदकतापेलतत्काळ ॥ लोकसकळऐकती ॥ ६७ ॥ विष्णुविमानयेऊनसत्वर ॥ दिव्यदेहीकेला
दर्दुर ॥ वैकुंठींठेविलानिरंतर ॥ विश्वोद्धारतेधवां ॥ ६८ ॥ कळिकाळहादुर्धरदेख ॥ तेथेंश्रीहरीचेंनामतारक ॥ यावीणसा
धनश्रेष्ठआणिक ॥ ह्मणेतोमूर्खनाडला ॥ ६९ ॥ ऐसेंह्मणाऊनिभक्तप्रेमळ ॥ हांसोनिगर्जतसेवेळोवेळ ॥ विठ्ठलनामेंघो
षसबळ ॥ श्रोतेसकळकरिताती ॥ १७० ॥ टाळ्याचुटक्याच्यानादें ॥ घोषहोतसेब्रह्मानंदें ॥ विसरोनिभेदाभेदद्वंद्व ॥ दि
सेगोविंदसर्वत्र ॥ ७१ ॥ तैसाआनंदकीर्त्तनीहोतां ॥ तों अद्भुतनवलवर्त्तलीकथा ॥ संन्यासीउठोनिउभयतां ॥ तुक्यासी
तत्वतांनमस्कारिती ॥ ७२ ॥ दादुकोंडदेवह्मणतसेत्यांस ॥ स्वामीहें अनुचितकरिताकैसें ॥ नमस्कारकेलातुकयास
शब्दब्राह्मणासठेवितां ॥ ७३ ॥ आणितुह्मींचकैसेंपायांपडतां ॥ तरीमीशिक्षालावीनआतां ॥ खोटेंपणआलेंतुम-

च्यामाथां ॥ न्यायविचारिताआह्मासी ॥ ७४ ॥ संन्यासीतयासीउत्तरदेती ॥ नारायणस्वरूपतुकयाचीकांती ॥ प्रत्यक्ष
देखिलीचतुर्भूजमूर्त्ती ॥ ह्मणऊनिप्रीतीनमस्कारिलें ॥ ७५ ॥ मोकासीसक्रोधअंतरीं ॥ ह्मणेदुर्बुद्धीतुह्मीवेषधारी ॥
मसालालेवविलामाझेकरीं ॥ किमर्थनिर्धारीमजसांगा ॥ ७६ ॥ ह्मणोनिदुराग्रहमांडिलात्याणे ॥ बैसावयासीखर
आणिलेदोन ॥ ह्मणेशिरींपांचपाटकाढून ॥ यांसीहिंडवणेंनगरांत ॥ ७७ ॥ ऐसाप्रसंगपाहूनियां ॥ तुकारामेंवर्जि
लेतया ॥ ह्मणेवेषविटंबूनयेवाया ॥ हेंपंढरीरायानमाने ॥ ७८ ॥ ऐसेंसांगतांतुकातयासी ॥ मगनिवांतराहिला-
मोकासी ॥ येक्रवीनिग्रहकरितात्यांसी ॥ वर्जावयासीकोणीनसे ॥ ७९ ॥ येचविषयीं ऐकआतां ॥ दृष्टांतीआलीआ
डकथा ॥ दादुकोंडदेवउपहारकरितां ॥ गेलीनिजकांताबाहेरी ॥ १८० ॥ लवणशाखसन्निधहोतीजाण ॥ तीआ
पुल्याहातेंघेतलीत्याणे ॥ कांताविनोदेंयेऊनह्मणे ॥ अनुचितकारणहेंकेलें ॥ ८१ ॥ माझाअधिकारअसतांयेथें
॥ तरीतुह्मीकेसाघातलाहात ॥ आणिकासीसांगतांराजनीत ॥ आणितुह्मीविपरीतकांकेलें ॥ ८२ ॥ ऐकोनिकांते
चियाबोला ॥ पायींकतत्काळपाचारिला ॥ ह्मणेहाततोडोनिटाकावहिला ॥ अपराधकेलाथोरयाणें ॥ ८३ ॥ तेव्हां
श्रेष्ठब्राह्मणयेऊनिपाहे ॥ शास्त्रयुक्तसांगतीकाय ॥ आंखुडकरावीआंगड्याचीबाहे ॥ तरीतोडिलाहोयकरजाणा
॥ ८४ ॥ त्याचीआज्ञावंदोनिशिरीं ॥ तैसेंचकेलेंजन्मवरी ॥ उणेंपाठभरतांएकेअवसरीं ॥ मोलकरीणासत्वरआणवि

ली ॥ ८५ ॥ तीह्मणेम्याचोरिलेंनाहीं ॥ मगजांतेंउपडिलेंतेसमयीं ॥ पावशेरदाणेनिघतांधावीं ॥ भुव्बावरपाहींदे
तसे ॥ ८६ ॥ खालीलतळी आणोनिसत्वर ॥ ह्मणेसापडलाअन्यायीचोर ॥ जोंतेंघातलेंभूव्बावर ॥ लोकसर्वत्रपा
हाती ॥ ८७ ॥ ऐसान्यायनिष्ठुरकरीसदा ॥ तरीतयासीनावडेखोटाधंदा ॥ परीतुकयाच्यावचनासीमर्यादा ॥ यास्तव-
आपदानकेली ॥ ८८ ॥ असासंतचरित्रेंवर्णितां ॥ मध्येंचलागली आडकथा ॥ यास्तवउबगनमानिजेश्रोता ॥ ना
वेकदृष्टांताबोलिलों ॥ ८९ ॥ मगजयजयकारकरूनितेथें ॥ कीर्त्तनीगर्जतीवैष्णवभक्त ॥ आरत्याउजळोनित्वरित ॥ रु
क्मिणीकांत ओंवाळिला ॥ १९० ॥ नृत्यकरितांतयेक्षणीं ॥ विठ्ठलनामाच्याउमटतीध्वनी ॥ घागरियामंजूळवाजती
चरणीं ॥ नादगगनींकोंदला ॥ ९१ ॥ तुकाश्रोतयांसीविलोकूनपाहत ॥ तोंविठ्ठलरूपचिदिसेसमस्त ॥ भेदाभेदमा-
वळलातेथ ॥ श्रीहरीसर्वत्रजगींभासे ॥ ९२ ॥ ऐसीहोतांविदेहस्थिती ॥ ध्यानांतआणिलीसगुणमूर्त्ती ॥ साष्टांगदं
डवतघातलेंप्रीतीं ॥ मगखिरापतीवांटिल्या ॥ ९३ ॥ संताचेंरजलागलेंक्षिती ॥ तेपायधुळीवंदीतमहिपती ॥ खिरप
तीवांटितांसांडिलीक्षिती ॥ तेवेंचोनिप्रीतीसेवितसे ॥ ९४ ॥ स्वस्तिश्रीभक्तलीलामृतग्रंथ ॥ श्रवणेंचिपुरतीमनोर
थ ॥ प्रेमळपरिसोतप्रेमळभक्त ॥ पंचदशोध्यायगोडहा ॥ १९५ ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ श्रीमज्जगदी
श्वरार्पणमस्तु ॥ ॥ शुभंभवतु ॥ छ ॥ छ ॥ छ ॥ छ ॥ छ ॥

अध्यायपंधरावासमाप्त.

अध्याय १६

तुकारामकीर्त्तनकरितात.
वि.
श्रोतेवशिवा.
वृक्षावरपक्षीबसले.
तुकोबाचेआंगावरपक्षीबसतात.
कोंडोबा
भागीर.
पठाणशिवाजीसधरतात.
पठाणलोक

तुभ्व· श्रीगणेशायनमः॥ श्रीगोपीजनवल्लभायनमः॥ अनंतजडजीवपांडुरंगे॥ भवपारउतरिलेतुवांअंगें॥ मीएकराहि अ·
१ लोंसकळांमागें॥ तारूं निजांगेंतूंहोई ॥१॥ स्नानसंध्यापितृतर्पण॥ जपतपकळाअनुष्ठान॥ यथाविधींतुझें अर्चन॥ १८
नयेघडोनसर्वथा॥२॥ योगयागनघडेचिकांहीं॥ शरीर अशक्तझालेंपाहीं॥ तीर्थाटणघडलेंनाहीं॥ विठाबाईजाण
सीतूं॥३॥ सत्पात्रेंदानें द्यावींजरी॥ तरीधनधान्यबहूनाहींपदरीं॥ सत्वहीनमीबहुतांपरी॥ बुद्धीअघोरीअसेमाझी॥
॥४॥ सद्गुरुदास्यस्थलसंतसेवा॥ कांहींनघडेचिमजदेवा॥ सर्वप्रकारेंपांगुळबरवा॥ असेंकेशवातुजठावें॥५॥ सकळ
दुरितेंझालींगोळा॥ त्याचामीनिर्माणझालेंपुतळा॥ अविधीविषयबहुतभोगिला॥ निर्वेदनतुजलाकरीतसें॥६॥
पतीतसर्वांगींपरिपूर्ण॥ साक्षदेतसेमाझेंमन॥ आतांआपुलीब्रिदावळीपाहून॥ भवाब्धीउतरणेंश्रीहरी॥७॥ मा
गिले अध्यायींकथाऐसी॥ नारायणस्वरूपतुकयासी॥ देखोनिदोघेसंन्यासी॥ सद्भावेंसीनमस्कारिती॥८॥ झालेंआ
द्यंतवर्तमान॥ शिवाजीसलिहिलें अधिकारीयाणें॥ मगपुण्यासीयेऊननृपनंदन॥ घेतलेंदर्शनतुकयाचें॥९॥ नानाउ
पचारेंपूजोनिपाहीं॥ शिवाजीराजालागलापायीं॥ मगकीर्त्तनासीप्रारंभतेसमयीं॥ भक्तविदेहीकरितसे॥१०॥ टा
ळविणेमृदंगघोष॥ मागेंध्रुपदेपन्नास॥ विठ्ठलनामघेतांसुरस॥ कोंदलेंआकाशत्यानादें॥११॥ आधींचहरिदिनीप १
र्वकाळसुदिन॥ श्रवणाससावधनृपनंदन॥ आणिप्रेमळाचेंवक्तृत्वजाण॥ रंगासीउणेकायतेथें॥१२॥ तोंअविंध

अधिकारीचाकणेंत ॥ तयासीकळलावृत्तांत ॥ मगदोनसहस्रपठाणधाडित ॥ शिवाजीनृपनाथधरावा ॥ १३ ॥ वि
स्तीर्णवाडापुण्यांतजाण ॥ त्यांतहोतसेहरिकीर्त्तन ॥ श्रवणासीबैसलानृपनंदन ॥ तोंपरचक्रदारुणपातलें ॥ १४
रायासीकळलाहावृत्तांत ॥ तुकयासीजावयाआज्ञामागत ॥ गजबजिलेलोकसमस्त ॥ रंगअतिशयितवितुळ-
ला ॥ १५ ॥ ऐसेंअरिष्टजाणोनितेव्हां ॥ मगविठोबाचाकरितसेधांवा ॥ च्यारअभंगवदलेतेव्हां ॥ अर्थपाहावास
ज्जनी ॥ १६ ॥ तुकादेवासीभाकितसेकरुणा ॥ भीतनाहींमीआपुल्यामरणा ॥ परीदुःखकांहींहोतांजनां ॥ हेंमाझि
यानयनानपाहवे ॥ १७ ॥ भजनासीविक्षेपजालाजाण ॥ याहूनिआह्मासीमरणतेंकोण ॥ तरीआपुल्यामायाला
घवेंकरून ॥ निवारीविघ्नविठोबा ॥ १८ ॥ ऐसेंऐकोनिकरुणाघन ॥ तुकयासीदेतसेआश्वासन ॥ तुवांसुखेंकरावेंकी
र्तन ॥ रक्षिताजगज्जीवनमीयासी ॥ १९ ॥ इकडेबाहेरअविंधउन्मत्त ॥ ह्मणतीशिवाजीराजानओळखूंचयांत ॥ त
रीश्रोतेवक्तेमारावेसमस्त ॥ मगसहजचिनृपनाथसांपडेल ॥ २० ॥ ऐसाविच्यारकरितांदुर्मती ॥ तोंलाघवकरितसे
रुक्मिणीपती ॥ आपणहोऊनिशिवाजीनृपती ॥ सत्वरगतीपळतसे ॥ २१ ॥ अविंधसेनेंतहोतेहेर ॥ त्यांणींवोळखि
लानृपवर ॥ ह्मणतीहाचिदावेदार ॥ धरासत्वरलवलाहें ॥ २२ ॥ ऐसेंह्मणोनिउठाउठी ॥ सकळपठाणलागलेपाठीं
॥ तोंमायालाघवीजगजेठी ॥ क्षणएकदृष्टीपडतसे ॥ २३ ॥ आटोपितांसंनिधयेतीपाहीं ॥ धरूंजातांकांहींचनाहीं ॥

ह्मणतीदृष्टीतरळीपाहीं ॥ तोंशेषशायीपुढेंदिसे ॥२४॥ नाहींह्मणतांसंनिधभासे ॥ धरूंजातांकांहीचनदिसे ॥
एकाप्रहरांतवीसकोस ॥ नेलेंतयांसकांटेवनी ॥२५॥ श्रीकृष्णअवतारींजगज्जीवन ॥ पळालाकाळयवनाचेभेणे ॥
मगमुचुकुंदविवरींजगज्जीवन ॥ बैसेलपोनिज्यारीती ॥२६॥ तैशाचरीतीचक्रपाणी ॥ अदृश्यझालेतयेरानी ॥ तों
चंद्रगेलामावळोनी ॥ कांहूरगगनींकोंदलें ॥२७॥ अविंधासीमार्गनदिसेकोठें ॥ वस्त्रेंफाटलींलागतांकांटे ॥ अश्व
हीपळोनिगेलेगोमटे ॥ झालेकरंटेभिकारी ॥२८॥ इकडेतुकाप्रेमळभक्त ॥ श्रीहरीकीर्त्तनींगातनांचत ॥ श्रोतेतट
स्थझालेसमस्त ॥ रंगअद्भुतवोडवला ॥२९॥ कृष्णाविष्णुहरिगोविंदा ॥ अच्युतानतआनंदकंदा ॥ परमपुरुषासच्चि
दानंदा ॥ श्रीमुकुंदाजगद्गुरू ॥३०॥ ऐसींनामेंगाऊनिनाना ॥ सप्रेमरसेंभाकितसेकरुणा ॥ प्रेमेंसद्गदितकंठजाणा ॥
अश्रुनयनालोटती ॥३१॥ ऐशारीतीसप्रेमगजरें ॥ रात्रलोटलीच्यारप्रहर ॥ उदयासीयेतांदिनकर ॥ मगरुक्मिणीव
रवोंवाळिला ॥३२॥ परचक्रगेलेंआपुलेमती ॥ ह्मणऊनिविस्मितझालाभूपती ॥ ह्मणेमरणचुकविलेंआजिचेरा
त्रीं ॥ बैसतांसंगतीसंतांचे ॥३३॥ तुकयासीपुसोनिसत्वर ॥ सिंहगडींचालिलानृपवर ॥ मगप्रसादमागतांवोंजळ
भर ॥ लीदनिजकरेंदीधली ॥३४॥ तीपदरींघेऊनिनृपनाथ ॥ नेऊनिठेविलीदुकानांत ॥ चित्तीसंतोषझालाबहुत
॥ ह्मणेभाग्यउदितपैंमाझें ॥३५॥ इतुकेंचरित्रपुण्यातपाहीं ॥ वर्त्तलेंअसेतेसमयीं ॥ मगतुकयासीलोहगांवीं ॥

घेऊनिसर्वहीलोकगेले ॥ ३६ ॥ तोंकोंडोबालोहकऱ्याआडनाव ॥ तुकयापासींत्याचाभाव ॥ ध्रुपदधरितसे अपूर्व ॥
जेणेंवैष्णवसंतोषती ॥ ३७ ॥ तोतुकयासींह्मणतसेनित्य ॥ महायात्रेसीजावयात्वा आहेहेत ॥ तुमच्चेंवचनमानिती-
गृहस्थ ॥ तरीदेशावरमातेंकरूनद्या ॥ ३८ ॥ खर्चासीकांहींनसेजाण ॥ कार्यहोईलतुमच्च्यावचनें ॥ ऐसेंनित्यह्मण
तांब्राह्मण ॥ वैष्णवजनकायकरी ॥ ३९ ॥ आसनाखालींघालोनिहात ॥ एकहोनकादोनिदेत ॥ कोंडोबाझालासंको
चित ॥ ह्मणेइतुक्यांतकार्यार्थनोहे ॥ ४० ॥ मगतुकातयासींसांगतसेकाई ॥ हानित्यहोनमोडीतजाईं ॥ त्यांतूनएकपै
सानेसमर्पी ॥ पदरींठेवींआपुल्या ॥ ४१ ॥ दुसरेदिवसींपरतोन ॥ त्याचामागुतीहोईलहोन ॥ च्यारदांमोडितांवेळांतु
न ॥ परीपैसाजतनएककरीं ॥ ४२ ॥ सत्पात्रींतेंवेंचूनिधन ॥ यात्राकरावीसंपूर्ण ॥ मागुतीयेशीलपरतोन ॥ मगदेईंहोन
आमचाआह्मां ॥ ४३ ॥ कोंडोबाब्राह्मणविस्मितमनीं ॥ चमत्कारपाहूंआजिचेदिनीं ॥ होनमोडूनितयेक्षणीं ॥ पैसात्यां
तूनठेविला ॥ ४४ ॥ सामग्रीआणोनितांतडी ॥ केलेंलाहीपीठगूळपापडी ॥ तूपगूळघेतलवडसेवडी ॥ जिव्हेसीगोडी
लागावया ॥ ४५ ॥ ऐसेंसाहित्यकरूनफार ॥ तुकयासीपुसावयाआलाविप्र ॥ ह्मणेहोनमोडोनीसत्वर ॥ पाहिलाचमत्का
रस्यास्वामी ॥ ४६ ॥ ऐकोनिह्मणेवैष्णवभक्त ॥ कोणासीकळोंनेदीमात ॥ आपुलासाधोनिकार्यार्थ ॥ मागुतीआह्मास
आणोनिदे ॥ ४७ ॥ मगतीनअभंगवैष्णववीरें ॥ तयाहातींपाठविलेंपत्र ॥ त्याचाअर्थसंकळितसार ॥ ऐकाचतुरभा

विकहो ॥ ४८ ॥ विश्वेश्वरजोकैलासपती ॥ तयासीएकलिहिलीविनंती ॥ एकतेंपत्रभागीरथी ॥ विष्णुपदासिविनं
तीएकअसे ॥ ४९ ॥ विश्वरचनादिसतीअपूर्व ॥ तेंविराट्स्वरूपतूंमहादेव ॥ ह्मणोनिविश्वनाथहेंनाव ॥ भक्तगौरव-
तुजदेती ॥ ५० ॥ दीनरंकअनाथावरी ॥ कृपाकरावीयेअवसरीं ॥ वारंवारपायांवरी ॥ मस्तकनिर्धारींतुमच्यापैं ॥ ५१
अल्पसंतोषीमाझेंमन ॥ तुह्मापासींतोंकायउणे ॥ तुकाभातुकेंइच्छितोमनें ॥ तरितेंपाठवणेंधूर्जटी ॥ ५२ ॥ आ
तांभागीरथीसीलिहिलेंकाय ॥ ह्मणेमाझीविनंतीपरिसामाय ॥ सकळतीर्थांचेंस्वामिनआहे ॥ अंगींतुझियेअसे
कीं ॥ ५३ ॥ महादोषाचेंनिवारण ॥ दर्शनमात्रेंकरिसीलजाण ॥ ह्मणोनितुझेचरणींनमन ॥ निजप्रीतीनेंकरीतसें ॥
॥ ५४ ॥ सद्भावेंतुझ्याजळींन्हाती ॥ तयासीप्राप्तभुक्तिमुक्ती ॥ संतांचापोसणातुकाह्मणती ॥ वाग्पुष्पप्रीतीधाडीत
से ॥ ५५ ॥ विष्णुपदगयेसीथोर ॥ तयासीविनवीतवैष्णववीर ॥ पिंडदिधलापदावर ॥ आपल्यानिजकरेंकरूनी ॥ ५६
माझेंहीगयाव्रजनझालें ॥ पितरांचेंहीरीणफिटलें ॥ कर्मांतरहीसांगघडलें ॥ ओझेंउतरलेंमीपणाचें ॥ ५७ ॥ एक
हरिहरनामदेखा ॥ जनांतबोंबठोकीतसेतुका ॥ हेतीन्हीअभंगलिहिलीपत्रिका ॥ अनुभवसुखाचेनिबळें ॥ ५८ ॥
तेंकोंडोबालोहकऱ्याघेऊनहातीं ॥ तुकयासींनमस्कारकरीतसेप्रीती ॥ मगमहायात्रेसीनिश्चिती ॥ सत्वरगतीचालि
ला ॥ ५९ ॥ वाटेसिहोनमोडूनिदेख ॥ पदरींपैसाबांधीतसेएक ॥ खर्चकरितसेअधिकाधिक ॥ आश्चर्यलोकतेकरि

ती ॥ ६० ॥ ह्मणतीपदरींनसतांधन ॥ खर्चकरीतसेकोठून ॥ जैसावाळूंतीलविहिराजाण ॥ त्यांतीलजीवननसरेची ॥
॥ ६१ ॥ ल्हानचिदिसतोत्याचासांटा ॥ परीजीवनकाढितांनयेतोटा ॥ सोसारिखीकोंडोबाचीनिष्ठा ॥ नसांगेबोभाटको
णासी ॥ ६२ ॥ ऐशारीतीक्रमितांपंथ ॥ वाराणसीसगेलात्वरित ॥ स्नानकेलेंभागीरथींत ॥ मगनिरोपसांगतनिजप्रीती ॥
॥ ६३ ॥ सकळतीर्थांचीस्वामिणीमाये ॥ तुकयानेंतुजपत्रदिधलेंआहे ॥ ऐसेंबोलतांचिलवलाहें ॥ तोंकौतुककायवर्त्तलें
॥ ६४ ॥ महापात्रांतूनभागीरथी ॥ बाहेरहातकाढीतसेप्रीतीं ॥ रत्नजडितकंकणेंहातीं ॥ जैसागभस्तीउगवला ॥ ६५ ॥
तीरींयात्राबहूतहोती ॥ देखोनिलोकआश्चर्यकरिती ॥ ह्मणतीसाक्षांतआलीभागीरथी ॥ ह्मणोनिस्नानेंकरितील
वलाहें ॥ ६६ ॥ एकुघेऊनिमोहोरहोन ॥ हातावरीठेवितीप्रीतीकरून ॥ कोणीतोडगरसोळीचोळखण ॥ सौभाग्यवा
यनपैंदेती ॥ ६७ ॥ ऐशारीतीपूजाकरितां ॥ परीहातींनघेचिविश्वमाता ॥ तेव्हांकोंडभटाचियाचित्ता ॥ स्मरणअवचि
ताजाहलें ॥ ६८ ॥ मगतुकयाचेंपत्रघेऊनित्वरित ॥ पुढेंशिरलापाण्यांत ॥ तेंहातींदेतांचित्वरित ॥ तोंमूठवळीतभागी
रथी ॥ ६९ ॥ ऐसेंकौतुकदाखऊनित्वरित ॥ मगहातगेलाजळांत ॥ देखोनिक्षेत्रवासीसमस्त ॥ झालेविस्मितमान
सीं ॥ ७० ॥ ह्मणतीतुकयाचीवाग्पुष्पेंयेथ ॥ भागीरथीसीआवडलींनिश्चित ॥ त्याच्यावह्याउदकांत ॥ रुक्मिणी-
कांतेंरक्षिल्या ॥ ७१ ॥ असोकोंडभटानेंच्यारमास ॥ आवडीनेकेलाकाशीवास ॥ तुकयाचाअभंगपाठअसे ॥ तोवि

श्वेश्वरासनिवेदिला ॥ ७२ ॥ शब्दरत्नाचीविनवणी ॥ ऐकूनिडोलेशूलपाणी ॥ बेलपुष्पेंपडतीतेक्षणीं ॥ लोकनय
नीपाहती ॥ ७३ ॥ भागीरथीआणिविश्वेश्वर ॥ दोघानीदाखविलाचमत्कार ॥ यात्रेकऱ्यांसीआश्चर्यथोर ॥ वाटलें
साचारतेधवां ॥ ७४ ॥ मगगयेसीजाऊनियांत्याणें ॥ झालावडिलांचेंउत्तीर्ण ॥ तुकयाच्याप्रसादेंकरून ॥ वेंचिलेंधन
सत्पात्रीं ॥ ७५ ॥ ऐसीयात्राकरूननिश्चित ॥ माघारेंचालिलेक्रमितपंथ ॥ चित्तींबहुतहर्षयुक्त ॥ कायबोलतमानसीं
॥ ७६ ॥ तुकयापासींमागतांदेशावर ॥ तोंमहासिद्धीलाधलीथोर ॥ औषधवल्लीपाहतांसाचार ॥ तोंअमृततुषारजो
डला ॥ ७७ ॥ कांइच्छितांथिल्लरीचेंपाणी ॥ तोंपुढेंसमुद्रदेखिलानयनीं ॥ शेळीचेंदुभतेंइच्छितांमनीं ॥ तोंघरींनंदि
नीआलीकीं ॥ ७८ ॥ पाठांतरव्हावेंमनींधरितां ॥ तोंजिव्हेसीआलीप्रसादिककविता ॥ कांउष्णकाळींउबाराहोतां ॥ तों
हिमनगअवचितांदेखिला ॥ ७९ ॥ दीपकाचाप्रकाशइच्छितांथोर ॥ तोंआधारींप्रकटलाभास्कर ॥ स्वप्नींदृष्टांतव्हावा
सत्वर ॥ तोंसाक्षातश्रीधरभेटला ॥ ८० ॥ तेवींमहायात्राव्हावयाकारणें ॥ देशावराचेंइच्छिलेंधन ॥ तोंमहासिद्धीतुक
यानें ॥ निजप्रीतीनेंदीधली ॥ ८१ ॥ आतांहोनमागतीपरतोन ॥ तरीसर्वथादेऊंनयेत्याजकारणें ॥ ऐसाअभिलाषधरून
घेतलेंदर्शनतुकयाचें ॥ ८२ ॥ गांवाबाहेरलोहगांवीं ॥ एकांतींबैसेतुकाविदेही ॥ कोंडोबालोहकऱ्यालवलाहीं ॥ येऊनि
पायींलागला ॥ ८३ ॥ ह्मणेआपुल्याप्रसादेंसत्वरा ॥ सकळझालीअसेयात्रा ॥ स्मरणझालेंवैष्णववीरा ॥ होनमाघारा

मागती ॥ ८४॥ कोंडभटबोलेप्रतिउत्तर ॥ होनहारपलासाचार ॥ बरेंह्मणूनिवैष्णववीर ॥ तयासींउत्तरबोलतसे ॥ ८५॥
कोंडभटघरासीलवलाहीं ॥ जाऊनिपाहीतेसमयीं ॥ तोंग्रंथिकेमाजीकांहींचनाहीं ॥ विस्मितजीवींमगहोय ॥ ८६॥ ह्मणे
आजदोनप्रहरांकेलेंस्नान ॥ तेव्हांपदरींहोताहोन ॥ ग्रंथिकातैसीचआहेजाण ॥ गेलानिघोनकैशारीती ॥ ८७॥ जरीआ
तांसांगावेंतुकयासी ॥ तरीहारपलाह्मणोनवदलोंत्यासी ॥ माझेंकपटफळलेंमजसी ॥ ह्मणोनिकुसमुसीअंतरीं ॥ ८८॥
एकसद्गुरूद्रोहघडलापाहीं ॥ संसारीस्वार्थझालानाहीं ॥ अपेशआलेंदोहींठायीं ॥ यास्तवजीवींझुरतसे ॥ ८९॥
असोआतांहाविच्यार ॥ आशापाशेंनाडलेफार ॥ एकींहातकेलावर ॥ पंचाग्नीधुरएकघेती ॥ ९०॥ एकक्करितीदुग्धपान ॥
एकींसेविलेंमहारण्य ॥ एकींजटावाढवून ॥ भस्मोद्धूलनसर्वांगीं ॥ ९१॥ एकींझाडासीझोळीबांधोन ॥ घालितीचौऱ्यासी
आसन ॥ एकमौनीनबोलतीवचन ॥ मगदेतीपाटीवरीलिहूनपैं ॥ ९२॥ एकींकरूनिवेदाध्ययन ॥ करितीगृहस्थां
चेंउपार्जन ॥ एकपंडितहोऊनिजाण ॥ वादघालणेंपुढिलासीं ॥ ९३॥ एकहोऊनिहरिदास ॥ ज्ञानसांगतीबहुवस ॥ एकीं
घेतलासंन्यास ॥ एकविष्णुदासह्मणविती ॥ ९४॥ जंगमशेवडेआणिफकीर ॥ कानफडेआणिदिगंबर ॥ एकअघोर
पंथह्मणवितीथोर ॥ कितीविस्तारसांगावा ॥ ९५॥ हेपाहिलेअसतीबहुवस ॥ परीदेखिलानाहींनिराशपुरुष ॥ तैसे
तुकयाचेंनव्हेमानस ॥ चित्तींउदाससर्वस्वें ॥ ९६॥ सर्वसिद्धीअनकूळअसतां ॥ तयासीहाणितल्याकींलाथा ॥ षड्वैरीजिं

तोनितखता ॥ रुक्मिणीकांताभजतसें ॥ ९७ ॥ ग्लांतीकरितांहीनृपवर ॥ नाहींमोकासाघेतलाथोर ॥ नाहींवाडाबांधविलेंघर ॥ वस्त्रेंअळंकारनघेची ॥ ९८ ॥ अल्पआहारसेवितांजाण ॥ ग्रासोग्रासींहरिस्मरण ॥ रात्रदिवसहरिकीर्त्तन ॥ नाहींखंडणतयासी ॥ ९९ ॥ संसारपाशटाकोनिनिश्चित ॥ आणिकचपदावैष्णवभक्त ॥ धरूनितुकयाचीसंगत ॥ धरितीध्रुपदकीर्त्तनी ॥ १०० ॥ तयासींनपुसतांपाहीं ॥ उठोनिजाती आणिकेगांवीं ॥ मगतेधुंडीतलवलाहीं ॥ मागोनीसर्वहीयेताती ॥ १ ॥ जरीकोणीपुसिलेंवैष्णववीरा ॥ कोठेंजातांयेअवसरा ॥ ह्मणेआह्मीजातोंवैकुंठपुरा ॥ घातलाधाराऐशारीती ॥ २ ॥ कोणीउत्तरपुसिलेंजाण ॥ तरीतेंनबोलेअभंगावीण ॥ जिव्हारंगलीनामस्मरणेंकरून ॥ कायापरिपूर्णब्रह्मझाली ॥ ३ ॥ एकेदिवसींवैष्णवभक्त ॥ लोहोगांवींकीर्त्तनकरित ॥ नामरूपींजडलेंचित्त ॥ देहभावसमस्तविसरला ॥ ४ ॥ टाळविणेमृदंगघोष ॥ नादब्रह्मचिआलेंसुसें ॥ विठ्ठलनामाचाहोतसेघोष ॥ तेणेंआकाशकोंदलें ॥ ५ ॥ जैसीवक्तयाचीस्थितीपाहीं ॥ तैसेचश्रोतेझालेविदेही ॥ जोंहिलालासींतेलघालीतसेपाहीं ॥ देहभावनाहींतयासी ॥ ६ ॥ तटस्थमुद्रासर्वांकारणे ॥ स्नेहनघालितांविझालाअग्न ॥ तोंअद्भुतकौतुकवर्त्तलेंजाण ॥ तेंऐकासज्जनभाविकहो ॥ ७ ॥ तुकयाच्याआंगाचाप्रकाश ॥ पडिलातेव्हांबहुवस ॥ माझ्यामतीनेंऐसेंभासेनिःशेष ॥ दृष्टांतस्फुरसअवधारा ॥ ८ ॥ गर्भअसतांमातेच्याउदरीं ॥ तेंतेजउमटेअंगावरी ॥ कांजैसाकवीचाअनुभवअंतरीं ॥ तोंउद्गारबाहेरीवदेवाचा ॥ ९ ॥ नातरीबिलोराच्यामं-

दिरांत॥दीपउजळोनीठेविलानिश्चित॥त्याचाबाहेरप्रकाशपडत॥द्वारकिंचितनसतांही॥११०॥तैसेंतुकयाच्याउदरींस
हज॥स्फरवाडेंबैसेगरुडध्वज॥त्याचेंबाहेरफांकलेंतेज॥ऐसेंचमजवाटतसे॥११॥महाकवीचीकाव्यगोष्टी॥कींकोटिसू
र्यविष्णूचेमुकुटीं॥तोभक्तवत्सलजगजेठी॥तुकयाचेपोटींसांठवला॥१२॥ह्मणोनिअंगींचाप्रकाश॥कीर्त्तनींपडिलाब-
हुवस॥अनुभवेंदेखिलेंदृष्टीस॥भाग्यविशेषपैंत्याचें॥१३॥असोआतांजगदोद्धार॥व्हावयाभक्तांचाअवतार॥की
र्तनझालेंतीनप्रहर॥मगरुक्मिणीवरयोंवाळिला॥१४॥खालींबैसतांवैष्णववीर॥तोंमारुतीपडिलाअंधःकार॥श्रोते
आलेदेहावर॥तोंहिलालसमयलाविले॥१५॥स्नेहआणिलेंहोतेंसमय॥तेंवेंचिलेंनाहींअणुमात्र॥तेलाचेंतैसेंच
भरलेंपात्र॥आश्चर्यथोरलोककरिती॥१६॥लोहगांवींचेभाविकनर॥त्यांसींतुकयाचीसेवाघडलीफार॥त्यांणींचप्रे
मालुटिलासमग्र॥कीर्त्तनगजरऐकतां॥१७॥जैसाकृष्णाअवतारमथुरेसीझाला॥परीगोकुळींक्रीडलाघनसांवळा॥
तोव्रजवासीभोगितीसोहळा॥तैसेंचमजलाभासतसे॥१८॥जगविख्यातवैष्णववीर॥जनांतमान्यतावाढलीफार॥म-
गकोणासीनबोलतांउत्तर॥देहूसीसत्वरपातला॥१९॥राउळासींजातांउठाउठी॥पांडुरंगमूर्त्तीदेखिलीदृष्टी॥नमस्का
रघालीसद्गदकंठीं॥जैसीदंडकाठीपडतसे॥१२०॥जेंध्यानठसावलेंहृदयांतरीं॥तीसगुणमूर्त्तीदेखिलीबाहेरी॥प्रेमनस
मावेचिअंतरीं॥मगतेबाहेरीवोसंडे॥२१॥देवासीह्मणेकरुणास्वरें॥तुह्मींकरावाअंगीकार॥हामाझेठायींविचार॥ना

हींआनसाचारविठोबा॥१२२॥आतांदोहींपक्षींजाण॥त्यालाऊनिघेतलेंलांछन॥लाजविलेंदेवभक्तपण॥साक्षमन
देतसे॥२३॥महत्वाचीशृंखलापाहीं॥पडलीअसेविठाबाई॥ममतावाढलीजनांचेठायीं॥आतांमजसोडवींदयाळा॥
॥२४॥नानापरीचींपक्वान्नेंदेख॥करूनिभोजनघालितीलोक॥तेंचशरीरींमानिलेंसुख॥तूंचैतन्यनायकसाक्षयासीं
॥२५॥अवगुणाचायाराबहुवस॥देहींवाढलीनिद्राआळस॥आतांतुजसंतांचीआणअसे॥तरीवैकुंठासीमजने
यीं॥२६॥ऐसीकरुणाभाकितांचित्तीं॥तोंहांसोनिबोलेपांडुरंगमूर्त्ती॥ह्मणेतुझेमनोरथपूर्णहोती॥मीश्रीपतीरक्षिता
॥२७॥तुझियादेहासींसेवटीं॥काळाचीपडोंनेदींचदृष्टी॥ऐसेंबोलतांचजगजेठी॥सद्गदितकंठहोयतुका॥२८॥या
वरीआतांएकेदिवसीं॥तुकारामगेलेआळंदीसीं॥सभामंडपींसद्भावेंसी॥दंडवतदेवासीघालीतसे॥२९॥तोंआज्या
नवृक्षातळींजाण॥पक्षीवेंचितहोतेकण॥मगतेतुकयासीदेखोन॥गेलेउडोनिसत्वर॥३०॥हेंदेखोनिप्रेमळभक्त॥अं
गझालेंरोमांचित॥ह्मणेमाझेंअभेदुअसतेंचित्त॥तरीपक्षीउडतेकासया॥३१॥षड्वैरीजिंतोनीसाचार॥शूरत्वेंझालों
वैष्णववीर॥आत्मवत्भासेजगत्र॥तोंव्यर्थचिविचारगेलाकीं॥३२॥शरीरझालेंप्रेतवत॥देहभावनसेकिंचित॥ऐसी
झालीमाझीस्थित॥तेंव्यर्थचिदिसतमजलागीं॥३३॥वैराग्याच्याशेणीशरीरा॥लाऊनिब्रह्माग्नीचेतविलाबरा॥झा
लोंसंसारासीपाठमोरा॥तेंव्यर्थचिअंतरामजभासे॥३४॥हादेहहाचिघटपाहीं॥फोडिलाविठोबाचेपायीं॥वासनेचा-

क्षयकेलाजीवीं ॥ तेंव्यर्थचिसर्वही आजगेलें ॥१३५॥ तीळांजुळीकुळनामरूपासी ॥ ज्याचेंशरीरअर्पिलेंत्यासी ॥ स्थितीबाणलीआहेऐसी ॥ तेंव्यर्थचिमजसींदिसतसे ॥३६॥ आयुष्याचेंनसरतांमाप ॥ रक्षाझालीआपेआप ॥ देहींचउजळलादीप ॥ पांडुरंगबापविश्वाचा ॥३७॥ हेंआपल्याअनुभवेंवदलोंस्थिती ॥ परीमाझ्याभयेंपक्षीउडती ॥ तरीव्यर्थचिवाणीवेंचिलीमती ॥ ह्मणोनिचित्तीखेदकरी ॥३८॥ मगएकाग्रकरूनियांचित्त ॥ हृदयींचिंतिलापंढरीनाथ ॥ ह्मणेदीनदयाळकृपावंत ॥ अनाथनाथविठाबाई ॥३९॥ डोळसाचाधरूनहात ॥ आंधळाजायक्रमितपंथ ॥ परीनदीसेचिअणुमात्र ॥ ईश्वरीभारघालोनियां ॥१४०॥ परमार्थपंथक्रमितांसांग ॥ पाऊलपडिलेंआडमार्ग ॥ दीनदयाळेंपांडुरंग ॥ तूंनिजांगेंसांभाळी ॥४१॥ ऐसेंह्मणूनिप्रेमळभक्त ॥ तटस्थउभामगनिवांत ॥ सर्वथाअंगनहालवीकिंचित ॥ पात्यासपातेंलागेना ॥४२॥ ह्मणेमाझियाआंगावरयेऊन ॥ पक्षीबैसतीलनिर्भयमनें ॥ तेव्हांचहोईलसमाधान ॥ नाहींतरीजिणेंव्यर्थचिहें ॥४३॥ ऐसानिश्चयकरूनिथोर ॥ तटस्थउभाघटिकाच्यार ॥ श्वासनटाकीचअणुमात्र ॥ हेंजाणेंअंतरविश्वात्मा ॥४४॥ तुकयाचानिश्चयदेखोनिऐसा ॥ संकटपडिलेंपंढरीशा ॥ ह्मणेयाचालळापुरेलजैसा ॥ तीयुक्तसहसाकरावी ॥ ॥४५॥ मीभक्तांचेंलळेपुरवीनश्रीपती ॥ ऐसेंबोलिलोंश्रीभागवतीं ॥ तीअसत्यहोईलवचनोक्ती ॥ तुकयाचीआर्त्तीनपुरवितां ॥४६॥ आत्माव्यापकसर्वांभूतीं ॥ तोहृदयस्थझालाकरुणामूर्ती ॥ तेव्हांपक्षीनिर्भयहोऊनिचित्तीं ॥ आंगावरबैसती

तुकयाच्या॥४७॥मगअंगहालवितांप्रेमळभक्त॥तरीविहंगमपळूनिनजात॥जैसाप्रभंजनेंवृक्षहालत॥तेणेपक्षीनभी
तसर्वथा॥४८॥मगपरमहर्षमानूनिचित्तीं॥एकअभंगरचिलाप्रीती॥त्याचापहिलाचरणनिश्चिती॥लिहितोंग्रंथींऐकि
जे॥४९॥अवघींचभूतेंसाम्याआलीं॥हेंम्याकधींनवतींदेखिलीं॥तीखांमाझीआळपुरविली॥जेवींसमजवीमाताबाळ
कातें॥१५०॥ऐसेंह्मणऊनितेव्हां॥साष्टांगदंडवतज्ञानदेवा॥घालूनियांसप्रेमभावा॥तुकयाच्याजीवाआनंद॥५१॥असो
सिंहावलोकनेंनिश्चिती॥मागीलचरित्रआठविजेश्रोतीं॥कोणासीनपुसतांनिश्चिती॥अलंकावतीपातले॥५२॥मागेंच
वदावैष्णवभक्त॥तुकयाचाशोधघेतघेत॥धुंडीतआलेकींसमस्त॥तोंनवलअघटितदेखिलें॥५३॥अज्यानवृक्षातळीं
साचार॥एकटातुकावैष्णववीर॥पक्षीबैसतीअंगावर॥वारंवारतेसमयीं॥५४॥हेंकौतुकपाहूनतेवेळे॥अवघेजनपा
तळेजवळ॥तोंपक्षीउडोनिगेलेसकळ॥धन्यकाळसुदिनतो॥५५॥असोआतांतेअवसरीं॥पुण्यक्षेत्रअलंकापुरी॥ते
थेंज्ञानदेवाचेद्वारीं॥तुकाकरीहरिकीर्त्तन॥५६॥टाळविणेंउपसाहित्य॥तेहीमागूनआलेसमस्त॥नादब्रह्मघवघवीत
॥श्रवणींपडतश्रोतयांच्या॥५७॥कृष्णाविष्णुमेघःशामा॥अच्युतानरहरीपुरुषोत्तमा॥भक्तकैवारीगुणधामा॥भज
नींप्रेमामजदेईं॥५८॥जोंवरीदेहअवसान॥तोंवरीकरीनहरिकीर्त्तन॥एकवेळआयुष्यकरीउणें॥परीगात्रेंक्षीणहो
ऊंनेदीं॥५९॥तुझेनामीपडेविसर॥याहूनिघातकोणताथोर॥हळाहळेंपोळलाशंकर॥तोनामेंविसत्वरनिवाला॥६०॥

गमनकरितांत्रिभुवनीं ॥ नामगातसेनारदमुनी ॥ ब्रह्मविणास्वांदाघेउनी ॥ सप्रेममनींसर्वदा ॥ ६१ ॥ हरिपाठाचे अभंगयो
र ॥ स्वमुखेंवदलेज्ञानेश्वर ॥ तेचितुकावैष्णववीर ॥ सप्रेमादरेंगातसे ॥ ६२ ॥ टाळ्याचुटक्यांचीघाई ॥ घागऱ्यानेंपुरेंवाजती
पायीं ॥ मृदंगविण्याच्यास्वरांतकांहीं ॥ भेदनाहींअणुमात्र ॥ ६३ ॥ ऐशाचपरीस्वानंदरसीं ॥ नादब्रह्मकोंदलेंआकाशीं ॥
तेथेंसुरवरयेऊनिउल्हासीं ॥ कौतुकदृष्टीसीपाहती ॥ ६४ ॥ गुप्तरूपेंकरूनदेख ॥ पुष्पेंवर्षतीवृंदारक ॥ अवघाचिविश्वंभर
भासेएक ॥ सप्रेमसुखवर्षोतिया ॥ ६५ ॥ असोवानितांतुकयाची स्थिती ॥ कुंठितहोयकवीचीमती ॥ च्यारप्रहरलोटतांराती
मगरुक्मिणीपतीओंवाळिला ॥ ६६ ॥ द्वादशीसपारणेंकरूनतेथें ॥ देहूग्रामासीचालिलेत्वरित ॥ मगज्ञानदेवासीपुसोनिये
त ॥ देहूक्षेत्रांतमागुती ॥ ६७ ॥ तुकयाचीस्थितीऐसीपाहे ॥ सर्वांभूतींनिर्वैरहोय ॥ ह्मणोनिपक्षीनधरूनीभय ॥ बैसतजा-
तीअंगावरी ॥ ६८ ॥ हेबहुतांच्यामुखेंकरूनी ॥ चिंचवडींदेवऐकतीकानीं ॥ ह्मणतीतुक्यासींयेथवरबोलाउनी ॥ चमत्का
रनयनींपाहावा ॥ ६९ ॥ ह्मणोनिदेहूक्षेत्रासीत्यांणी ॥ मनुष्यपाठविलेंप्रीतीकरूनी ॥ ह्मणतीतुकयासीविनीतहोउनी ॥ ये
ईघेऊनियेथवरी ॥ १७० ॥ अवश्यह्मणऊनित्यातें ॥ येऊनितुकयाचेंदर्शनघेत ॥ तेथेंवैष्णवकीर्त्तनकरित ॥ ऐकूनिविश्रांत
जीवासीं ॥ ७१ ॥ देवांचानिरोपसांगावातेणे ॥ तरीसर्वथानाहींदेहभान ॥ रात्रदिवसऐकेकीर्त्तन ॥ सप्रेममनेंसर्वदा ॥ ७२ ॥
दिवसतीनलोटतांजाण ॥ तरीमनुष्यनयेचीपरतोन ॥ देवह्मणतीजाऊनिआपण ॥ घ्यावेंदर्शनतुकयाचें ॥ ७३ ॥ ऐसेंह्मण

ऊनितेअवसरीं॥मगदेवनिघालेसत्वरी॥हेंतुकयासीकळतांअंतरीं॥ह्मणेआपणसामोरीत्यांसिजावें॥७४॥मगकोणास
नपुसतांसत्वर॥तेथूनिनिघालावैष्णववीर॥अर्धपंथक्रमितांसत्वर॥भेटलेद्विजवरतुकयासी॥७५॥तुकयासीदेतांआ
लिंगन॥देवाचेंसंतोषितझालेंमन॥ह्मणतीधन्यधन्यआजिचासुदिन॥झालेंदर्शनवैष्णवाचें॥७६॥मगस्वस्थबैसोनिते
थें॥ह्मणतीबराफावलाएकांत॥सर्वभूतेंसाम्यासीयेत॥पक्षीबैसतीअंगावरी॥७७॥तृणाचेंबुजावणेंहालतांनिश्चिती
॥तयासीविहंगमदेखोनिपळती॥आणितुमच्याअंगावरनिर्भयबैसती॥हीअद्भुतस्थितीबाणली॥७८॥मनुष्याकृती
दिसतीआह्मां॥परीयेथेंसर्वथानाहींचउपमा॥अद्भुतबोलोनीभक्तीप्रेमा॥पुरुषोत्तमावशकेलें॥७९॥तरीतुकयातूंको
णनिश्चित॥हें आह्मांसीसांगसत्य॥अनुभवें आणोनिमनचीत॥संशयनिवृत्तीकरावी॥१८०॥ऐसेंपुसतांचिउपासका
तयासीचमत्कारदाखवीतुका॥मांडीचेंकातडेंचिरिलेंदेखा॥तोंकापूसनिघात्यामाजी॥८१॥हाडमांसरुधिरनाहीं॥का
पूसपिंजलादिसतसेपाहीं॥देखोनिदेवविस्मितदेहीं॥ह्मणतीमानवीकांहींनव्हेतुका॥८२॥करावयाजगदोद्धार॥मृ-
त्युलोकींझालाअवतार॥मनुष्याकृतीदिसत्येवर॥परीहाईश्वरह्मणावा॥८३॥ऐशारीतीकरूनिस्तवन॥देवींकेलेंसाष्टां
गनमन॥तुकातयाचेधरितसेचरण॥ह्मणेअनुचितकरणेंहेंस्वामी॥८४॥मीतरीशूद्रजातीचापाहें॥सकळसंतांचासे
वकआहें॥ऐसेंह्मणऊनिलवलाहें॥सप्रेमपायधरीतसे॥८५॥श्रीकृष्णेंजैसीभक्षितांमाती॥विश्वरूपदाखविलेंमाते

प्रती ॥ मगनमस्कारकरीयशोदासती ॥ तेव्हांरडेश्रीपतीबाळलीळे ॥ ८६ ॥ ह्मणेमीतुझेंबाळकनिश्चिती ॥ माझ्यापा
यांकांपडसीमातेसती ॥ तैसीचतुकयाचीस्थिती ॥ अमानित्वचित्तांतसर्वदा ॥ ८७ ॥ चर्मचिरूनिआपुल्याहातें ॥ कापू
सदाखविलादेवातें ॥ तैंनमस्कारकरितांतयातें ॥ ह्मणेहेंअनुचितकरितसा ॥ ८८ ॥ जैसींविष्णुचरित्रेंअघटित ॥ तैशा
चरीतीदाविती संत ॥ देवआणिनिजभक्तांत ॥ भेदकिंचित असेना ॥ ८९ ॥ वायुआणिचंचळपण ॥ कांसूर्यआणित्या
चेंकिरण ॥ समुद्रआणिकल्लोळपूर्ण ॥ नव्हतीदोनसर्वथा ॥ ९० ॥ ऐशारीतीकरूनस्तुती ॥ देवानेतुकयासीधरून
हातीं ॥ चिंचवडक्षेत्रीनेऊनिरात्रीं ॥ कीर्त्तनऐकतीनिजप्रेमे ॥ ९१ ॥ च्यारीप्रहरकीर्त्तनगजर ॥ करूनितोषविलेद्विजव
र ॥ मगउदयासीयेतांचिदिनकर ॥ रुक्मिणीवरधोंवाळिला ॥ ९२ ॥ असोयापरीगाणपत्य ॥ तुकयाचेठायींधरूनप्रीत
॥ तीनरात्रीराहूनितेथ ॥ श्रवणकरितहरिकथा ॥ ९३ ॥ पक्कान्नेंकरूनिनानारीती ॥ ब्राह्मणसंतर्पणकेलेंप्रीती ॥ मगतु
कयासीघेऊनियांपंक्ती ॥ भोजनकरितीप्रीतीनें ॥ ९४ ॥ असोयापरीझालींभोजनें ॥ तांबूलबुकाआणिसुमनें ॥ पुष्प
हारगळ्यांतघालून ॥ विष्णुभक्तप्रीतीनेपूजिला ॥ ९५ ॥ मगदेवासीपुसोनिदेखा ॥ देहूसीयेतसेवैष्णवतुका ॥ जोडी
लाविग्रहीअवतारनिका ॥ वैकुंठनायकाप्रीयजो ॥ ९६ ॥ भजनकरितांसप्रेमरंग ॥ स्वयेंआपणचिझालापांडुरंग ॥ मग
त्याचेकेलेदोनभाग ॥ भक्तिसुखनिजांगेंभोगीतसे ॥ ९७ ॥ एकचिदेवअसतांनिश्चिती ॥ मगकोणकोणाचीधरावीआ-

र्ती॥ फळांच्याराशीपडिल्याक्षिती॥ परीसेवणारत्याप्रतीएकव्हावा॥ ९८॥ आरसानिर्मळअसतांजाण॥ परीतयासीं
पाहिजेदुसरादेखणा॥ कांपुष्पांचेमकरंदनाना॥ एकघ्राणावीणव्यर्थ॥ ९९॥ तैसांचरीतीभक्तांवीण॥ देवाचेंऐश्वर्य
जाणेलकोण॥ ह्मणऊनिआपुलेंचभजनकरितीआपण॥ विभागदोनकरूनियां॥ २००॥ मुक्तीवरीलचवथीभक्ती॥
बोलिलीअसेश्रीभागवतीं॥ तेसाचदाखवावयानिश्चिती॥ तुकारामक्षितीअवतरला॥ १॥ ज्याणेंकरूनकीर्त्तनगज
र॥ कळिकाळहाजिंतिलादुर्धर॥ ह्मणवोनिकायाझालीअमर॥ ब्रह्मरूपसमग्रअंगझालें॥ २॥ उदंडसत्पुरुषझालेम
ही॥ परीशरीरयेथेंचिठेविलेंतिहीं॥ तुकाब्रह्मरूपअसोनिदेहीं॥ हेचिनवाईअगाध॥ ३॥ पुढिलेअध्यायींकथागोमटी॥
जोदीनदयाळजगजेठी॥ तोतुकयासींयेऊनिउठाउठीं॥ नेईलवैकुंठींनिजलोकीं॥ ४॥ जोअच्युतानंतआनंदकंद॥ ली
लाविग्रहीसच्चिदानंद॥ तोमहीपतीसींदेऊनिअभयवरद॥ वदवीस्वच्छंदेंभक्तकथा॥ ५॥ स्वस्तिश्रीभक्तलीलामृतग्रं
थ॥ श्रवणेंचिपुरतीमनोरथ॥ प्रेमळपरिसोतभाविकभक्त॥ षोडशोध्यायगोडहा॥ २०६॥ ॥श्रीकृष्णार्पणमस्तु
॥ श्रीमज्जगदीश्वरार्पणमस्तु॥ ॥श्रीगोपालोविजयते॥ छ॥ छ॥ छ॥ छ॥ छ॥

अध्याय १७
तुकाराम
कीर्तनकरितात
वि॰
वैकुंठपुरी
इंद्रायणी
ब्राह्मणभोजनकरितात
विमानें
विमा
देवपुष्पवृष्टी करितात
देहूंतील लोक
म
पांडु
जीजाई
वि
नगरवासीलोक

श्रीगणेशायनमः ॥ श्रीराधाकृष्णायनमः ॥ सरिताकोरड्याकरूनसमस्त ॥ त्याहीभरिजेतीलअमृतें ॥ परीदेवभक्तांचीं
चरित्रें ॥ यांचाअंतकळेना ॥ १ ॥ पृथ्वीवरीलतृणाचेमोड ॥ यांचीहीगणतीहोईलकोडें ॥ परीवैकुंठपतीचेगुणअवघड ॥
वर्णितांवेडेंमनहोय ॥ २ ॥ सांगडीवांचोनिपोहणार ॥ पावेलउदधीचापैलपार ॥ परीक्षीराब्धिजावराचीसत्कीर्तीथोर ॥ न
येसाचारवर्णितां ॥ ३ ॥ कांप्रभंजनाचीमोटबांधोनी ॥ तीहीठेविजेलआपुलेसदनीं ॥ परीतुझेपवाडेशारंगपाणी ॥ वर्णि
तांव्याणीकुंठित ॥ ४ ॥ अठराहीभारवनस्पती ॥ यांच्यापत्राचीहोईलगणती ॥ परीतुझेपवाडेवैकुंठपती ॥ वर्णितांमतीपुरे
ना ॥ ५ ॥ हव्यासधरूनमहाकवी ॥ कीर्त्तिवर्णितीशेषशाई ॥ परीतुझीमहिमाजेआघवी ॥ कळलीचनाहींतयांस ॥ ६ ॥ वेद
शास्त्रेंआणिपुराणें ॥ अखंडगातीतुझेगुण ॥ परीऐसाचिआहेसीह्मणऊन ॥ निश्चयकोणेनकेला ॥ ७ ॥ अवघेचिआपुल
